प्रकरण १ ले

प्रस्तावना

१.१ प्रस्तावना :

Education Means all round development of person.

NCERT (2014). Basic in Education Textbook for B.Ed. Cource. Delhi : Publication Division by Secretary NCERT. Page no. 11-12

शिक्षण म्हणजे व्यक्तीचा संपूर्ण विकास होय. विनोबा भावे म्हणतात, "मुलांची डोकी माहितीने भरणे म्हणजे शिक्षण नव्हे, तर ज्ञानाची तहान त्यांच्यात निर्माण करणे म्हणजे शिक्षण"

Bhave V. (1995). Thought on Education. Varanasi : Sarva Seva Sangh Prakashan. Page no. 116

शिक्षणाला सतत चालणारी गतिमान प्रक्रिया संबोधण्यात येते. व्यक्तीच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून आणण्यासाठी शिक्षण उपयोगी पडते. त्यामुळे शिक्षण हे व्यक्तीच्या जीवनात व्यापकता निर्माण करीत असते. त्यामुळे जीवनाला स्पर्श करणाऱ्या सर्व बाबी शिक्षणाशी संबंधित असतात. शिक्षणाचे प्रमुख मूलाधार म्हणजे तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, समाजशास्त्र इतर मानव्यशास्त्रे व भौतिक शास्त्रे हे होत. या मूलाधारांची कल्पना शिक्षकास असणे आवश्यक आहे.

मानवी जीवनात विचारशक्तीला अनन्यसाधारण महत्त्व असते, इतर प्राणीपण आपले संरक्षण करून घेण्यासाठी त्याचा वापर करताना दिसतात.

सर पर्सिनन यांच्या मतानुसार, " व्यक्ती जीवनाच्या विकासात शिक्षणामुळे त्याचे योगदान घडून यावयास पाहिजे, त्यासाठी त्यास आपल्या कर्तृत्व शक्तीनुसार विकास करण्याची संधी शिक्षणातून मिळावयास हवी. व्यक्तीमत्त्वाचा सर्वांगीण विकास शिक्षणामुळेच घडून येतो "

Echazarra, A. et al. (2016), How teachers teach and students learn: Successful strategies for school, OECD Education Working Papers, No. 130, OECD Publishing, Paris, http://dx.doi.org/10.1787/5jm29kpt0xxx-en.

भारतीय शिक्षण आयोगाने अथवा कोठारी शिक्षण आयोगाने आपल्या प्रथमदर्शनी प्रास्ताविकेत शिक्षणाविषयी पुढील मार्मिक विचार प्रकट केले आहे. त्यामध्ये "भारताचे भाग्य वर्गावर्गातून घडविले जाते. व्यक्तीच्या विकासाची कल्याणाची आणि सुरक्षिततेची पातळी शिक्षणाद्वारे ठरविली जाते"

Bhatnagar Suresh. (2007). Khothari Commission Recommendations and evaluation. Delhi : International Publication. Page no. 108

व्यक्तीच्या जीवनात येणाऱ्या सततच्या गरजा पूर्ण करण्यासाठी शिक्षणाची कास धरावीच लागते, म्हणून शिक्षणाचे अनन्य साधारण महत्त्व आहे. कारण कोणत्याही राष्ट्राचा विकास हा तेथील नागरिकांना दिल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या गुणवत्तेवरच अवलंबून असतो. शिक्षण ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे. आज देशाचा, जगाचा विकास होण्यासाठी शिक्षण ही प्रत्येक मुलाची गरज आहे.

बालकाचा जन्म झाल्यानंतर ते विशिष्ट वातावरणात जगते, या वातावरणात बालकाला अनेक अनुभव येत असतात. या अनुभवांतून त्याला कळत नकळत शिक्षण मिळत असते. त्याला सहज शिक्षण, अनौपचारिक शिक्षण म्हणतात. परंतु विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत क्षमतांच्या विकासाला प्रोत्साहन देऊन, त्यांच्यातील बौद्धिक जिज्ञासेचे शमन करून, त्यांना आदर्शाप्रत नेणाऱ्या शाश्वत मूल्यांचा विकास करण्याबरोबरच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे म्हणजे औपचारिक शिक्षण आणि हे शाळेचे सर्वात महत्त्वाचे उद्धिष्ट होय. हे उद्धिष्ट साध्य करण्यासाठी शाळेमध्ये आवश्यक ते वातावरण निर्माण केले जात असते. अशी वातावरण निर्मिती करण्यामधला सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे शिक्षक होय. शिक्षक हा शिक्षणप्रक्रियेतील महत्त्वाचा घटक आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यामध्ये शिक्षक महत्त्वाची भूमिका पार पाडत असतात.

शिक्षकांचे शिकविणे उत्तम व्हावे आणि विद्यार्थ्यांचे शिकणे घडावे यासाठी शिक्षकांनी आपली भूमिका समजून घेणे आणि ती चांगल्या पद्धतीने बजाविणे आवश्यक आहे.

शिक्षण प्रक्रिया म्हणजे शिक्षक व विद्यार्थी यांच्यात घडून येणाऱ्या आंतरक्रिया होय. या आंतरक्रिया घडून येत असताना शिक्षकांच्या वर्तनाचा विद्यार्थ्यांच्या वर्तनावर परिणाम होऊन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडण घडण होत असते. त्यामुळे शिक्षकांवर विद्यार्थ्यांच्या स्वविकासाचे उत्तरदायित्व अधिक असते. त्यादृष्टीने शिक्षकांनी स्वत:ला तयार ठेवणे गरजेचे आहे. त्यासाठी शिक्षण प्रशिक्षण अधिक उत्तम प्रकारे होणे गरजेचे आहे. शिक्षकांचे आशयज्ञान उत्तम हवेच पण त्याचबरोबर शिक्षकांमध्ये संवेदनशीलता, इतरांचे दृष्टिकोन समजावून घेण्याची पात्रता, विद्यार्थ्यांच्या आशा-आकांक्षा विद्यार्थ्यांच्या दृष्टीने समजावून घेण्याचे कौशल्य हवे. जी व्यक्ती परिपूर्ण आहे जी स्वत:ला व इतरांना योग्यप्रकारे ओळखते, आत्मविश्वासाची पात्रता जिच्यात आहे, तीच व्यक्ती उत्तम शिक्षक बनू शकते.

शिक्षणप्रक्रियेचे उद्दिष्टे साध्य करण्याच्या दृष्टीने शिक्षकाला अनेक कृती कराव्या लागतात. शिक्षकांच्या वर्गातील व वर्गाबाहेरील कृती, उक्ती, क्रिया-प्रतिक्रिया यांना अध्ययन अध्यापनाच्या दृष्टीने महत्त्व असते. त्यामुळे विद्यार्थ्यांना घडविणाऱ्या शिक्षकांची अध्यापन अभियोग्यता त्यांचे समायोजन व

शालेय घटनातील वैफल्यास शिक्षकांच्या प्रतिक्रिया जाणून घेणे अपेक्षित आहे. एकविसाव्या शतकाच्या उंबरठयावर असताना माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात आजच्या विद्यार्थ्यांचे भवितव्य हा विषय शिक्षकांसाठी महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी उत्कृष्ट संस्कारांची गरज आहे. विद्यार्थ्यांच्या मनाला सर्जनशील बनविणे हे शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट असले पाहिजे. त्यासाठी विद्यार्थ्यांच्या अंतकरणाचे रक्षण करण्याची जबाबदारी शिक्षकांवर आहे.

आजची शिक्षणप्रणाली ही विद्यार्थ्यांच्या सर्वांर्गीण विकासावर भर देते, त्यामुळे विद्यार्थी गतिमान होण्यासाठी शिक्षक स्वत: गतिमान असला पाहिजे. तसेच शिक्षक हा उत्तम आयोजक असावा, त्याने आपल्या अध्ययन अध्यापनाच्या अनुभूतीचे व्यवस्थित आयोजन करावे. जसे संकटाशी दोन हात जिद्दीने त्यावर करीन मात, नवे शोध, नवे ज्ञान या जगाची वाढविन शान.

असा आत्मविश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे आजची गरज आहे. कारण माध्यमिक शिक्षण हे जीवनाचे प्रवेशद्वार आहे. जीवनाला आवश्यक असणारी अंगभूत अत्यावश्यक कौशल्ये याच स्तरावर शिकविली जातात एका अर्थाने जीवनाची पूर्वतयारी माध्यमिक स्तरावर केली जाते. राष्ट्राचे मनोबल निर्माण करणारा हा शालेय स्तर आहे. या स्तरावरील विद्यार्थ्यांचा काळ म्हणजे कुमारावस्थेचा काळ, वादळी अवस्थेचा काळ या वयातील मुला मुलींना अनेक संभ्रमात्मक समस्या असतात. अनेक प्रश्न त्यांच्या मनात निर्माण होतात. या वयातील मुलांना योग्य अध्यापनाद्वारे समज देणे हे शिक्षकांचे काम आहे. त्यामुळे माध्यमिक स्तरावरील शिक्षकांमध्ये अध्यापन अभियोग्यता असल्यास मुलांना आवश्यक ते संपूर्ण ज्ञान मिळू शकते कारण अशा वयातील मुलांमध्ये जास्तीत जास्त ज्ञान घेण्याची लालसा असते. तसेच त्यांच्या चिकित्सक दृष्टिकोनामुळे अनेक नवनवीन प्रश्न त्यांच्या मनात उद्‌भवणारे असतात. अशा सर्वांना उत्तरे देण्यासाठी शिक्षकांमध्ये अध्यापन अभियोग्यता गरजेची आहे.

१.२ अध्यापन अभियोग्यता :

अभियोग्यता ही एक अशी व्यवस्था आहे की ज्यामध्ये काही गुणांचा अथवा गुणवैशिष्टयांचा संच असतो. जो सुयोग्य प्रशिक्षणातून, काही ज्ञानातून, आकलनातून अथवा कौशल्यातून विकसित होतो. सराव, संधी व प्रशिक्षण मिळाल्यास भविष्यात व्यक्ती विशिष्ट कौशल्य व ज्ञान संपादन करू शकेल असे ज्या गुणांच्या आधारावर सांगता येते त्यांना अभियोग्यता असे म्हणतात.

व्यक्तीमधील सुप्त गुणांच्या क्षमतांना अभियोग्यता असे म्हणतात. व्यक्तीची एखादे कार्य करण्याची पात्रता, शक्ती म्हणजे क्षमता होय. ही क्षमता म्हणजे चाचणीद्वारे मोजलेली व्यक्तीमधील

वर्तमानकालीन अवस्था आहे. वर्तमान स्थितीवरून मानवाची भविष्यकालीन क्षमता अभिप्रेत असते. अभियोग्यता ही सर्वसाधारण बुध्दिमत्तेपासून स्वतंत्र अशी विशिष्ट क्षमता असते आणि त्या क्षमतेमुळे व्यक्तीला त्या विशिष्ट क्षेत्रात चांगल्या प्रकारचे प्राविण्य संपादन करता येऊ शकते. अभियोग्यतेचा संबंध एखादया विशिष्ट कार्यक्षेत्रात मनुष्याला किती यश मिळू शकेल यांच्याशी निगडीत झालेला असतो.

एखाद्या कामामध्ये सफलता मिळण्यासाठी पहिली आवश्यक गोष्ट म्हणजे त्या कामासंबंधी अभियोग्यता असली पाहिजे. एखाद्या कामाबदद्ल व्यक्तीला आवड असूही शकते परंतु आवड असली तरी अभियोग्यतेशिवाय त्याला त्या विषयात गती प्राप्त होऊ शकत नाही. त्यामुळे व्यावसायिक निवड किंवा मार्गदर्शन केले जात असताना व्यक्तीच्या अभियोग्यतेचा विचार केला जाणे आवश्यक आहे.

एखादया विशिष्ट कार्यासंबंधी व्यक्तीला किती आस्था आहे याचे मापन अभियोग्यता चाचणीद्वारे केले जाते एखादया कार्यक्षेत्रासंबंधी विशिष्ट प्रकारचे प्रशिक्षण घेतल्यानंतर व्यक्तीला त्याचा कितपत लाभ होऊ शकतो आणि त्या कार्यात त्याला किती गती प्राप्त होऊ शकते याचा अंदाज घेण्यासाठी अभियोग्यता चाचणी उपयोगाची ठरते.

अध्यापन अभियोग्यता चाचणीद्वारे जे विद्यार्थी शिक्षक शिक्षणशास्त्र महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतात किंवा सेवारत शिक्षक आहेत अशांची अध्ययन अध्यापन अभियोग्यता तपासली जाते. विविध शाळांमधील शिक्षकांचा विद्यार्थ्यांविषयीचा दृष्टिकोन जाणून घेण्यासाठी शिक्षकांच्या मानसिक क्षमतेचा शोध घेणे, शिक्षकांची व्यवसाय विषयक माहिती व व्यवसायामधील आवडीचा शोध घेण्यासाठी या अध्यापन अभियोग्यता चाचणीचा उपयोग होतो.

त्याचप्रमाणे या चाचणीची उपयुक्तता मोठया प्रमाणात आढळून आली आहे, जसे अध्यापक निवडतांना शाळेमधील शिक्षकांचे अध्यापन योग्य/अयोग्य ठरविण्यासाठी उपयुक्त आहेत.

आजच्या शिक्षणप्रणालीनुसार विद्यार्थी गतिमान होण्यासाठी शिक्षकानेही स्वत: गतिमान असले पाहिजे, तसेच तत्पर असले पाहिजे. प्रस्तुत संशोधनात माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या ठिकाणी आढळून येणारी अध्यापन क्षेत्रातील गुण व कौशल्ययुक्त कार्यक्षमता म्हणजेच अध्यापन अभियोग्यता जाणून घेण्याचे ठरविले आहे.

१.२.१ अध्यापनाचा अर्थः

शिक्षण म्हणजे नवीन ज्ञान ग्रहण करण्याची क्रिया होय. ज्ञान ग्रहण करण्यासाठी ज्ञान देण्याची प्रक्रिया गरजेची असते. ही प्रक्रिया म्हणजेच अध्यापन होय. अध्यापनाच्या विविध शास्त्रज्ञांनी केलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

जेरोम ब्रुनर यांने अध्यापनशास्त्राचे स्पष्टीकरण पुढील शब्दांत केले आहे.

"A theory of instruction is prescriptive, because it establishes rules concerning the best ways to teach knowledge and skills, normative because it sets criteria and states the conditions for meeting these rules and descriptive, because it tells what has happened in the instructional process."

Pradeep Kumar. (2012). Advanced Method of Teaching. Mumbai : Himalaya Publication. Page no. 22

"Teaching is an intimate contact between a more mature personality and less mature one, which is designed to further the education of the latter."

Morrison H. C. 1934

Pradeep Kumar. (2012). Advanced Method of Teaching. Mumbai : Himalaya Publication. Page no. 29

"Teaching is the arrangement and manipulation of a situation in which there are gaps and abstructions which an indivual will seek to overcome and from which he will learn in the course of doing so."

Broucher J. 1939.

Echazarra, A. et al. (2016), How teachers teach and students learn: Successful strategies for school, OECD Education Working Papers, No. 130, OECD Publishing, Paris, http://dx.doi.org/10.1787/5jm29kpt0xxx-en.

"A decription of teaching as it was inprogress in the classroom could be secured by defining. Teaching as interaction, Interaction is used in its dictionary sence of mutual or reciprocalcation or influence."

Hughes, M. M. 1963.

Creating Effective Teaching and Learning Environments (2009). *https://www.oecd.org/berlin/43541655.pdf*

थोर तत्त्वचितंक व शिक्षणशास्त्रज्ञ Allfred यांनी अध्यापनविषयक विचार मार्मिक शब्दात मांडला आहे. "I have been much struck by the paralysis of though induced inpupils by the animles accumulation of precire knowledge inert and unutilized."

Hebrew Proverb. (2010). A child is not a vessel to be filled, but a lamp to be it. http://www.thechessdad.com/2009/11/a-child-is-not-a-vessel-to-be-filled-but-a-lamp-to-be-lit-hebrew-2

रशियन प्रोफेसर अलेक्झॅंड्रॉग्ह यांचे "The student is not avessel to be filled in but a lamp to be lighted."

Hebrew Proverb. (2010). A child is not a vessel to be filled, but a lamp to be it. http://www.thechessdad.com/2009/11/a-child-is-not-a-vessel-to-be-filled-but-a-lamp-to-be-lit-hebrew-proverb/

हे वाक्य आपल्याला विद्यार्थ्यांच्या डोक्यात माहिती ठासून भरणाऱ्या पारंपारिक अध्यापनापेक्षा त्यांची जीवन ज्योत उजळविण्यास मदत करणारे आधुनिक अध्यापन कसे भिन्न आहे हे समर्पकपणे सांगते.

अध्यापनाचा व्यापक अर्थ लक्षात येण्यासाठी अध्यापनाच्या व्याख्या पाहणे आवश्यक आहे.

"Teaching is an art, practice or profession of a teacher."

Webster.

Merriam Webster teaching definition. https://www.merriam-webster.com/dictionary/teaching

“To teach is to transform by informing to develop a rest for life long learning, to help pupils become students, mature, independent learners and architects of an existing, challenging future a kind of communion, a metting and merging of minds.”

Whilember S.

Lewis Gertrude M. (1966). The Evaluation of Teaching. United State : Department of Elementary kindergarten nursery Education National Education Association. Page no. 70

"Teaching is necessary to promote, guide and feciliatate the learning process."

Precent

Helen Timperley, Aaron Wilson, Heather Barrar, and Irene Fung. (2005). Teaching professional Learning and Development. New Zeoland : Iterative Best Evidence Synthesis Programme.
http://educationcounts.edcentre.govt.nz/goto/BES

"Successful teaching is teaching that brings about effective learning"

Masal

Helen Timperley, Aaron Wilson, Heather Barrar, and Irene Fung. (2005). Teaching professional Learning and Development. New Zeoland : Iterative Best Evidence Synthesis Programme.
http://educationcounts.edcentre.govt.nz/goto/BES

"Teaching is a development process and is a process of release of the pupils powers."

Dixcen

Kumar Pradeep, (2012). Advanced Methods of Teaching. Mumbai : Himalaya Publishing House. Page no. 6

अध्यापना संदर्भात गॅने म्हणतात, "Teaching is an act of interpersonal influence aimed at changing the ways in which other persons can or will behave."

Kumar Pradeep, (2012). Advanced Methods of Teaching. Mumbai : Himalaya Publishing House. Page no. 10

अध्यापनाच्या या व्याख्येनुसार व्यक्ती व्यक्तीमधील प्रभावाचा संबंध विचारात घेतलेला दिसतो. हा प्रभाव केवळ अर्थशून्य किंवा हेतूशून्य नसून दुस-या व्यक्तिच्या अपेक्षित वर्तनाच्या संदर्भात आहे. अध्यापन प्रक्रियेत याला महत्त्वाचे स्थान आहे.

'H.C. Morrison' यांनी म्हटले आहे, "Teaching is an intimate contact between a more mature personality and less mature which is designed to further the education of the letter."

Malik Mudasir Hamid, Pandith Aqueel Ahmad, (2008). Essentials of Instructional Technology. USA : Marsland Press. Page no. 135

स्किनर यांनी मात्र अध्यापनाची व्याख्या थोडया वेगळया पद्धतीने केलेली आहे. त्यांच्या मते, "Teaching is the arrangement of contengencies of reinforment."

Skinner B. F. Wikipedia https://en.wikipedia.org/wiki/B._F._Skinner

स्किनरची व्याख्या अध्यापनाला खूपच मर्यादित करते. Ed,imd Amidon म्हणतात, Teaching is defined as an interactive process, primarily involving classroom talk place between teacher and pupil and occurs during definable activities."

Suresh K., Srinivasan P., (2014). Effective Teaching Makes Successful Teacher. : EPRA International Journal of Economic and Busness Review.

अध्यापन क्रियेत विद्यार्थ्याला महत्त्व दिले जाते. Teaching refers to the multiple tasks carried out by the teaching for leading the learners to the expected learning.

या व्याख्येत शिक्षकाला जास्त वाव किंवा त्याला दृष्टीस आणण्याचा प्रयत्न केला आहे. शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांसाठी जे कार्य करतो त्याचा समावेश अध्यापन कार्यात होतो. शिक्षक अशी व्यक्ती असते की, जी विद्यार्थ्यांना Intended learning अध्ययनासाठी प्रवृत्त करते. याचाच अर्थ असा की, विद्यार्थ्यांना काय शिकविले पाहिजे व त्यांनी काय शिकले पाहिजे याबाबत शिक्षक ठरवितो.

विद्यार्थ्यांना शिकविणे याचा अर्थ त्यांना अध्ययनाला प्रवृत्त करणे व त्यांच्या अध्ययनाच्या क्रियेला योग्य ते मार्गदर्शन करणे.

१.२.२ अध्यापन प्रक्रिया :

अध्ययन अध्यापन प्रक्रियेचे दोन महत्त्वाचे पैलू आहेत त्यामध्ये अध्ययन व अध्यापनाच्या अंतर्गत प्रत्येक विषयातील आशयज्ञान विद्यार्थ्यापर्यत पोहचविण्यासाठी शिक्षक आशयानुरूप पद्धती, शैक्षणिक साधने याचा वापर करून आशय आकलन सुलभ कसे होईल यासाठी प्रयत्न करतात, त्यांची मांडणी करतात व सादरीकरण करतात. या त्यांच्या आशय सादरीकरणाच्या प्रक्रियेस अध्यापन म्हणतात.

अध्ययनकर्त्यास अध्ययनास मदत करणारी कला म्हणजे अध्यापन होय एवढेच नव्हे तर ज्ञान, कौशल्य यांचे अनुदोशनाबरोबरच विद्यार्थ्यांना आशय ग्रहन करण्यासाठी प्रेरीत करणे होय. तात्पर्य अध्यापन ही दोन व्यक्तींमधील क्रिया असून, व्यक्ती वर्तनाचा दुसऱ्या व्यक्तीच्या अपेक्षेप्रमाणे बदलणारा मार्ग असतो.

अध्ययन अध्यापन यामध्ये निकटचा सहसंबंध जोडण्याचा प्रयत्न १९५० नंतर स्मिथ, गेज, क्लार्क, थॉमस ग्रीक, विल्यम बर्ट, ब्लूम या शिक्षणतज्ज्ञांनी केलेला आहे. मात्र काहींच्या मते अध्ययन आणि अध्यापन हया दोन्ही स्वतंत्र प्रक्रिया आहेत. एकाची दुसऱ्यावर क्रिया होईलच असे नाही, असे

मानणारा स्मिथ म्हणतो, अध्ययन व अध्यापन या दोन स्वतंत्र प्रक्रिया असून त्यांचा परस्परावर परिणाम होईल असे नाही. अध्यापनातून प्रत्येकवेळी अध्ययन होईलच असे नाही. अध्यापन कृती ही एक शृंखला अभिक्रियाच असते. शिक्षक एका नंतर एक मुदद्ा स्पष्ट करीत असतानाच त्या मुद्यासाठी शैक्षणिक साधने कौशल्य उदा. दाखले, स्पष्टीकरण, विविध उपकरणे पद्धती, विद्यार्थ्यांचा सहभाग घेऊन आशय आकलनशील करण्याचा प्रयत्न करीत असतो. मात्र याचा परिणाम विद्यार्थ्यावर झाला नाही व त्याने अध्ययन केले नाही, तरी शिक्षकाने अध्यापन केलेले असतेच म्हणून स्मिथच्या मते शिक्षकाने अध्यापन केले तरी विद्यार्थी अध्ययन करतोच असे नाही.

क्लार्कच्या मते अध्यापनाचे फलित म्हणून अध्ययन घडणे अपेक्षित आहे. जर अध्यापनातून अध्ययन होत नसेल तर, अध्यापन झाले नाही असे म्हणता येईल. इतर घनिष्ठ सहसंबंध अध्यापन अध्ययनाचा असावयास हवा असाच विचार गेज एन. एन. यांनी मांडलेला आहे.

वरील विवेचनावरून असे मानले जाते की, शिक्षकाला जी माहिती आहे ती विद्यार्थ्यांना नसते म्हणून शिक्षकांकडील माहिती ज्ञान विद्यार्थ्यांना देऊन त्यांना शहाणे करणे म्हणजे आशयाचे शिक्षकाकडून सादरीकरण करणे व त्या माहितीवर आधारित प्रश्न शिक्षकाने विचारल्यास त्याची उत्तरे देणे ही सर्वसाधारण शिक्षक विद्यार्थी यांची धारणा असते. याप्रमाणे नियोजित पाठयक्रम शिकविणे म्हणजे अध्यापन होय. परंतु शिक्षणशास्त्रदृष्टया अध्यापन म्हणजे विद्यार्थी वर्तनाला आकार देणे विद्यार्थ्यांच्या क्षमतांचा आविष्कार होईल असे पोषक वातावरण तयार करणे होय.

Kumar Pradeep, (2012). Advanced Methods of Teaching. Mumbai : Himalaya Publishing House. Page no. 6-10

१.२.३ अध्यापन प्रक्रियेची लक्षणे :

१. अध्यापन प्रक्रियेमध्ये अध्यापक क्रियाशील, सर्जनशील व उपक्रमशील असतो.

२. विद्यार्थ्यात वर्तनपरिवर्तन घडविण्यासाठी विविध प्रकारच्या क्रियाप्रतिक्रिया केल्या जातात.

३. यामध्ये माहिती प्रक्रियाकरण, संप्रेषण व नियंत्रण आणि व्यवस्थापन या कृतींचा समावेश असतो.

४. कृतीद्वारे घडवून आणावयाची परिवर्तन योजना म्हणजे अध्यापन होय.

५. अध्यापनाच्या प्रक्रियेमध्ये अनुकूल पर्यावरणाची रचना असणे आवश्यक असते. त्यात अध्ययन अध्यापनाच्या तत्त्वाचा समावेश असावा. ते अध्ययनकर्त्यांच्या क्षमतांशी संबंधित असावे. अपेक्षित उद्दिष्टये फलदृप करणारी प्रणाली आणि जीवन जगण्यासाठी योग्य व उपयोगी असावी.

६. **अध्यापन प्रक्रियेची अंगे** :

अध्यापन प्रक्रियेच्या चार अंगाची मांडणी करण्यात आलेली आहे त्यामध्ये-

अभ्यासक्रमाचे नियोजन :

राष्ट्राची-देशाची आणि शिक्षणाची ध्येये व आशयाची उद्धिष्टये विचारात घेऊन केलेली पाठयक्रम रचना व अध्यापनासाठी पाठयांशाची निवड करणे.

अध्ययन आंतरक्रिया :

विद्यार्थी अध्ययन करण्यासाठी मानसिक व बौद्धिक विचारसरणी तयार करतात. क्लुप्त्या शॉर्टफॉर्म, सारांश, लक्षात ठेवण्यासाठी स्वतःची स्वतंत्र योजना याची अमंलबजावणी करतात.

मापन क्रिया :

अध्ययन. अध्यापन, स्मरण यांचा प्रभाव पाहण्यासाठी मापन तंत्रे साधने चाचण्या संपादणूक चाचण्या व इतर अनुषांगिक चाचण्यांची निर्मिती करणे, त्यांची अंमलबजावणी करून माहितीचे संकलन व विश्लेषण करणे.

मूल्य निर्धारण :

विश्लेषित माहितीच्या अधारे मानवीमूल्ये व बुद्धिप्रामाण्यतेच्या दृष्टिकोनातून मूल्यांची निश्चिती करणे.

७. उद्दिष्टानुगामी अध्यापन :

कोणत्याही विषयाचे आशयाचे अध्यापन करण्यापूर्वी त्यांची उद्दिष्टये निश्चित करूनच अध्यापन करण्यात येते. उद्दिष्टांचे विविध स्तर व प्रकार असतात. जसे बोधात्मक क्षेत्रातील उद्दिष्टये, भावात्मक क्षेत्रातील आणि वर्गाध्यापनाची उद्दिष्टये इत्यादी.

८. विद्यार्थ्यांचा कृतीयुक्त सहभाग :

प्रभावी अध्ययन अध्यापन प्रक्रियेत विद्यार्थ्यांचा सक्रीय सहभाग असतो. त्यांना अधिकतम कृतीप्रवण केले जाते. ऐकणे, श्रवण करणे, लिहिणे पाहणे-बोलणे, आकृती चित्र काढणे, प्रयोगकृतीत सक्रीय सहभागी होणे, पुष्ठाकाम, मातीकाम, प्रश्नोत्तरे, कथा-कथन, नाटयीकरण, आलेख, गणिती उदाहरणे, प्रक्रिया, भाषण स्पर्धा, गायन, रांगोळी, खेळ इत्यादीमधील सक्रीय सहभाग.

९. प्रेरणादायी अध्यापन :

अध्यापनातून विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्याची, नवनवीन ज्ञान संपादन, कौशल्य संपादन, प्रयोगकृती करणे, संगणकीय माहिती घेणे, नव नवीन संकल्पना अंगीकृत करण्याची प्रवृत्ती विद्यार्थ्यामध्ये बळावण्याची शिक्षकाने प्रेरणा देणे आवश्यक असते.

१०. अध्ययन शृंखला निर्माण करणे :

अध्यापन करतांना नवीन ज्ञानाचा पूर्वज्ञानाशी संबंध जोडणे, त्यासाठी उदाहरणे, स्पष्टीकरण, कथा, गोष्टी विद्यार्थ्यांच्या पूर्वसंकल्पना, त्यांचे पूर्वज्ञान यांचेशी अनुरूप असतील, जोडले जातील अशी उदाहाणे दाखले व लक्षात ठेवण्याच्या क्लृप्त्या, विनोद, स्थानिक बाबी इत्यादीचा वापर करून अध्ययन अध्यापनात रंजकता व सुकरतेबरोबरच पूर्वज्ञानाशी सांगड घालून नवीन ज्ञानाची जोडणी शिक्षकाला व विद्यार्थ्यांना त्यांच्या बोधात्मक सरंचनेत करावी लागते. तेव्हाच आशयाची एक शृंखला निर्माण होऊ शकते व आशय विद्यार्थ्यांच्या दीर्घकाळ लक्षात राहतो.

११. विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्त्वाचा आदर राखणे :

प्रत्येकाला स्वतंत्र व्यक्तीमत्त्व असते याची जाणीव शिक्षकाने ठेवूनच अध्ययन अध्यापन प्रक्रियेतील आंतरक्रियेत विद्यार्थ्यांच्या मनाला प्रतिष्ठेला ठेच पोचणार नाही याचे भान ठेवून अध्यापन करावे. लोकशाहीतील स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्त्वाचा अवलंब करावा, शिक्षकांची मनोवृत्ती लोकशाहीयुक्त असल्यास वर्गातील वातावरण अध्ययन अनुकुल होते.

१२. चांगले संस्कार, वृत्ती, सवयीची जोपासना :

शिक्षक विद्यार्थी यांच्यात आंतरक्रिया ही केवळ अध्ययन अध्यापन विषयक आशयापूवर्तीच असते असे नाही, तर शिक्षकांचा पोषाख त्यांच्या चांगल्या वाईट सवयी, अभ्यासूपणा, आपुलकी जिव्हाळा, प्रेम, विद्यार्थ्यांशी वर्तन शिक्षकांचे आचार, विचार, शाळेतील शाळाबाहय वर्तन, सभा संम्मेलने, मित्र परिवार, सामाजिक, राजकीय, धार्मिक प्रभाव त्यांच्या विषयातील आशयांचे स्पष्टीकरणे विद्यार्थी आशय विषयज्ञान संपादनाबरोबरच अनेक बाबतीत ज्ञान कौशल्य, वृत्ती, सवयी अवांतर बार्बांचे अध्ययन करीत असतो की, ज्या त्यास कोणी शिकविलेल्या नसतात. त्यामुळेच त्यांच्यात सामाजिक समस्येकडे पाहण्याचा दृष्टिकोन, चिकित्सकपणे विचार करण्याचा दृष्टिकोन व शास्त्रीय दृष्टिकोन विकसित होऊ शकतो.

१३. प्रशिक्षणाचे उपयोजन :

शाळा ही शिक्षकांसाठी प्रयोगशाळा असते. शिक्षकाने व्यवसायपूर्ण घेतलेले प्रशिक्षणाचे उपयोजन करून पाहण्याचे व्यासपीठ कार्यशाळा, स्वत:कडे असलेले कौशल्य, क्षमता, ज्ञान प्रेरणक्षमता यांची कसोटी लागण्याचे ठिकाण असते प्रशिक्षणात अध्ययन विषयक नियम, प्रयोग प्रत्येक अवयवांची कार्यकक्षा तपासणी, बुद्धिमत्ता, स्मरण विस्मरण अध्ययन अध्यापनविषयक नियम, उपपत्ती कितपत लागू पडतात, त्यात कोणते बदल अपेक्षित आहेत हे तपासणे, विद्यार्थ्यांना कार्यप्रवृत्त, अध्ययन प्रवृत्त होण्यासाठी कोणत्या मानसशास्त्रीय अध्ययन विषयक तत्त्वाचा वापर करावा, त्याचा वापर करून त्याची परिणामकारकता तपासणे व स्वत:चे अध्यापन प्रभावी करणेसाठीची उपयोजनात्मक प्रयोगशाळा असते.

१४. अध्ययन अध्यापनाचा संबंध प्रस्थापित करणे :

अध्ययन अध्यापनाचा संबंध प्रस्थापित करून अध्यापन केल्यास बर्टन म्हणतो, अध्यापन अधिक परिणामकारक उद्दिष्टये साध्य करण्याच्या दृष्टीने अध्ययन अनुभवांची मांडणी करता येईल. त्यानुसार अध्यापन साहित्य अध्यापन रचना केल्याने अनेक गुंतागुंतीच्या संकल्पना चांगल्यारीतीने स्पष्ट करता येतील.

Portia R. (2016).Contemporary India and Education. Tiruchirappalli : Bharathidasan University. Page no. 30-35

१.२.४ परिणामकारक अध्यापन अभियोग्यता :

प्रत्येक शिक्षकाला आपले अध्यापन प्रभावी विद्यार्थ्यांना आकलनशील व्हावे असे वाटत असते. अध्यापन प्रक्रिया परिणामकारक होण्यासाठी अध्यापन चक्राचा वापर शिक्षकांनी करणे आवश्यक आहे. या अध्यापन चक्राचा प्रभावी वापर शिक्षकांची अध्यापन अभियोग्यता दर्शवते.

अपेक्षात्मक कृती :

यामध्ये शिक्षक विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान आणि अध्यापन प्रक्रियेचा अभ्यास करतात व त्याचप्रमाणे अध्यापनाची रचना व मांडणी करतात कारण गेज यांच्या मते, अध्ययनाचा अभ्यास करून अध्यापन प्रक्रियेत सुधारणा करता येणार नाही. कारण अध्ययनाच्या अभ्यासाने वर्गातील समस्या सोडविता येणार नाहीत म्हणून शिक्षक अध्यापन कसे करावे त्यासाठी अपेक्षित कृती कोणत्या याचे नियोजन करणे आवश्यक असते.

क्रिया प्रतिक्रियात्मक कृती :

योग्य पोषक व त्यातील सहसंबंध बळकट व्हावा म्हणून दृढीकरण योजनांची आखणी करावी लागते. शिक्षकाने अध्यापन घटकांची मांडणी आखणी करतांना दृढीकरणाची योजना तयार करावी बहिर्मुख विद्यार्थ्यांसाठी समध्यंतर योजना अंतर्मुख विद्यार्थ्यांसाठी सातत्यपूर्ण दृढीकरण योजना, अनुभवी शिक्षकाने आपल्या अनुभवाच्या जोरावर आपली योजना तयार करून वापर करता येईल म्हणजे वर्गातील क्रिया प्रतिक्रियांमधील सहसंबंध मजबूत होतील.

रचनात्मक कृती :

योग्य अध्यापन पद्धतीची निवड करून त्यांच्या प्रभावी सादरीकरणासाठी अनुकूल अध्ययन परिस्थितीची योजना करणे, अध्यापन प्रभावी होण्यासाठी म्हणजेच त्यातून अध्ययन घडण्यासाठी अनुकूल वातावरण निर्मितीची व आशयानुरूप अध्यापन पद्धतीची गरज असते. शिक्षकाने स्वत:ची मन:स्थिती चांगली उल्हासित ठेवून विद्यार्थ्यांच्या सहभागाने, सहकार्याने विविध सरंचनांची मांडणी करून, अध्यापनात विविध शैक्षणिक व तांत्रिक साहित्याचा वापर करून, अध्यापन करताना संकेत-शृंखला-विभेदन संकल्पना, तत्त्व, नियम, समस्या निराकरण असा क्रम ठेवल्यास अध्ययन पोषक वातावरण निर्मिती होऊ शकते.

James Ko. (2014). Effective Teaching. Education Development Trust. www.educationdevelopmenttrust.com Page no. 29-31

१.२.५ अध्यापन अभियोग्यता स्तर :

अध्यापन अभियोग्यतेचे चार स्तर बिग्ज एम. एल. यांनी मांडलेले आहेत. त्याचे विवेचन पुढीलप्रमाणे आहे.

स्वायत्त अध्यापन अभियोग्यता स्तर :

मूल जन्मताच क्रियाशील असते. त्याच्यामध्ये उत्सुकता, जिज्ञासा, निरीक्षण शक्ती, धडपड, वस्तुच्या बाबतीत त्याचे गुण जाणून घेण्यासाठी हाताळणे, चाखणे मोड तोड करणे इत्यादी गुणधर्म असतात, या व्यक्तीवैशिष्टयावरच या स्तरावरील अध्यापन कार्य अवलंबून असते. यामध्ये शिक्षण हे बालककेंद्रीत असते. यामध्ये बालकांच्या आवडी निवडीनुसार शिक्षण दिले जाते, त्यावर कोणताही दबाव आणून शिक्षण दिले जात नाही. अध्ययनास अनुकूल वातवरण निर्मिती करून त्याची मर्मदृष्टी जागृत करण्याचे कार्य करण्यात येते. स्वअध्ययनातून स्वविकास या तत्त्वानुसार विद्यार्थ्यांना संधी देऊन त्यास आवडतील त्याप्रमाणे अध्ययन अनुभवांची निवड करण्यास सुचविले जाते. यासाठी स्वयंशोधन,

क्रीडन पद्धतीचा वापर केला जातो. त्यासाठी आवश्यक ती शैक्षणिक सामग्री रचना साहित्य इत्यादीची सुविधा उपलब्ध करून ठेवली जाते. विद्यार्थी सक्रिय, क्रियाशील असतो तर शिक्षक नेतृत्व करणारा सूचनक, मार्गदर्शक, निरीक्षक असतो.

स्मृती स्तरावरील अध्यापन अभियोग्यता :

या स्तरावरील अध्ययन अध्यापन हे निम्न स्तरावरील पाठांतराने केलेले अध्ययन असते. त्यामध्ये विचार, तर्क, अनुमान, स्वतःची आकलन करण्याची व उपयोजन करण्याची प्रवृत्ती नसते. केवळ जसे आहे तसे एखादी कविता पाठ करावी त्याप्रमाणे कोणताही आशय पाठ करण्याकडेच कल असल्यामुळे त्यास दबावाखाली झालेले टिकावू नसलेले अध्यापन म्हटले जाते. यामध्ये दोन प्रकारे शिक्षण घेतले जाते. यांत्रिक स्मृती व तर्कशुद्ध स्मृती, या दोन्ही स्तरावरील अध्ययन म्हणजे स्मृती स्तरावरील होय. वर्तनवादी यांत्रिक स्मृतीला महत्त्व देतात तर साकल्यवारी तर्कशुद्ध स्मृतीला महत्त्वपूर्ण मानतात. प्राथमिक शाळांमधून उजळणी, बाराखड्या, बडबड गिते यांचे पाठांतरण करून घेतले जाते परंतु हया स्तरावर मुलांना मानसिक ताण जाणवू लागतो म्हणून शिक्षण तज्ज्ञांच्या मते हा स्तर बुद्धिविकासात महत्त्वपूर्ण भर घालित नाही. या स्तरावरील अध्ययन अध्यापनाचा हेतू ज्ञान कंठस्थ करणे व आवश्यकतेनुसार त्यांची स्मृती जागृत करून सादर करणे, यासाठी आशयांचे एकत्रित पाठांतरण करावे लागते. मात्र या स्तरावर केवळ ज्ञान माहिती तेही त्याचा अर्थबोध होईल असे नाही. यामध्ये स्मृतीवर ताण पडतो, ज्ञान प्राप्तीसाठी इतर पद्धतीचा वापर केला जात नाही, विचारालाही स्थान नसते.

आकलन स्तरावरील अध्यापन :

या स्तरावरील अध्यापनात आशयाचे आकलन महत्त्वपूर्ण ठरते शिक्षकांचे कथन व्याख्यान यांचे आकलन होते. शिक्षक आशय सादरीकरण करतात. अनेक पैलू, मुद्दे क्रमनिहाय मांडणी करून निवेदन करतात, तुलना करतात, संबंध स्पष्ट करतात, नियम सिध्दांत यांचा उपयोग सांगतात, सामान्यीकरण करून घेतात. शिक्षक विद्यार्थ्यांना विषयाचे आकलन व्हावे म्हणून विविध पध्दतीचा स्वतः वापर करतात अधून मधून प्रश्न विचारतात विद्यार्थ्यांना आशय आकलन झाला किंवा नाही हे पाहतात विद्यार्थ्यांना सतत बाहय प्रेरणेचा वापर शिक्षक करीत असतात.

चिंतन स्तरावरील अध्यापन :

ज्ञान, आकलन यावरील उच्च स्तर हा चिंतनाचा असतो. यामध्ये विद्यार्थी स्वतः क्रियाशील असून त्याने संपादित केलेले ज्ञान, माहिती, पूर्वानुभव, घटना तथ्ये यांची फेररचना करून ज्या

समस्येची उकल करावयाची आहे, त्या समस्येशी संबंधित पूर्वानुभव व चिंतन या आधारे अनेकमार्गी विचार केला जातो व त्यापैकी कोणत्या मार्गाचा, विचाराचा वापर केल्याने समस्यांचे निराकरण होईल हे मनोमन वैचारिक स्तरावर पाहिले जाते. नंतर त्या विचाराची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली जाते. अशी अंमलबजावणी करताना शास्त्रीय दृष्टिकोन व शास्त्रीय पध्दतीचा वापर केला जातो, असा वापर करताना पूर्वग्रह, अंधश्रद्धा दूर ठेवून प्रत्यक्ष घटना, निरीक्षणांच्या नोंदी, तर्क, अनुमान यांचा आधार घेतला जातो. यामध्ये विद्यार्थी स्वत: तथ्यांचा शोध घेतो, त्याचा पडताळा पाहतो, प्रायोगिक पडताळा पाहतो, नवीन नियम, सिद्धांत, रचनात्मक कार्य, नवीन आराखडा, उपकरणे आवश्यकता असेल त्या साधनात बदल, सामाजिक, धार्मिक, आर्थिक नवीन विषयक समस्यांची उकल करण्याची पात्रता अशा चिंतनपर अध्ययन अध्यापनातून येते. नवनवीन शोधाची जननी चिंतनपर विचार व त्यादृष्टीने अध्यापन असते.

Beena S., (1995). Determinants of Teacher effectiveness. Ambala Cantt: The Indian publications, 38-39

१.२.६ अध्यापन अभियोग्यता असणाऱ्या शिक्षकांची वैशिष्टये :

अध्ययन अध्यापनामध्ये अध्यापकांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. अध्यापन ही द्विकेंद्री प्रक्रिया आहे. म्हणून अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्याबरोबरच अध्यापकाचाही अध्यास करणे आवश्यक आहे. अध्यापकाविषयी विविध प्रश्न नेहमी आपल्या मनात येतात. समाजातही तेच प्रश्न वारंवार उपस्थित केले जातात. यशस्वी शिक्षक कोणास म्हणावे? शिक्षकांच्या अंगी कोणकोणती गुणवैशिष्टये असावीत? शिक्षकांची भूमिका कोणती? या सर्व प्रश्नांची उत्तरे आपणास सर्वसामान्य निरीक्षणाद्वारे देता येतील. तसेच शिक्षकांच्या गुणवैशिष्टयासंबंधी जी संशोधने झालेली आहेत त्यांच्या आधारे प्रभावी शिक्षकांची गुणवैशिष्टये लक्षात घेता येतील.

हार्ट यांचे संशोधन :

यांनी विद्यार्थ्याकडून आवडत्या व नावडत्या शिक्षकाविषयी मते गोळा केली. विद्यार्थ्यांनी आपणास शिक्षक का आवडतात व का आवडत नाही याची करणे दिली आहेत. त्यामध्ये शिक्षक आवडण्याची कारणे यामध्ये शिक्षकांचा सुस्वभाव, आनंदी व विनोदी बुद्धि, विद्यार्थ्याविषयी आस्था, प्रेम, जिव्हाळा बाळगणारे शिक्षक, विद्यार्थ्यांना समजून घेणारे शिक्षक, अध्यापनात गोडी निर्माण करणारे शिक्षक, भेदाभेद न करणारे शिक्षक, मित्राप्रमाणे बरोबरीच्या नात्याने वागणारे शिक्षक, वर्ग

योग्य प्रकारे ताब्यात ठेवणारे शिक्षक, उदाहरणे देऊन स्पष्टीकरण करणारे शिक्षक, विद्यार्थ्यांना सर्व दृष्टीने मदत करणारे शिक्षक इत्यादी.

कमल अरोरा यांचे संशोधन :

यांनी प्रभावी व अप्रभावी शिक्षक यांच्यासंबंधी संशोधन केलेले आहे. त्यांच्या संशोधनानुसार प्रभावी शिक्षकांच्या अप्रभावी शिक्षकांच्या तुलनेत पुढील गोष्टी आढळून आल्या. त्यामध्ये शिक्षक होण्याचा निर्णय जे शिक्षक स्वत:हून घेतात ते शिक्षक प्रभावी असतात. शिक्षक व्हायला अन्य कोणी भाग पाडल्यामुळे किंवा नाईलाज म्हणून शिक्षक झालेले शिक्षक निष्प्रभ ठरतात. स्वत: नियोजन करणारे विविध कार्यक्रम राबविणारे व जबाबदारीने काम करणारे शिक्षक प्रभावी असतात. जबाबदारी न स्वीकारणारे शिक्षक निष्प्रभ असतात. अध्यापनाशिवाय इतर बाबीकडे लक्ष न देणारे शिक्षक प्रभावी असतात परंतु जे शिक्षक अन्य परीक्षा देतात, अन्य व्यवसाय करतात त्यांचे अध्यापनाकडे दूर्लक्ष होते असे शिक्षक निष्प्रभ ठरतात. प्रभावी शिक्षकांचा आपल्या सहकाऱ्यांबद्दल चांगला दृष्टिकोन असतो विद्यार्थ्यांबद्दलही चांगले मत असते, लोकशाही दृष्टिकोनाचा ते पुरस्कार करतात. दैनदिन अध्यापनात शैक्षणिक साहित्याचा वापर करणारे शिक्षक प्रभावी शिक्षक असतात. शाळेपासून दूर राहणाऱ्या शिक्षकांचा त्यांच्या दैंनदिन अध्यापनावर विपरीत परिणाम होतो. प्रभावी शिक्षक व्यवसायासंबंधी पूर्णपणे समाधानी असतात, हे समाधान ते विद्यार्थ्यांच्या सहवासातून यशातून मिळवितात.

डेव्हिड रियाम्स यांचे संशोधन :

यांनी शिक्षकांचा अभ्यास करून शिक्षकांचे चांगले व निकृष्ट वर्तनाच्या संदर्भात निष्कर्ष मांडलेले आहेत. त्यामध्ये चांगल्या शिक्षकांच्या वर्तनाच्या बाबतीत महत्त्वाकांक्षा असलेले शिक्षक, वाचनात रस घेणारे शिक्षक, कोणतेही काम स्वेच्छेने करणारे शिक्षक, विद्यार्थ्यांच्या संपर्कात रमणारे शिक्षक, सौजन्यपूर्णता व्यक्त करणारे शिक्षक, विविध कला कौशल्यात अभिरूची असणारे शिक्षक, समायोजन साधणारे शिक्षक, इतरांबद्दल उदार दृष्टिकोन बाळगणारे शिक्षक इत्यादी. तसेच शिक्षकांच्या वर्तनाची निकृष्ट वैशिष्टये यामध्ये विद्यार्थ्याबद्दल मत व्यक्त करतांना प्रतिकूल भूमिका बाळगणारे शिक्षक, भाषेवर प्रभुत्व नसणारे शिक्षक, नेहमी टीकाकाराची भूमिका बाळगणारे शिक्षक, भावनिक समायोजनाबद्दल फारसे समाधानी नसणारे शिक्षक आणि स्वच्छेने काम न करणारे शिक्षक इत्यादी.

पालमर अदावल यांचे संशोधन :

यांनी शिक्षकांची सामान्य व विशिष्ट गुणवैशिष्टये शोधण्याचा प्रयत्न केला. सामान्य गुणवैशिष्टयांत आरोग्य, संतुलित विचार, चांगल्या सवयी, उत्तम नैतिक जीवन, चांगले सामाजिक

संबंध सहकार्य, भावनिक स्थैर्य इत्यादी गुणांचा समावेश आहे. विशिष्ट गुणवैशिष्टयात विषयज्ञान, ज्ञान देण्याचे सामर्थ्य, विद्यार्थ्याला समजून घेण्याची वृत्ती विद्यार्थ्याविषयी प्रेम, नेतृत्व, वर्गनियंत्रण, रचनात्मक वृत्ती, अध्ययन क्षमता इत्यादी गुण समाविष्ट आहेत.

Katherine McKnight, (2007). What makes an effective teacher? George Manson University. http://katherinemcknight6/pdf/

१.२.७ शिक्षकांचे वर्गातील अध्यापन वर्तन :

शिक्षकांचे वर्गातील स्थान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. शिक्षक वर्गात ज्या कृती किंवा वर्तन करतो ते विद्यार्थ्यांच्या अध्ययनाशी निगडित असते. वर्गात चालणाऱ्या दळणवळणामध्ये शिक्षक ५५.२० % ते ८०.७०% इतक्या प्रमाणात संदेश देण्याचे कार्य करतो. यालाच आपण अनुदेशन असेही संबोधतो. शिक्षक केवळ एकच प्रकारे अनुदेश सादर करतो असे नाही, तर शिक्षकाला जे द्यावयाचे असते ते, विद्यार्थ्याला मिळण्याच्या दृष्टीने शिक्षक विविध कृती करतो. या विविध कृतीचा अंतिम उद्देश्य विद्यार्थ्यापर्यंत कमीत कमी वेळात परिणामकारकपणे व यथार्थपणे संदेश पोहोचावा हाच असतो. पंरतु कोणत्या अध्यापनकृती केल्या म्हणजे अपेक्षित संदेश विद्यार्थ्यापर्यंत पोहचेल या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी शिक्षण तज्ज्ञांचे लक्ष शिक्षकांच्या वर्तनविश्लेषणाकडे वेधले गेले. वर्गात चालणाऱ्या विविध प्रकारच्या वर्तनांचे विश्लेषण करण्यासाठी विविध शिक्षणतज्ज्ञांनी विविध प्रकारची तंत्रे विकसित केली. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यात चालणाऱ्या आंतरक्रियांचा अभ्यास केला.

James H. (2007). Quality of Eddective Teachers IInd Edition. ASCD Publication.www.ascd.org/.../Section-II@-Teacher-Responsibilities and Teacher-Behaviors.aspx

१.२.८ शिक्षकांच्या आंतरक्रिया :

एका ठिकाणी असलेल्या व्यक्ती व्यक्तींमध्ये होणाऱ्या क्रियांना आंतरक्रिया म्हणतात. या आंतरक्रिया दोन प्रकारच्या असतात. त्यामध्ये अभाषिक आंतरक्रियांच्या अंतर्गत न बोलता प्रत्यक्ष कृतीने होणाऱ्या देवघेवीस अभाषिक आंतरक्रिया म्हणतात तर भाषिक आंतरक्रियांच्या अंतर्गत वर्गामध्ये शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये होणाऱ्या भाषिक देवघेवीची क्रिया यांना भाषिक आंतरक्रिया म्हणतात. भाषिक आंतरक्रियांची विभागणी मुख्यता तीन भागामध्ये केली जाते त्यामध्ये शिक्षकांचा पुढाकार व प्रतिसाद, विद्यार्थ्यांचा पुढाकार व प्रतिसाद आणि स्तब्धता वा गोधळ यावरून भाषिक आंतरक्रियेचे प्रकार पाडता येतात. यामध्ये शिक्षक वर्गसमुह आंतरक्रिया, शिक्षक विद्यार्थी आंतरक्रिया,

विद्याथी विद्यार्थी आंतरक्रिया यामध्ये सुसंवाद प्रस्थापित झाला तरच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वात व ज्ञानसंपादनात सुयोग्य बदल झालेले आढळून येतील.

Helena J. M. Pennings, Jan van Tartwijk, Theo Wubbels, Luce C. A. Claessens, Anna C. van der Want, Mieke Brekelmans (2007). Real time teacher student interection A dynamic system approach. Teaching and Teacher Education. journal homepage: www.elsevier.com/locate/tate

१.२.९ अध्यापन प्रक्रियेत शिक्षकाचे स्थान :-

शिक्षणाची उद्दिष्टे व अभ्यासक्रम शासन ठरवित असले, तरी त्याची अमंलबजावणी करण्याचे कार्य हे शिक्षकालाच करावे लागते. 'विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास' हे शिक्षणाचे ध्येय असल्यामुळे हा सर्वांगीण विकास घडवून आणण्याचे कार्य शिक्षकाचे आहे. म्हणूनच शिक्षकाला शिक्षणप्रक्रियेचा कणा म्हटल्या जाते. उद्दिष्टपूर्तीचा वर्गांतर्गत व वर्गबाहय जे अध्ययन अनुभव त्याला द्यावे लागतात त्यातून विद्यार्थ्यांचा कितपत विकास झाला हे मूल्यमापन पद्धतीने पाहिले जाते व त्यावरुन शिक्षणाची उद्दिष्टे कितपत साध्य झालीत याचा अंदाज घेता येतो. केवळ विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासापुरतेच शिक्षकाचे कार्य मर्यादित असते असे नसून संस्कृतीचा जोपासक, संवर्धकही तो असतो. संस्कृतीच्या वारश्याचे जतन, संगोपन व संक्रमणाची जबाबदारीही त्याची असते. तेव्हा त्याचा दर्जा किती महत्त्वाचा आहे हे सहज लक्षात येते. शिक्षकाच्या सर्वोच्च दर्जाबाबत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात (१९८६) म्हटले आहे की,

"The Status of the teacher reflects the socio-culture ethos of a society"

राष्ट्रीय शिक्षा निती. दिल्ली : राष्ट्रीय शैक्षणिक अनुसंधान व प्रशिक्षण परिषद.

तो केवळ राष्ट्रनिर्मातच नाही, संस्कृती प्रणेताच नाही, तर भावी पिढी घडविण्याचे कार्य त्याचेच असते. भावी पिढीला आवश्यक असलेले ज्ञान आणि कौशल्ये आत्मसात करुन देण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी शिक्षकाचीच असते, म्हणून शिक्षकाची भूमिका महत्त्वाची आहे. त्याच्या महत्वपूर्ण भूमिकेबद्दल राधाकृष्णन समितीने म्हटले आहे की,

"The teacher's place in society is of vital importance . He acts as the pivot for the transmission of intellectual tradictions and technical skills from generation to generation and helps to keep the lamp of civilization burning. He not only guids the individuals but also, so to say, the destiny of the nation"

राधाकृष्णन समिती.

Agrawal J. C. (2005). Indian Education Policy. Delhi : Atlas Publication pvt. Ltd. Page no. 97

जगाच्या कल्याणा संताच्या विभूती असे म्हटल्या जाते तर राष्ट्राच्या कल्याणाकरिता उत्तम शिक्षकाच्या विभूती असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. याचाच अर्थ असा की, राष्ट्राची उन्नती, प्रगती व कल्याण हे शिक्षकाच्या हातात आहे, आणि ज्या प्रकारची पिढी तो निर्माण करेल त्याचप्रकारचे राष्ट्र निर्माण होईल. म्हणूनच त्याला राष्ट्रनिर्माता म्हटले आहे. जसा शिक्षक तसा विद्यार्थी ते हया अर्थानेच म्हटल्या जाते. त्याच्यापुढे असेही म्हणता येईल की, जसा विद्यार्थी तसे राष्ट्र म्हणजे विद्यार्थी घडविण्यासाठी शिक्षकाची भूमिका किती पणास लागते हे यावरुन सहज लक्षात येते. राष्ट्राचे भवितव्य हे भावी पिढीवर, भावी पिढीच्या गुणवत्तेवर अवलंबून असते तर भावी पिढीची गुणवत्ता शिक्षकाच्या गुणवत्तेवर अवलंबून असते. म्हणून हुमायून कबीरांच्या शब्दात सांगावयाचे झाल्यास-

" The future of a nation depends on the quality of the younger generation and this quality depends on the quality of teachers.Unless special measures are adopted to ensure the supply of sufficient number of teachers of the requisite quality, the quality of teachers will threaten not only the standards of education but, in ultimate analysis the progress, prosperity and welfare of their nation."

Humayun Kabir

Agrawal J. C. (2005). Indian Education Policy. Delhi : Atlas Publication pvt. Ltd. Page no. 103

शिक्षणात शिक्षकाचे स्थान दर्शविण्याबरोबरच मुदलियार आयोगाने शिक्षकाचे वैयक्तिक गुण, शैक्षणिक गुण, व्यावसायिक गुण, इ.बाबत वर्णन करताना म्हटले आहे की,

" that he occupies in the school as well as in the community" We are convinced that the most important factor in the contemplated educational reconstruction in the teacher- his personal qualities, his professional training and the place that he occupies in the school as well as in the community"

मुदलियार आयोग.

Agrawal J. C. (2005). Indian Education Policy. Delhi : Atlas Publication pvt. Ltd. Page no. 107

शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्याकरिता शिक्षकांमध्ये क्षमता असणेही आवश्यक आहे. या क्षमता म्हणजे अध्यापन क्षमता होय. शिक्षकाच्या चांगल्या गुणांचे, क्षमतांचे महत्त्व स्पष्ट करताना कोठारी आयोगाने (१९६४-६६) म्हटले आहे की,

"Amomg all different factors which influence the quality of education and its contribution to material development the quality, competence and character of teachers are undoubtedly the most significant"

कोठारी आयोग.

Agrawal J. C. (2005). Indian Education Policy. Delhi : Atlas Publication pvt. Ltd. Page no. 110

विद्यार्थ्यांचा, समाजाचा व राष्ट्राचा विकास घडवून आणण्यात शिक्षक हा केंद्रस्थानी असतो. कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी हा उत्तर कौमार्यावस्थेतील विद्यार्थी असतो. शाखानिहाय शिक्षण घेणारा हा विद्यार्थी भावी जीवनासंबंधी काही योजना मनात ठेवीत असतो. त्यांची परिपूर्ती करण्याचे कार्य शिक्षकाचे असते. म्हणून शिक्षकाची व्यक्तिमत्त्व वैशिष्टये, वैयक्तिक गुण, शैक्षणिक गुणवत्ता, व्यावसायिक गुणवत्ता, याबरोबरच त्याची अध्यापन परिणमाकारकता आणि क्षमता हे घटक महत्त्वपुर्ण ठरत असतात. त्याच्या या सर्व गुणांचा, क्षमतांचा प्रभाव विद्यार्थ्यावर पडत असतो आणि कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी हा भविष्याच्या उंबरठयावर उभा असतो व त्याचे भविष्य हे शिक्षकाच्या हातात असते. म्हणूनच या कालावधीत विद्यार्थ्यांना मिळणारे मार्गदर्शन, विद्यार्थ्यांची घेण्यात येणारी काळजी, विद्यार्थ्यांना करण्यात येणारे अध्यापन हे महत्त्वपुर्ण असते म्हणूनच कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांकडून विशेष अपेक्षा केल्या जातात.

या अपेक्षापूर्तीकरिता शिक्षकांची व्यक्तिमत्त्व वैशिष्टये, अध्यापन क्षमता आणि अध्यापन परिणामकारकता महत्त्वपुर्ण ठरतात.

विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या क्रियेला जास्तीत जास्त वाव मिळेल, त्यांच्या विविध मानसिक शक्तींना चालना मिळून त्यांना त्या शक्तींचा जास्तीत जास्त प्रमाणात उपयोग करता येईल अशा तऱ्हेचे वातावरण निर्माण करणे म्हणजे अध्यापन.

आधुनिक शिक्षणात ज्ञानात्मक, भावात्मक व क्रियात्मक अशा तिन्ही पैलूंना महत्त्व दिलेले आहे. पूर्वी करता येत नव्हती अशी एखादी गोष्ट करता येणे, आजवर प्राप्त नसलेले ज्ञान प्राप्त होणे व

एखादी नवी अभिवृत्ती रूजणे म्हणजे अध्ययन व असे होण्यास मदत करणे म्हणजे अध्यापन होय. म्हणूनच अध्यापन विद्यार्थ्यांच्या वर्तणूकीत इष्ट बदल घडवून आणते असे म्हटले आहे.

शिक्षकाने शिकविताना विद्यार्थ्यांच्या विचार, आकलन, कल्पना, रसग्रहण इत्यादी शक्तींचा किती प्रमाणात विकास होत आहे, त्यांच्या मनात त्या-त्या विषयासंबंधी कुतूहल, जिज्ञासा व अभिरूची किती प्रमाणात वाढत आहे, यावर अधिक भर दिला पहिजे.

वरील सर्व व्याख्यांच्या आधारे अध्यापनाची व्याख्या पुढील प्रमाणे करता येईल. अध्यापन ही एक द्विकेंद्री प्रक्रिया असून त्यापैकी एका बाजूने वा केंद्राकडून विशिष्ट हेतूने वा हेतूपुरस्पर नवनवीन माहिती देणे, नवनवीन कौशल्ये विकसित करण्याचा प्रयत्न करणे, अध्ययनकर्त्याला प्रेरणा देणे अशा कृती केल्या जातात व त्यांचा परिणाम दुस-या केंद्रावर होतो. म्हणजेच या कृती विद्यार्थ्यांच्या अध्यायपनासाठी मार्गदर्शक, पूरक व प्रेरणादायी ठरतात.

१.२.१० शिक्षण प्रक्रियेत शिक्षकाचे स्थान व अध्यापन अभियोग्यता :

अध्यापनाशी निगडित ज्ञान कौशल्ये व विश्वास यांचा शिक्षकांजवळ असलेला साठा म्हणजे अध्यापन क्षमता होय. शिक्षकांमध्ये असलेल्या अध्ययन अध्यापनाशी संबंधित क्षमतांवर त्यांचे अध्यापन अवलंबून असते. शिक्षकांमध्ये पुढील अध्यापनाशी संबंधित क्षमता असणे अपेक्षित आहे.

शिक्षक हा वातावरण निर्मिती करणारा असावा, स्वयं अध्ययनाची प्रेरणा देण्याची क्षमता शिक्षकांमध्ये आसावी, शैक्षणिक साधनांचे संघटन करण्याची क्षमता असावी, बौद्धिक-भावनिक जाणीव जपण्याची क्षमता. स्वत:च्या कल्पना, विचार यात विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्याची क्षमता. विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधण्याची क्षमता. अध्यापनात विविध अध्यापन पद्धती वापरण्याची क्षमता असावी. विषयाची आवड व विषयावर प्रभुत्त्व असावे. प्रभावी अध्ययन तंत्राचा वापर करण्याची क्षमता असावी. अध्यापन रंजक करण्याची क्षमता असावी. वर्गशिस्त राखण्याची क्षमता, वैयक्तिक, शैक्षणिक, व्यावसायिक मार्गदर्शन करण्याची क्षमता असावी. परिश्रम करण्याची क्षमता असावी. अद्ययावत प्रगतीचा परिचय देण्याची क्षमता, शाळा-समाज संबंध दृढ करण्याची क्षमता, बालकांची अध्ययन क्षमता जागणारा, मूल्यांकनाची अनेक तंत्रे अवगत असावी, वैज्ञानिक पद्धतीने समस्या सोडविण्याची क्षमता, शिक्षकांमध्ये विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना ओळखण्याची क्षमता व दूरदृष्टी असणे आवश्यक आहे. शिक्षकांमध्ये इतर विषयाचे ज्ञान असावे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोण निर्माण करण्याची क्षमता. अवघड ज्ञान सोपे करून शिकविण्याची क्षमता शिक्षकांमध्ये

असावी. आरोग्य, शारीरिक शिक्षण, खेळ, करमणुकीचे कार्यक्रम इ. समाजाला उपयोगी असे समाजपयोगी उत्पादन कार्य विद्यार्थ्यांमध्ये घडवून आणण्याची क्षमता शिक्षकांमध्ये असावी.

मानसिक अभियोग्यता :

शिक्षकांमध्ये मानसिक अभियोग्यतेची भुमिका महत्त्वाची आहे. अध्ययन अध्यापन प्रक्रियेमध्ये कार्य करीत असताना शिक्षक मानसिकदृष्टया परिपक्व असावा जेणेकरून विद्यार्थ्यांना समजुन घेवू शकतील तसेच शालेय स्तरावर विविध घटकांशी योग्यप्रकारे समायोजन प्रस्थापित करू शकेल. विद्यार्थ्यांच्या अंतरवैयक्तिक क्षमता वेगवेगळया असतात अशा स्थितीत कोणत्या विद्यार्थ्यांच्या काय गरजा आहे याची ओळख शिक्षकांना करता आली पाहिजे आणि त्याअनुरूप शिक्षण पद्धतीचा वापर करून त्यांच्या शिक्षण विषयक गरजा पूर्ण करता आल्या पाहिजे. यासाठी शिक्षकांमध्ये मानसिक अभियोग्यता महत्त्वाची आहे. तसेच अध्यापनाच्या विविध पद्धतीपैकी कोणत्या पद्धतीचा वापर कोणत्या प्रकारच्या घटकांच्या संदर्भात करावा लागेल याची निश्चिती करतांना शिक्षकांला विद्यार्थ्यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक संदर्भ विचारात घ्यावा लागतो तसेच मानसशास्त्रीय सिद्धांत आणि तत्वे विचारात घ्यावी लागतात. यासाठी शिक्षकामध्ये मानसिक अभियोग्यतेची भुमीका महत्त्वाची आहे.

विद्यार्थ्यांच्या संदर्भात असलेला सकारात्मक दृष्टिकोन :

शिक्षकांचा सदासर्वकाळ विद्यार्थ्यांच्या संदर्भात सकारात्मक दृष्टिकोन असणे आवश्यक आहे. जो विद्यार्थी वर्गामध्ये सर्वात जास्त प्रश्न विचारतो, त्या विद्यार्थ्यापासून जो विद्यार्थी वर्गामध्ये कधीच प्रश्न विचारत नाही त्या विद्यार्थ्यापर्यंत सर्व विद्यार्थ्यांच्या प्रती शिक्षक सकारात्मक असावेत. एखादा विद्यार्थी शाळेमध्ये वेळेवर येत नाही वा अनुपस्थित राहतो, त्यामागील नकारात्मक कारणाचा विचार न करता वास्तविक कारणाचा शोध शिक्षकांनी घ्यावा आणि ते सोडविण्यासाठी सक्रीय प्रयत्न करावेत. तात्पर्य वर्गामध्ये असलेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या बाबतीत शिक्षकांची वृत्ती ही सकारात्मक असणे आवश्यक आहे. ही अभिवृत्ती प्रत्येक शिक्षकामध्ये असावी.

अनुकूलन क्षमता आणि स्वीकार्यता :

शालेय स्तरावर शिक्षकांमध्ये अनुकूलन क्षमता असली पाहिजे तसेच आहे ती परिस्थिती स्वीकारण्याची वृत्ती आणि क्षमता त्याच्यामध्ये असणे अपेक्षित आहे. शाळा स्तरावर आलेल्या सर्व घटकांशी अनुकूलन प्रस्थापित करता आले पाहिजे तसेच त्यांच्या मनामध्ये आपले वेगळे अस्तित्व निर्माण करता आले पाहिजे. याशिवाय उपलब्ध असलेल्या सुविधा आणि साधने यांच्या संदर्भात

शिक्षकांमध्ये स्वीकार्यता असली पाहीजे. तसेच विद्यार्थ्यांच्या संदर्भातील गुण दोष शिक्षकांना स्वीकारता आले पाहिजे तसेच त्या विद्यार्थ्याशी अनुकूलन प्रस्थापित करता आले पाहिजे. ही अभियोग्यता शिक्षकांमध्ये असणे गरजेचे आहे.

व्यावसायिक जागरूकता :

शिक्षक आपल्या शिक्षकीय व्यवसायाच्या प्रती सदासर्वकाळ जागरूक असावा आपल्या पेशामध्ये आलेले नव-नवीन बदल स्वीकारण्याची आणि त्याचे कार्यन्वयन करण्याची त्याची वृत्ती असली पाहिजे. अध्यापनाच्या विविध पध्दती, ज्या आधुनिक काळामध्ये विकसित झालेल्या आहेत त्याविषयी माहीती प्राप्त करून घेणे, त्याचे कार्यन्वयन कशाप्रकारे करावे याची माहिती प्राप्त करणे आणि प्रत्यक्षात त्या बाबी आपल्या शालेय जीवनामध्ये कार्यान्वित करणे, शिक्षकांना आवश्यक आहे. केवळ नाविण्यतेच्या संदर्भात जागरूक राहूनच चालनार नाही तर, त्यांच्या कार्यन्वयनासाठी त्याची धडपड महत्त्वाची आहे. ही अभियोग्यता शिक्षकांमध्ये असली पाहिजे.

व्यावसायिक अभिरूची :

आपण ज्या व्यवसायामध्ये आलो आहोत, त्या व्यवसायाच्या प्रती त्यांच्यामध्ये अभिरूची आणि आवड असली पाहिजे. व्यवसायामधील नव-निर्मीतीचा शोध घेणे, त्याविषयी माहिती प्राप्त करून घेणे, विविध कार्यक्रमांचे शाळा स्तरावर कार्यन्वयन करणे यामध्ये शिक्षकांना आवड असली पाहिजे. केवळ औपचारिकता म्हणून व्यावसायिक अभिरूची बाळगता कामा नये.

अध्यापन विषयात प्रभुत्त्व :

शिक्षक ज्ञानी व व्यासंगी हवा, त्यामध्ये ज्ञाननिष्ठा असावी. आपल्या विषयात तो पारंगत हवा त्याला आंतरराष्ट्रीय दृष्टी हवी, त्याचे ज्ञान अद्ययावत हवे, त्यांच्या ठिकाणी स्वाध्यायशीलता, विद्याभिरूची, विशेषज्ञता असावी.

शिक्षकांचे अध्यापन कार्यावर प्रभुत्त्व हवे त्यासाठी त्याने विद्यार्थ्यांमध्ये अध्ययनपूरक वातावरण निर्माण करावे, नवनवीन अध्यापन त्यांची माहिती घ्यावी, विद्यार्थ्यांचे मानसशास्त्र त्यास अवगत असावे, शिक्षकाने आपल्या अध्यापनात कृतीपर पद्धती वापराव्यात, समुह अध्ययनावर भर द्यावा. आपल्या विषयात होणारे नवनवीन संशोधन, नवीन माहिती जाणून घेण्यास शिक्षकाने सदैव उत्सूक असावे आणि विद्यार्थ्यांनाही नवीन ज्ञान प्राप्तीचा भिन्न मार्ग दाखवता आले पाहिजे. विद्यार्थ्यांना आपल्या शिक्षकावर पूर्ण विश्वास असावा आणि हे तेव्हाच शक्य होईल. जेव्हा विद्यार्थ्यांना आपल्या शिक्षकांच्या

ज्ञानाच्या विस्तारीत कक्षांचे दर्शन होईल व ते शिक्षकांच्या ज्ञानी व्यक्तिमत्त्वापासून प्रभावीत होतील व ज्ञानी शिक्षकाचा ज्ञानाचा ख-या अर्थाने आदर करतील.

अध्यापन कार्याची आवड :

शिक्षकास अध्यापन कार्याची मनापासून आवड असावयास हवी. अध्यापनास शिक्षकाने उदरनिर्वाहाचे साधन न मानता अध्यापन करणे आपले कर्तव्य आहे असे मनापासून स्वीकार करावयास हवे. आपले अध्यापन अधिक प्रभावी व परिणामकारक कसे करता येईल. या करिता सदैव तत्पर असावे. शाळा हे माझे मंदिर, विद्यालय माझे दैवत आणि विद्यार्थ्यांचे तिमीर जावो हीच माझी प्रार्थना. या तत्त्वांना शिक्षकाने स्वेच्छेने आत्मसात करावे आणि हे शिक्षकाला अध्यापन कार्याची मनापासून आवड असल्याशिवाय शक्य नाही.

प्रेम व सहकार्याची भावना :

आपले अध्यापन हेतूपूर्व फलदायक व सर्जनशील व्हावे यासाठी प्रत्येक शिक्षकाने प्रयत्न करायला हवा. यासाठी शिक्षकाच्या जीवनात प्रेम व सहानुभूती हवी. विद्यार्थ्यांना सतत धाकात ठेवणारा शिक्षक कधी यशस्वी हेऊ शकत नाही. उलट प्रेमळ व सहकारी वृत्तींच्या शिक्षकांचा विद्यार्थ्यांना नेहमी सन्मान व आदर असतो.

शिक्षकाचे स्थान हे माता-पित्याप्रमाणे असते. ज्याप्रमाणे माता-पिता बालकाला अधिकाराने चांगल्या वाईट गोष्टींची समज देत असतात व आपूलकीने मार्गदर्शन करीत असतात. तसेच शिक्षकानेही सर्वच विद्यार्थ्यांना वागणूक द्यावी व कसला ही भेदभाव न ठेवता सर्व विद्यार्थ्यांना समान प्रेम करावे. फक्त अध्यापनच आपले कार्य आहे व इतर गोष्टींशी आपला काहीही संबंध नाही असे न मानता विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक व कौटुंबिक अडचणी व आर्थिक समस्यांचा विचार करून त्यांच्याशी वागणूक व सहकार्य करण्याची प्रवृत्ती शिक्षकांची असावी.

सहनशीलता व धैर्य :

व्यक्ती तितक्या प्रवृत्ती आहे आणि शाळा ही समाजाची प्रतिकृती आहे. नाना तऱ्हेचे विद्यार्थी पालक सहकारी व अधिकारी यांच्याशी शिक्षकाचा संपर्क येतो. ब-याच गोष्टी मनाप्रमाणे होत नाहीत. उदा. शासनाच्या नवनवीन योजना किंवा मुख्याध्यापकाच्या प्रशासनाशी किंवा पालकांच्या, सहकाऱ्याच्या वागणुकीशी किंवा विद्यार्थ्यांकडून अपेक्षित वर्तनाशी शिक्षकांचा मतभेद विरोध असू

शकतो. तर या सर्व गोष्टीमध्ये एक सुवर्णमध्य साधून या बाबींना एका संतुलित पातळीवर जाणून शिक्षकाला आपल्या सहनशीलतेचे आणि धैर्याचे प्रमाण सिद्ध करावे लागते.

प्रभावी व्यक्तिमत्त्व :

शिक्षकी व्यवसाय स्वीकारणा-या व्यक्तिजवळ किमान चांगले व्यक्तिमत्त्व असणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यवसायाच्या काही मागण्या असतात. शिक्षकांनी नैसर्गिक व्यक्तिमत्त्वातील कमतरता दूर करून एक प्रकारचा भारदस्तपणा आणलाआहे. चांगली स्वच्छ राहणी, वर्तनात नीटनेटकेपणा, योग्य उंची, स्पष्ट आवाज, उत्तम शरीरयष्टीची शिक्षकाला आवश्यकता आहे. शिक्षकाच्या वागण्या-बोलण्यात जीवतंपणा असायला हवा. शिक्षकांच्या चांगल्या वाईट वागण्याचा विद्यार्थ्यांवर परिणाम होतो. म्हणून शिक्षकांचे व्यक्तिमत्त्व आदर्श असावे.

शिक्षक हा तत्त्वांचा पालन करणारा असावा, अनुशासन प्रिय असावा. वेशभूषा ही शिक्षकी व्यवसायाला साजेशी असावी. त्याच्या आवडी-निवडी हया देखील त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब असतात. त्याही त्याच्या व्यवसायानुरुप असाव्या. शिक्षकाच्या एकंदरीत वर्तनातून आणि त्याच्या अध्यापनाच्या माध्यमातून त्याचे व्यक्तिमत्त्व हे सर्वांना प्रभावी करणारे असावे. फक्त बाहयरूपीच नव्हे तर शिक्षकांचे आंतरिक व्यक्तिमत्त्व विकसित असावे.

व्यक्तिमत्त्वाचा खरा अर्थ त्यास ज्ञात असावा म्हणजे तो विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना ओळखून त्यांना योग्य दिशा देऊ शकेल. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला योग्य पैलू पाडू शकेल.

निःपक्षपाती वृत्ती :

प्रत्येक शाळेत ज्याप्रमाणे प्रतिज्ञा व प्रार्थना घेऊन शाळेचा आरंभ होतो, तर त्या प्रतिज्ञेत म्हटल्याप्रमाणे भारत माझा देश आहे. त्याचे प्रत्यक्ष वर्तन तीच राष्ट्रीय एकात्मतेची भावना, सर्वधर्म समभावाची भावना, उच्च-नीच न मानण्याची भावना हया गोष्टीचा फक्त जीवनात उपयोगही करावा लागतो, हे विद्यार्थ्यांना स्ववर्तनातून दाखवावे.

वर्गनियंत्रणाची क्षमता :

अध्यापन करीत असताना संपूर्ण वर्गाचे अवधान टिकवून विद्यार्थ्यांना अध्ययन-अध्यापन कार्यात सामावून, घेऊन परिणामकारक ज्ञानदान करण्याचे कौशल्य शिक्षकास अवगत असावयास हवे. शिक्षक प्रशिक्षणात शिकविल्या जाणा-या वर्गनियंत्रण कौशल्यांचा वापर करून आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांची मानसिकता जाणून घेऊन, त्यांच्या स्वभावानुरूप त्यांना अध्ययनाकडे आकर्षित करून

त्यांचा कृतियुक्त सहभाग घेऊन वर्गानियंत्रण ठेवावे. ज्या अध्यापकाने शैक्षणिक साहित्याचा वापर केला आणि विद्यार्थ्यांच्या अनुभव विश्वाशी संलग्न उदाहरणे व दाखले देऊन अध्यापन केले तर आपोआप वर्ग नियंत्रण होत असते.

शिक्षक हा निर्व्यसनी असावा :

शिक्षकाला कसल्याही प्रकारचे व्यसन नसावे. आज काल ग्रामीण भागातील ब-याच शाळात आपणास पाहावयास मिळते की, शिक्षक हे विद्यार्थ्यांकडून पान, सिगारेट, विडी किंवा तंबाखू, चुना मागवतात आणि विद्यार्थ्यांच्या देखत त्याचे सेवन करतात. शिक्षकाच्या या कृतीचा विद्यार्थ्यांवर फार वाईट परिणाम होतो. धुम्रपान ही वाईट गोष्ट आहे. असेही विद्यार्थ्यांना वाटत नाही कारण आपले शिक्षक स्वत: खातात मग आपण ही खाल्ले तर त्यात वाईट काय आहे.?

त्यामुळे आपल्याला निर्व्यसनी व प्रेमळ,आदर्श विद्यार्थ्यांसमोर ठेवून विद्यार्थ्यांची मने शिक्षकाला जिंकता आली पाहिजे.

शिक्षक हा दृष्टा असला पाहिजे :

वर्गाध्यापन करीत असताना शिक्षकांसमोर बसलेले विद्यार्थी हे उद्याचे नागरिक असतात तर त्यात कोणी डॉक्टर,कोणी नेता, वकील कोणी व्यापारी त्या वर्गात शिक्षकांसमोर असतो. शिक्षकाला आपल्या विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या सुप्त गुणांना ओळखता आले पाहिजे. म्हणजे त्यानुसार तो विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करेल शिक्षकाला आजची परिस्थिती आणि भविष्यात येणारी परिस्थिती बद्दल तर्क लावता आला पाहिजे. शिक्षकाजवळ दूरदृष्टी असली पाहिजे म्हणजे तो त्यानुसार काळाची गरज जाणून घेऊन विद्यार्थ्यांना घडवेल.

शिक्षक हा मार्गदर्शक असावा :

आधुनिक भारतीय समाजात अध्यापनकार्याचे स्वरूप बदलते आहे. नवनव्या अध्यापन पद्धती अस्तित्त्वात आल्या आहेत. शिक्षकाला आता केवळ शिकावयाचे नाही, तर शैक्षणिक पर्यावरण निर्माण करायचे आहे. म्हणून शिक्षकाने विद्यार्थ्यांशी आत्मियतेने समरस व्हावे. त्याच्या उपजत सुप्त गुणांचा शोध घ्यावा. त्यांच्या गुणांच्या विकासाला चालना द्यावी. विद्यार्थ्यांमध्ये ते समाजाचे घटक आहेत अशी जाणीव निर्माण करावी.

प्राचीनकाळी ज्याप्रमाणे स्वयंप्रेरित होऊन एकलव्याने गुरू द्रोणाचार्याकडून धनुर्विद्या शिकली होती, तसेच आज शिक्षकाला आपल्या प्रत्येक विद्यार्थ्याला एकलव्य बनविण्याची गरज आहे. कारण

आजच्या या आधुनिक युगातील वाढते ज्ञान, ज्ञानाच्या असंख्य शाखा, या सर्वांचे ज्ञान एका खोलीत विद्यार्थ्यांला पुरविणे शक्य नाही. ज्याप्रकारे खेळण्यात चावी भरून ते चालू करता येते तसेच विद्यार्थ्यांना ज्ञान ग्रहण करण्याचे भिन्न भिन्न मार्ग दाखवून त्यांना स्वयंअध्ययन करणारे म्हणजे, Autonomus Learner बनवण्याची गरज आहे. खरे पाहता. शिक्षकाने आपल्या विद्यार्थ्यांच्या क्षमता ओळखून त्यानुसार त्यांना मार्गदर्शन करावे. अशा तऱ्हेने शिक्षकाची भूमिका ही उत्तम मार्गदर्शकाची असावी. उदा. चर्चासत्रे, कृतिसत्रे, परिसंवाद, कार्यशाळा आणि गटचर्चा अशाप्रकारे विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनास प्रेरित करण्याकरिता आयोजित करता येऊ शकते.

प्रभावी अध्ययन घडून येण्याकरिता प्रभावी अध्यापन होणे अत्यंत आवश्यक असते. म्हणजेच प्रभावी शिक्षक असणे आवश्यक असते. प्रभावी शिक्षकच प्रभावी अध्यापन घडवून आणू शकतो.

"Successful teaching is teaching that brings about effective learning" असे मोर्सलने म्हटले आहे.

Science for All Americans online, (1990) Effective Learning and Teaching principles of Learning. American Association for the advancement Science. http://scienceforallamericansonline0967/?pdf.org

बर्टनने "अध्यापन म्हणजे अध्ययनासाठी चेतना, मार्गदर्शन, दिग्दर्शन व प्रोत्साहन आहे" असे म्हटले आहे व ते घडून येण्याकरिता अध्यापनाची परिणामकारकता असणे आवश्यक आहे.

प्लँडर्स आणि सिमन यांनी अध्यापन परिणामकारकतेची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.

"Teacher's effectiveness is an area of research which is concerned with relationship between the characteristic of teachers, teaching acts and their effects on the educational outcomes of classroom teaching"

प्लँडर्स व सिमन

Goe Laura, Bell Courtney Bell, (2008). Approaches to evaluation Teacher Effectiveness. National Comprehensive center for Teacher Quality. Page no. 125

परिणामकारक अध्यापनाचा संबंध हा शिक्षकांच्या क्षमतेशी संलग्नित आहे. परिणामकारक अध्यापन घडून येण्याकरिता शिक्षकांमध्ये क्षमता असणे आवश्यक आहे. ही बाब स्पष्ट करतांना डिक्सनने अध्यापन परिणामकारकतेची व्याख्या केलेली आहे ती पुढीलप्रमाणे,

"Teaching effectiveness is a demonstrated repertoire of competencies involved with teaching plans and materials, classroom procedures, interpersonal skills and learners points out that effective

teaching depends upon the personality characteristics of a teacher, teaching acts and their effects on the educational outcomes reinforcement involvement reflected in teacher behaviours"

डिक्सन.

Goe Laura, Bell Courtney Bell, (2008). Approaches to evaluation Teacher Effectiveness. National Comprehensive center for Teacher Quality. Page no. 130

अध्यापकाच्या अध्यापन अभियोग्यतेच्या संदर्भातील विविध भूमिका :

आजच्या संगणक व माहिती तंत्रज्ञानयुक्त जगात शिक्षकांची फक्त अध्यापन करणे एवढीच भूमिका राहली नाही, तर आजच्या या ताणतणावयुक्त स्पर्धेच्या युगात शिक्षकांची भूमिका बदलत चालली आहे. शिक्षकाला विविध भूमिका पार पाडाव्या लागत आहेत. मित्र, तत्त्वज्ञ व मार्गदर्शक याबरोबरच पुढील अनेक भूमिकांचे पालन त्याला करावे लागत आहे.

व्यवस्थापक :

शाळेमध्ये प्रसंगानुरूप अनेक कार्यक्रम होत असतात तसेच शाळेचे दैनंदिन कामकाजही नियमित चालू असते, अशा प्रसंगी योग्य तो निर्णय घेणे, शालेय शिस्तीसंबंधी योजना आखणे, शालेय वातवारण निकोप राहील याची काळजी घेणे, या सर्व बाबींची उत्तम व्यवस्था ठेवण्यासाठी मुख्याध्यापकांना शिक्षकांच्या या कौशल्याची मदत होत असते. विद्यार्थ्यांच्या हिताची व्यवस्था पाहण्याच्या दृष्टीने त्याने ही भूमिका बजावणे आवश्यक आहे त्यादृष्टीने शिक्षकांमध्ये व्यवस्थापकीय अभियोग्यता असणे आवश्यक ठरते.

संधी उपलब्ध करून देणारा :

शाळेत विविध उपक्रम राबविले जातात त्या प्रसंगी विद्यार्थ्यांचा सहभाग घेतला जातो विद्यार्थ्यांच्या क्षमता, आवडी निवडी, कल गुणवैशिष्ट्ये विचारात घेऊन शिक्षकाने संबंधित विद्यार्थ्यांना संबंधित कार्यक्रमात, उपक्रमामध्ये भाग घेण्याची संधी उपलब्ध करून द्यावी. वर्षानुवर्ष शिक्षक विद्यार्थ्यांचे निरीक्षण करीत असतात. विद्यार्थ्यांचे सुप्त गुण हे प्रसंगानुरूप दिसून येत असतात. अशा वेळी पूर्वग्रहदुषित दृष्टिकोन न ठेवता व्यक्तिभेद लक्षात घेऊन वस्तुनिष्ठ दृष्टिकोन ठेवून शिक्षकाने विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून द्याव्यात.

मार्गदर्शक :

आजच्या या संगणक युगात जितक्या जास्तीत जास्त सुखसोयी उपलब्ध झाल्या आहेत तितक्या समस्या वाढत चालल्या आहेत. वाढती स्पर्धा, पालकांच्या अवाजवी अपेक्षा, कुटुंबातील मतभेद, कुटुंबाची आर्थिक सामाजिक स्थिती, अभ्यासाचा वाढता ताण, महागाई, बेकारी, भ्रष्टाचार इ सर्व गोष्टींमुळे विद्यार्थी गोंधळून जात आहेत. तसेच आपली कुवत काय आहे, कोणत्या क्षेत्रात गेल्यास आपण यशस्वी होऊ, अभ्यास काय करायचा, विशिष्ट माहिती कुठे उपलब्ध होईल, ताणतणावावर मात कशी करायची या सर्व गोष्टीसाठी त्याला शिक्षकाचे मार्गदर्शन लागत आहे. त्यामध्ये शैक्षणिक मार्गदर्शन व्यवसाय मार्गदर्शन आणि व्यक्तिगत मार्गदर्शन यांची भूमिका महत्त्वाची आहे.

समुपदेशक :

समुपदेशनाचा संबंध विद्यार्थ्यांच्या समस्येशी प्रत्यक्षपणे येत असतो. ज्यावेळी व्यक्ती स्वत:च्या समस्येविषयी योग्य निर्णय घेऊ शकत नाही, तेव्हा तिच्या मनात आत्मदोषाची भावना निर्माण होते. ही भावना जपण्यासाठी व्यक्तीमध्ये निर्णयक्षमता येणे आवश्यक असते ही निर्णयक्षमता विकसित करण्यासाठी समुदेशक म्हणून शिक्षकांची भूमिका महत्त्वाची आहे. त्यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमता, प्रेरणा व अभिवृत्ती याची जाणीव करून द्यावी, विद्यार्थ्यामधील बलस्थाने व कमतरता याची त्याला व पालकांना स्पष्ट व वास्तवाची जाणीव करून द्यावी, विद्यार्थी-पालक, विद्यार्थी विद्यार्थी, विद्यार्थी-समाज यांच्यात सुसंवाद निर्माण होण्यासाठी प्रयत्न करावेत. शैक्षणिक व व्यावसायिक निवडीसाठी योजना आखण्यास मदत करावी.

चौकसपणा :

शिक्षकांनी सदैव चौकस असावे आज माहिती प्राप्त करण्याचे विविध माध्यमे उपलब्ध झाली आहेत. आजचे शोध उद्याची माहिती ठरत आहेत. आपल्या ज्ञानात अद्ययावतता येण्यासाठी, सतत ज्ञान ताजेतवाने राहण्यासाठी शिक्षकाने स्वत:च चौकस राहणे त्यातून ज्ञान मिळविणे आवश्यक आहे. हे ज्ञान मिळविण्यासाठी तो चौकस असावा यामुळे त्याच्या अध्यापनात अद्ययावतता येईल व विद्यार्थ्यामध्येही ही वृत्ती तो जोपासू शकेल.

तसेच शिक्षकांनी विद्यार्थ्याबाबतसुध्दा चौकस असले पाहिजे. एखादा विद्यार्थी शाळेत का येत नाही त्याची समस्या काय आहे याबाबत त्याने चौकशी करावी. त्याच्या कौटुंबिक स्थितीबदद्ल माहिती करून घ्यावी, प्रकृतीबदद्ल चौकशी करावी अडीअडचणी जाणून त्यावर उपाय सुचवावेत असे शिक्षक

विद्यार्थ्यांच्या मनात स्वत:बदद्ल आत्मीयता निर्माण करतात. यातूनच विद्यार्थी-शिक्षक नातेसंबंध अधिक दृढ निकोप होण्यास मदत होते.

विद्यार्थ्यांचे सुप्त गुण वैशिष्टये न्यूनता क्षमता ओळखण्यासाठीही चौकस सतर्क असावे, यासाठी त्याने विद्यार्थ्यांचे नकळत निरीक्षण करावे त्यानुसार त्यांना योग्य मार्गदर्शन करावे.

शिक्षकाला मानसशास्त्राचे ज्ञान असावे :

बालक केंद्रित अध्यापन पद्धतीचा पुरस्कार हे आधुनिक शिक्षणाचे सूत्र आहे. एखादा हुशार विद्यार्थी आपल्या पुस्तकांचा अभ्यास जितक्या काळजीने करतो. तितका शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांचा अभ्यास काळजीपूर्वक करायला हवा सारी शिक्षण प्रक्रिया ही मानसशास्त्रीय आहे. विद्यार्थ्यांचा विकास शैक्षणिक उद्दिष्टये, अभ्यासक्रम, अध्यापन पद्धती अशा शैक्षणिक बाबी समजून घेण्यासाठी शिक्षकाला मानसशास्त्राच्या ज्ञानाची गरज आहे. विद्यार्थ्यांत व्यक्तिभेद आहेत. त्यांच्या क्षमता, अभिरूची, कल वेगवेगळे आहे. याची जाणीव शिक्षकास मानसशास्त्राच्या अभ्यासामुळे होते.

भटट्चार्य, जी. सी. (२०११). अध्यापक शिक्षा. आगरा : अग्रवाल पब्लिकेशन. पृष्ठ क्र. ५५

१.२.११ शिक्षकाची व्यक्तिमत्त्व वैशिष्टये आणि अध्यापन अभियोग्यता :

शिक्षकाच्या व्यक्तिमत्त्व वैशिष्टयांचा संबंध जसा त्यांच्या वैयक्तिक गुणांशी आहे तसाच त्याच्या व्यावसायिक गुणांशी सुध्दा आहे. आजच्या बदलत्या शैक्षणिक प्रक्रियेमध्ये शिक्षकांकडून विशेष अपेक्षा केल्या जातात. त्या विशेष अपेक्षा म्हणजे ज्ञान, विद्वता, व्यवसायाबाबत निष्ठा, विद्यार्थ्यावर पुत्रवत प्रेम, विषयावर प्रभुत्व, सामाजिकता, सर्जनशिलता, कौशल्यपूर्ण अध्यापन, अखंड अध्यापकीय वृत्ती, उपक्रमशीलता, संशोधनवृत्ती संस्कृतीप्रती निष्ठा, लोकशाही दृष्टिकोन इ व यालाच प्रभावी अध्यापक असेही संबोधतात, ही त्याची व्यावसायिक व्यक्तिमत्त्व वैशिष्टये लक्षात घेता एक प्रभावी अध्यापक कसा असावा याचे चित्र आपल्या डोळयांसमोर उभे राहते. परंतु तो केवळ प्रभावी अध्यापक असूनही चालत नाही, तर त्याला त्याच्या अध्यापनाशी संबंधित काही क्षमताही अंगिकाराव्या लागतात. संदर्भीय क्षमता, संकल्पनात्मक क्षमता, अभ्यासक्रम व आशयक्षमता, विविध अध्यापनतंत्र, मूल्यमापन, पालक शिक्षक संपर्क क्षमता, समाजसंपर्क क्षमता, विविध शैक्षणिक उपक्रम क्षमता इ याचाच अर्थ असा की, केवळ व्यक्तिमत्त्व वैशिष्टये असून चालत नाही तर व्यक्तिमत्त्व वैशिष्टयांबरोबरच या सर्व क्षमताही अध्ययन अध्यापन प्रक्रिया प्रभावी होण्याकरिता आवश्यक आहे. म्हणजेच शिक्षकांची व्यक्तिमत्त्व वैशिष्टये व या क्षमता यांचा शिक्षकांच्या व्यावसायिक जीवनाशी निकटचा संबंध आहे.

Rajput J. S. (2002). Teacher Education in india. New Delhi : Sterling Publishers private Limited. Page no. 136

१.२.१२ अध्यापन अभियोग्यता आणि अध्यापन परिणामकारकता

शिक्षकाची अध्यापन परिणामकारकता ही त्याच्या क्षमतेशी किंवा उत्कृष्टतेशी संबंधित असलेली बाब आहे. शिक्षकाची अध्यापन परिणामकारकता वाढविण्याकरिता त्यांच्या ठिकाणी क्षमता व उत्कृष्टता असणे आवश्यक आहे.

शिक्षकांच्या क्षमता म्हणजे विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रक्रियेला पोषक असे वातावरण निर्माण करणे, हे शिक्षकाच्या अध्यापन क्षमतेवर अवलंबून आहे. अध्यापनात सतत नावीन्य ठेवणारा शिक्षक विद्यार्थ्यांना ख-या अर्थाने अध्ययनाकडे प्रवृत्त करणारा असतो. आपले अध्यापन मनोरंजक, रसपूर्ण रितीने कसे होईल याकडे शिक्षक लक्ष देतो. अध्यापन रंजक, आकर्षक व प्रभावी होण्यासाठी तसेच विद्यार्थ्यामध्ये अध्ययनाची प्रेरणा निर्माण होण्यासाठी शिक्षकांमध्ये अध्यापन क्षमता असणे आवश्यक असते.त्यांच्या क्षमता विद्यार्थ्यांच्या अध्ययनाला गतिमान करीत असतात. म्हणजेच अध्यापन परिणामकारक होण्याकरिता अध्यापन क्षमता आवश्यक असते. प्रभावी अध्यापन क्षमतेमुळे परिणामकारक होण्याकरिता अध्यापन क्षमता आवश्यक असते. प्रभावी अध्यापन क्षमतेमुळे अध्ययनावर चांगला परिणाम होतो. विद्यार्थ्यामध्ये अध्ययन करण्याची तीव्र लालसा निर्माण होते. विद्यार्थ्यांचे अध्ययन आणि शिक्षकाचे अध्यापन यांचा घनिष्ठ संबंध असल्यामुळे शिक्षकाच्या अध्यापन क्षमता व अध्यापन परिणामकारकता या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे म्हटल्या जाते.

भटट्चार्य, जी. सी. (२०११). अध्यापक शिक्षा. आगरा : अग्रवाल पब्लिकेशन. पृष्ठ क्र. ४५९

१.३ शिक्षक समायोजन :

समायोजनाची व्याख्या, अर्थ, महत्त्व, क्षेत्र शिक्षकांच्या व्यवसायाच्या बाबतीत समायोजन, समायोजनाचे मार्गदर्शन व समुपदेशन समायोजित व्यक्तीचे लक्षणे विषम समायोजन विषयक समायोजनामधून विविध मार्गांनी समायोजन घडवून आणणे.

अध्ययन अध्यापनाची महत्त्वाची जबाबदारी शिक्षकांना पार पाडावी लागते याशिवाय आपल्या शिक्षकीय व्यवसायामध्ये कार्य करीत असतांना शिक्षकांचे सर्व घटकांशी योग्य प्रकारे समायोजन असणे आवश्यक आहे. शालेय स्तरावरील शिक्षकांचे कार्य हे एक समुह कार्य आहे आणि ते करीत असतांना सर्व घटकांची भूमिका महत्त्वाची असते. अशा स्थितीत शिक्षकाला सुध्दा या सर्व घटकांशी योग्य समन्वय ठेवूनच कार्य करावे लागते. तरच वास्तविक उद्दिष्टांची प्राप्ती होऊ शकते. त्यामध्ये मुख्यत:

विद्यार्थ्यांशी समायोजन, अन्य शिक्षकांशी समायोजन, शालेय स्तरावरील कर्मचाऱ्यांशी समायोजन, अध्ययन अध्यापन प्रक्रियेशी समायोजन, शालेय वातावरणाशी समायोजन या बाबी महत्त्वाच्या आहेत.

निसर्गाने दिलेली शिदोरी घेऊन जगात केलेली यशस्वी वाटचाल म्हणजे समायोजन अशी जे. बी वॅटसन यांनी व्याख्या केली आहे. जीवनाची ही वाटचाल चालू असतांना व्यक्तीच्या विविध शक्तीचा विकास होत असतो भोवतालच्या परिस्थितीशी व्यक्तीला मिळते जुळते घ्यावे लागते. जीवनाची व्याख्या "life is an adjustment" जीवन ही एक तडजोड आहे अशी केली जाते. परिस्थितीशी व्यक्तीचे समायोजन झाले तर व्यक्तीचे मन निरोगी राहते आणि अपेक्षित उद्दिष्टांची साध्यता होते याउलट परिस्थितीशी समायोजन साधले नाही तर विकृती निर्माण होते.

समायोजन म्हणजे परिस्थितीशी जुळवून घेणे, 'स्व' व परिस्थिती यामध्ये संवाद निर्माण करणे होय, अगदी सामान्य बुद्धीच्या व्यक्तीने जगप्रसिध्द वैज्ञानिक होण्याची महत्त्वांकांक्षा बाळगणे म्हणजे निराशा व उदासिनतेला आमंत्रण देणे होय. याउलट आपली बौद्धिक कुवत लक्षात घेऊन शक्य ती आकांक्षा व त्यासाठी धडपड करणे म्हणजेच वैयक्तिक समायोजन होय.

एखाद्या सभेच्या ठिकाणी सर्वसामान्य सर्वांनी संमंत केलेले मत स्वीकारणे हे सामाजिक समायोजन होय. परंतु सभेत स्वतःच्याच मताचा अट्टाहास आग्रह धरणे यासर्वामुळे समायोजन साधले जात नाही. व्यक्तिचे शारीरिक आरोग्य जसे उत्तम हवे, तद्वतच त्याचे मानसिक आरोग्यही चांगले हवे तरच व्यक्ती सामान्य जीवन जगू शकते. मात्र मानसिक आरोग्य बिघडले तर त्याचे दुष्परिणाम दूरवर होतात. जीवन जगतांना परिस्थितीशी, परिसराशी जमवून प जुळवून घेता आले नाही, तारतम्य बाळगता आले नाही, तर व्यक्ती समायोजन साधू शकत नाही. आपल्या गरजा, आपल्या इच्छा यांचा सामाजिक भौगोलिक परिस्थितीत मेळ साधणे, त्यातून आनंद कार्यक्षमता निर्माण करणे म्हणजे समायोजन होय.

परंतु मानवाला अनेक गरजा असतात, गरजांची पूर्तता वेळेच्या वेळी झाली नाही तर समायोजनात अडथळे येतात. गरजांची पूर्तता न होण्यास विविध कारणे जबाबदार आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने संघर्ष, मानसिक ताण, प्रत्यक्ष मार्ग अप्रत्यक्ष मार्ग समायोजन साधण्यासाठी व्यक्ती संरक्षण यंत्रणेचा उपयोग करीत असतो. प्रत्येकजण आपल्या कुवतीनुसार जीवनात समायोजन साधण्याचा प्रयत्न करीत असतो. आपल्या वर्तनातील चुका व दोष न स्वीकारता आपल्या चुकीच्या वर्तनाचे समर्थन करण्यासाठी आपण क्लृप्त्या व पध्दती योजतो त्यांना संरक्षण यंत्रणा असे म्हणतात.

करंदीकर सुरेश, (२००४). शैक्षणिक मानसशास्त्र. कोल्हापूर : फडके प्रकाशन. पृष्ठ क्र. १३१

१.३.१ समायोजनाची संकल्पनात्मक रूपरेखा :

व्यक्ती आणि वातावरण यामध्ये प्रभावी संबंध ठेवण्याच्या प्रक्रियेला समायोजन असे म्हणतात. जीवनाच्या वेगवेगळया क्षेत्रात जसे - घर, शिक्षण, समाज यामध्ये समायोजनाचे महत्त्व आहे. समायोजन संतुलित व्यक्तिमत्त्वाचे सूचक असल्यामुळे समायोजनाचा अभ्यास करणे जरुरीचे आहे.

"Adjustment is the establishment of a satisfactory relationship, as representing harmony, conformance, adaptationor the like."

Webster (1951)

करंदीकर, सुरेश, (तिसरी आवृत्ती) घ्शैक्षणिक मानसशास्त्रङ, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पृष्ठ क्र. १५४.

"समायोजन वह प्रक्रिया है, जिसके द्वारा प्राणी अपनी आवश्यकताओं और इन आवश्यकताओं की पुर्ति को प्रभावित करनेवाली परिस्थितीयों में सन्तुलन रखता है "|

बोइंग, लैंगफेल्ड, वेल्ड

पाठक, पी. डी., (२००५). शिक्षा मनोविज्ञान. आगरा : विनोद पुस्तक मंदिर. पृष्ठ क्र. ४०९.

"Adjustment means the modification to compensate for or meet special conditions."

James Drever (1952)

Mangal, S. K. (1999). Advanced Educational Psychology. New Delhi : Prentice Hall of India Pvt.Ltd. Page no. 389.

"समायोजन के अभिप्राय कई प्रत्ययों से है, जैसे-अभाव संतृप्ति, भग्नाशा एवं द्वंद्वात्मक स्थितीयो से बचने की क्षमता, मन की शांती एवं लक्षणों का निर्माण | इसका आशय सह सिखने से है कि अन्य व्यक्तियों के साथ तथा कार्य की अपेक्षाओं (Demands) के साथ किस प्रकार से चला जाए|"

Alexander and schneiders

शाह, एम. ए., माथुर, कुसुम (२००४). मनोवैज्ञानिक परीक्षण. आगरा : विनोद पुस्तक मंदिर. पृष्ठ क्र. २३६.

मानवाच्या गरजा वेगवेगळया असतात. परंतु अनेक अंतर्गत व बाहय अडचणीमुळे गरजपूर्ती मध्ये अडचण होते. अशा परिस्थितीत व्यक्तिमत्त्वाचे संतुलन व्यवस्थित राहण्यासाठी व्यक्ती काही अशा प्रतिक्रिया करतो, ज्या त्याला समायोजन करण्यास सहाय्य करतात.

समायोजन मुख्यत्वे तीन गोष्टींवर अवलंबून असते.

१) व्यक्तीच्या वेगवेगळया गरजांमध्ये आवश्यक ते संतुलन.

२) गरजांच्या पूर्तीची संधी.

३) समाजमान्य पध्दतीनुसार गरजांची पूर्तता.

समायोजन वह अवस्था है, जिसमें एक ओर व्यक्ति की आवश्यकताएँ तथा दुसरी ओर वातावरण के अधिकारों में पूर्ण संतुष्टि होती हैं अथवा यह वह प्रक्रिया है जिसके द्वारा इन दो अवस्थाओ में सामंजस्य प्राप्त होता है |

Eysenck

शाह, एम. ए., माथुर, कुसुम (२००४). मनोवैज्ञानिक परीक्षण. आगरा : विनोद पुस्तक मंदिर. पृष्ठ क्र. २३७.

समायोजित शिक्षक आपल्या आणि विद्यार्थ्यांच्या समायोजनासाठी बरेच काही करतात हे संभाषण खरे आहे.

इतर व्यक्तिप्रमाणे सामाजिक, आर्थिक आणि भावनिक घटक सुध्दा शिक्षकावर परिणाम करतात कारण शिक्षक देखील एक मानव आहे परंतु काही जबाबदाऱ्यामुळे शिक्षक इतर व्यक्तीपेक्षा वेगळे असतात.

शिक्षक हा एक असा व्यक्ती आहे, ज्याच्याकडे भविष्यातील बदल विचारात घेऊन मानवी भविष्य घडविण्याची जबाबदारी आहे. म्हणून शिक्षकांसाठी अवश्यक आहे की, ते सर्व पैलूपासून पूर्णपणे समाधानी असतील. ज्यामुळे ते अपल्या पूर्ण आणि चांगल्या प्रतिभेचा वापर आपल्या कार्यासाठी करू शकतील आणि त्यानंतर आम्ही म्हणू शकू की, तो पूर्ण समायोजित आहे. शिक्षकांचे कुसमायोजन हे विविध समस्या निर्मितीला कारणीभूत आहे आणि त्याचा शिक्षकांच्या कार्याच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम होतो. त्याचप्रमाणे त्याचा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासावर विपरित परिणाम होतो. अशा स्थितीत शिक्षकांचे कुसमायोजन थांबवणे आवश्यक आहे. कुसमायोजित शिक्षक निर्धारित करण्यात आलेल्या कारणांवर कृती करण्यामध्ये अयशस्वी होतो अथवा त्याची प्रभावकारीता कमी असते. ते योग्य प्रकारे निर्णय घेऊ शकत नाही. तसेच निष्फळ आणि सामाजिकदृष्टया अवांच्छित कारणे स्वीकारू शकत नाही शिक्षक या त्याच्या वैफल्यामुळे त्यांच्या वर्तनामध्ये अनावश्यक बदल होतात व त्याचा विद्यार्थ्यांना त्रास होतो.

"समायोजन ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे ज्यामध्ये व्यक्ती स्वतःचे व त्यांच्या वातावरणात अधिक सुसंवादी नाते निर्माण करण्यासाठी त्याच्या वर्तनाप्रमाणे बदलतो".

Arthur Gates and Other (1958)

Sharma Prem Lata. (2005). Motivation for Learning. New Delhi : Sarup & Sons Publication. Page no. 259

समायोजनाची संकल्पना ही खूप जुनी आहे. ही संकल्पना पृथ्वीवरील मानवी वंशाच्या स्वरूपात आहे. या संकल्पनेचा व्यवस्थित उदय डार्विनपासून सुरू होतो. त्या मध्ये ही संकल्पना पूर्णपणे जैविक आहे. आणि त्याने या शब्दाचा उपयोग केला. अनुकूलन जीवनशास्त्रज्ञ भौतिक साठी अनुकूलन पद वापरले पर्यावरणाची मागणी पण मानसशास्त्रज्ञांनी या शब्दाचा उपयोग केला सामाजिक किंवा पारस्पारिक च्या बदलत्या स्थितीसाठी समायोजन समाजात संबंध, अशा प्रकारे आपण समायोजनाचा अर्थ पहातो मागणी आणि सामाजिक पर्यावरणाचा दबाव यावर प्रतिक्रिया दिली व्यक्तीवर क्षमता आणि इतरांमधील संवाद परिस्थिती म्हणजे स्थापित आणि एकता किंवा समायोजन त्याच्या भोवती जग होय. खालील प्रमाणे अनुकूलन अनुरूप आणि सामान्य स्थितीमध्ये ते फरक करता येतो.

समायोजनाची संकल्पना ही जैविक होती आणि मूलतः याला अनुकूलन असे म्हटले गेले. जीवशास्त्रज्ञांचा संबंध असलेल्या समायोजनाचा प्रकार म्हणजे शारीरिक समायोजन होय. सद्यस्थितीमध्ये अनुकूलन हा शब्द मानसशास्त्रीय आहे. ज्यामध्ये मनोवैज्ञानिकांना अधिक स्वारस्य आहे जे त्यांच्या स्वारस्याचा विषय आहे. वैयक्तिकरित्या सामाजिक व्यवहाराचे समायोजन हे पारस्पारिक दबावाचा परिणाम आहे आणि भौतिक जग केवळ अनुकूल नाही. समायोजन करण्याची प्रक्रिया जैविक संदर्भाच्या तुलनेत अधिक गुंतागंतीची आहे.

मानसशास्त्रज्ञांनी दोन महत्त्वपूर्ण दृष्टिकोनातून समायोजनाची व्याख्या केली आहे. त्यामध्ये एक म्हणजे समायोजन एक प्रकारे यश अथवा संपादणूक आहे आणि दुसरे म्हणजे समायोजन ही एक प्रक्रिया आहे.

वरील व्याख्येमध्ये प्रथम दृष्टिकोनामध्ये गुणवत्तेची, गुणवत्तापूर्ण समायोजन करण्याची क्षमता दर्शवण्यात आली आहे. आणि दुसऱ्या दृष्टिकोनातून व्यक्तीने त्याच्या बाहय वातावरणामध्ये समायोजित केलेल्या प्रक्रियेवर भर दिलेला आहे. आपण एका संपादणुकीच्या अथवा यशाच्या रूपाने समायोजनाचे परीक्षण केल्यास कोणत्याही व्यक्तीने व्यवसाय, लष्करी शिक्षण आणि इतर सामाजिक उपक्रम यासारख्या वेगवेगळया परिस्थितीमध्ये आपले कर्तव्ये पार पाडण्यास किती कार्यक्षमतेने कार्य

करणे आवश्यक आहे, ज्यामुळे राष्ट्राच्या प्रगतीसाठी कुशल आणि चांगले समायोजीत नागरिक निर्माण होणे शक्य होईल.

समायोजन या शब्दाचे वर्णन मानसशास्त्रज्ञ, जीवनशास्त्रज्ञ आणि मानसिक आरोग्यशास्त्रज्ञ व इतर वर्तनवादी शास्त्रज्ञांनी अनेक प्रकारे कलेले आहे.

समायोजनाला वर्तणुकीची प्रक्रिया म्हणून समजले जाते. ज्या द्वारे मनुष्य व प्राणी पर्यावरण व गरजांशी त्यांचा समतोल राखतात. समायोजन एक प्रक्रिया आहे जी जीवनसृष्टीची गरज आहे आणि या गरजा पूर्ण करण्याच्या परिस्थितीला प्रभावित करणाऱ्या स्थितीमध्ये संतुलन राखले आहे.

समायोजनाकडे नेहमी एक गतिमान प्रक्रिया म्हणून पाहिले जाते, जी कोणत्याही स्थितीमध्ये स्थिर असत नाही. विविध परिस्थितीमधील कोणतीही व्यक्ती यापासून मुक्त नाही, प्रत्येक व्यक्तीला प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या या विविध परिस्थितीचा सामना करावाच लागतो. या विविध परिस्थितीपैकी काही जुन्या आणि काही नवीन परिस्थितीमध्ये काही फरकाने बदल करणे आवश्यक असते.

Rao, Narayan S. (2002). Educational Psychology. New Delhi : New Age International Publication. Page no. 322

शिक्षणशास्त्राच्या ग्रंथामध्ये मानसशास्त्रीय समायोजनाला पुढीलप्रमाणे स्पष्ट केलेले आहे.

१. वातावरणातील योग्य वर्तन आणि योग्य रिती शोधणे व त्याचा अवलंब करणे ज्यामाध्यमातून अनुकूल वातावरण निर्माण होऊ शकेल.
२. पर्यावरणामध्ये कोणत्याही कारणामुळे शरीराशी संबंधित पर्यावरणाला अनुकूल परिस्थिती निर्माण होतात त्याला समायोजन असे म्हणतात.
३. जैविक दृष्टिकोन म्हणजे एखादया वातावरणात बदल किंवा अधिग्रहित गुणधर्म जो त्यांची पर्यावरणाची आवश्यकता पूर्ण करण्यास सक्षम असतो.

१.३.२ समायोजित शिक्षकांची वैशिष्टये :

१. चांगल्या प्रकारे समायोजित शिक्षकांचा स्वत:प्रती वास्तविक दृष्टिकोन असतो.
२. शिक्षकांचा बाहेरच्या वातावरणासोबत प्रभावी संबंध असतो.
३. शिक्षकांचा आपल्या आत्मज्ञानामुळे आकाक्षांचा स्तर नेहमी आपल्या योग्यतेनुसार व क्षमतांनुसार अनुकूल व निर्धारित केलेला असतो.
४. समायोजित शिक्षक आपल्या विचारांमध्ये, कृतीमध्ये योग्य समन्वय प्रस्थापित करतात.

५. समायोजित शिक्षकांच्या वेगवेगळया गरजा उपयुक्त व संतुलित प्रमाणात असतात आपल्या गरजांचा ते अतिरेक करीत नाहीत.

६. शिक्षक आपल्या गरजांची पूर्तता सामाजिक आणि राष्ट्रीय मान्यतेला लक्षात ठेवून करतो.

७. समायोजित शिक्षक तणावरहित असतात व कमी असंतुष्ट असतात.

८. सर्वांशी चांगले संबंध असतात कोणाचाही विरोध केला जात नाही. आलेल्या कठीण परिस्थितीशी समन्वय साधून योग्य मार्ग काढला जातो. त्याला कोणालाच त्रास होत नाही शिवाय नुसकान सुध्दा होत नाही.

९. समायोजित शिक्षकांना आपल्या कार्यामध्ये आनंद प्राप्त होतो. कोणतीही समस्या आली तरी ते गोंधळून जात नाहीत अथवा त्यांना वैफल्य येत नाही. तर आलेल्या समस्येमधून योग्य मार्ग काढण्याचा सातत्याने प्रयत्न करतात.

१०. समायोजित शिक्षक कार्यानुसार लवचिक असतात परिस्थितीनुसार त्यांच्या आचार, विचार, व्यवहारामध्ये आवश्यक परिवर्तने ते सहजतेने करतात.

१.३.३ शिक्षक समायोजनाचे क्षेत्र : (Areas of Adjustment)

शिक्षक समायोजनाचे क्षेत्र पुढीलप्रमाणे आहेत.

शिक्षकांचे आरोग्य समायोजन :

आरोग्याच्या क्षेत्रात समायोजनाचा अर्थ शारीरिक व मानसिक आरोग्यांपासून सुटका. तसेच डोकेदुखी, थकवा, चिडणे इ. पासून मुक्ती. जी व्यक्ती नेहमी आजारी राहते व ज्याचे शारीरिक आरोग्य चांगले राहत नाही, तसेच नेहमी डोकेदुखी व शरीर दुखतच राहते. अशी व्यक्ती या क्षेत्रात समायोजित होऊ शकत नाही.

आरोग्य आणि शारीरिक विकासाच्या संदर्भात असे समायोजन केले जाते त्यामध्ये शारीरिक विकास आणि क्षमता त्याचा वयाच्या जोडीने अनुरूप विकास घडवून आणला जातो शिवाय त्याच्या शारीरिक अवयवामध्ये असमर्थता अथवा अन्य दोषामुळे त्यांना कोणतीही अडचण जाणवत नाही ते शिक्षक समायोजनाच्या पूर्ण संधीचा आनंद घेतात.

शैक्षणिक समायोजन :

शाळेच्या नियमानुसार शिक्षक आपल्या स्वत:मध्ये बदल घडवून आणतात, शाळा स्तरावर निर्माण करण्यात आलेल्या नियमांचे पालन करतात, निर्धारित करण्यात आलेल्या अभ्यासक्रम व

अभ्यासेत्तर कार्यक्रमाचे आवडीने कार्यन्वयन करतात तसेच या कार्यक्रमामध्ये सहभागी होतात आणि या सर्व बाबींचे त्यांना समाधान प्राप्त होते. कोणतीही अडचण यामध्ये आल्यास परस्पर सहकार्याने सोडविली जाते यालाच शैक्षणिक समायोजन म्हणतात.

कौटुंबिक स्तरावरील समायोजन :

कुटुंबातील नियमांचे, परंपरांचे पालन करणे, आई-वडिलांच्या विचारांशी समन्वय, कुटुंबातील सर्व सदस्यांसोबत प्रेमाचे संबंध ठेवणे. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास कुंटूबातील वातावरणानुसार स्वत:ला झोकून देणे म्हणजे कौटुंबिक समायोजन होय. शाळा किंवा बाहय वातावरणातील कोणत्याही प्रकारच्या तणावाचा कौटुंबिक बाबीवर विपरीत परिणाम होऊ नये हे विचारात घेऊन शिक्षकांनी कुटुंबात केलेले वर्तन व्यवहार म्हणजे कौटुंबिक समायोजन होय.

सामाजिक समायोजन :

शाळा ही समाजाची छोटी प्रतिकृती आहे. शिक्षक हा या प्रक्रियेचा आधार आहे अशा स्थितीत शिक्षकाला सामाजिकदृष्टया समायोजित असणे आवश्यक आहे. त्यामध्ये समाजाच्या नियमांच्या अनुकूल स्वत:ला बनविणे, समाजाच्या नियमांचे, परंपराचे पालन करणे, समाजातील अन्य लोकांसोबत चांगले संबंध बनविणे, वेगवेगळया सामाजिक कार्यक्रमात सहभागी होणे. यालाच सामाजिक समायोजन म्हणतात.

भावनात्मक समायोजन :

भावना आवश्यक त्या प्रमाणात असणे, परिस्थितीनुसार आपल्या भावनेवर नियंत्रण असणे, योग्य भावनात्मक अभिव्यक्ती करणे, विविध लोकांसोबत चांगले भावनात्मक संबंध निर्मितीलाच भावनात्मक समायोजन म्हणतात.

संस्थेच्या शैक्षणिक व सामान्य वातावरणाशी समायोजन :

शिक्षक ज्या संस्थेच्या अंतर्गत संचालीत शाळांमध्ये कार्यरत आहेत, त्या संस्थेचे शैक्षणिक वातावरण आणि सामान्य वातावरणाशी समायोजित असणे आवश्यक आहे. त्यामध्ये शैक्षणिक वातावरणाच्या अंतर्गत शिक्षकांच्या क्षमता, बांधिलकी आणि कामगिरी विषयक क्रियाप्रतिक्रियांमध्ये सहभागिता शिवाय शालेय सामान्य वातावरणाच्या संदर्भात म्हणजे परस्पर संबंध, शिक्षक-विद्यार्थी संबंध, शिक्षक-शिक्षक संबंध, शिक्षक व अन्य शाळेतील घटकांशी असलेल्या संबंधाच्या बाबतीत जे

नियम निर्धारित करण्यात आले आहेत त्याचे पालन करणे आवश्यक असते. त्यानुसार शिक्षक आपले वर्तन व्यवहार करणे त्याला शैक्षणिक व सामान्य वातावरणाशी समायोजन म्हणतात.

मानसिक समायोजन :

शिक्षक म्हणून कार्य करत असताना मानसिक आणि भावनिकदृष्टया अन्य शिक्षकांचे विचार विपरीत असतील तर त्याला त्वरीत प्रतिसाद न देता येणाऱ्या काळानुसार आपली प्रतिक्रिया नोंदविण्याची प्रक्रिया म्हणजे मानसिक समायोजन होय. शिक्षक म्हणून ज्या प्रकारे शिक्षकांची मानसिकता असणे आवश्यक आहे अशी मानसिकता निर्माण करणे व त्याचे प्रत्यक्ष व्यवहारामध्ये आणि वर्तनामध्ये कार्यन्वयन करणे म्हणजे मानसिक समायोजन होय. या मानसिक समायोजनामुळे आपलेपणाची भावना विकसित होते, शिवाय वाद-विवाद निर्माण होत नाही. तात्पर्य मानसिकदृष्टया निर्माण झालेल्या परिस्थितीशी स्वत:ला समायोजीत करणे म्हणजे मानसिक समायोजन होय.

शारीरिक समायोजन :

शिक्षक शारीरिकदृष्टया समायोजित असणे आवश्यक आहे. शिक्षकांची जी जबाबदारी आहे ती जबाबदारी आणि कर्तव्य पार पाडण्यासाठी शारीरिकदृष्टया जी क्षमता शिक्षकांमध्ये असणे आवश्यक आहे, ती क्षमता निर्माण करून आपल्या व्यवसायाच्या संदर्भात असलेल्या जबाबदाऱ्या शारीरिक बाबीशी संबंधित आहेत, त्याचे योग्य प्रकारे कार्यन्वयन करू शकण्याची शिक्षकांची योग्यता म्हणजे शारीरिक समायोजन होय. जसे शिक्षक शारीरिकदृष्टया सुदृढ असावा त्यांना कोणताही आजार असू नये जेणेकरून त्याचा प्रादुर्भाव विद्यार्थ्यांवर व अन्य शालेय परिसरातील घटकांवर होणार नाही.

व्यावसायिक संबंध समायोजन :

शिक्षकीय व्यवसायामध्ये असलेल्या अन्य शिक्षकांशी प्रत्येक शिक्षकांचे व्यावसायिक संबंध येतात. या संबंधामध्ये योग्य समायोजन असणे आवश्यक आहे. शिक्षकांचे व्यावसायिक संबंधाच्या संदर्भात अध्ययन अध्यापन प्रक्रियेतील घटकांच्या अध्ययन अनुभवांची देवान घेवान, परस्परांशी व्यावसायिक विचारांची देवान करताना परिस्थितीशी अनुकूल समायोजन प्रस्थापित करण्याची वृत्ती म्हणजे व्यावसायिक संबंध समायोजन होय.

वैयक्तिक जीवनामध्ये समायोजन :

प्रत्येक व्यक्तीचे आपले एक जीवन असते त्या जीवनामध्ये आलेल्या परिस्थितीशी योग्य समन्वय साधणे गरजेचे असते. सुख दु:ख यांचा समुह म्हणजे जीवन होय. वैयक्तिक जीवनामध्ये

कितीही दु:ख आले तरी आलेल्या परिस्थितीशी योग्य समन्वय साधून जीवन सुखकर, आनंदी सुसंवादी करणे म्हणजे वैयक्तिक जीवन समायोजन होय.

वित्तीय समायोजन :

आर्थिक कारणामुळे शिक्षकांमध्ये निर्माण होणाऱ्या वैफल्यग्रस्त परिस्थितीमध्ये व्यक्ती समायोजित होऊ शकत नाही. त्यामुळे अनेक समस्या निर्माण होतात, अशा स्थितीत आपल्या उत्पन्नाप्रमाणे आणि आर्थिक परिस्थितीनुसार आपल्या गरजा पूर्ण करणे आवश्यक असते. आपले उत्पन्न, खर्च यामध्ये योग्य समन्वय साधण्याच्या शिक्षकांच्या वृत्तीला वित्तीय समायोजन असे म्हणतात. शिवाय कोणत्या गरजा महत्त्वाच्या आहेत आणि कोणत्या गरजा दुय्यम आहेत, याचा क्रम निर्धारित करून त्या आपल्या मर्यादित उत्पन्नातून पूर्ण करण्याच्या शिक्षकांच्या वर्तन व्यवहाराला वित्तीय समायोजन म्हणतात.

कार्याविषयीच्या समाधानाबाबत समायोजन :

शिक्षकांना आपल्या कार्यामध्ये समाधान प्राप्त होणे आवश्यक आहे. शिक्षक शालेय जीवनामध्ये जे कार्य करतो ते केल्यानंतर मी राष्ट्र विकासासाठी योगदान दिले आहे याची अनुभुती शिक्षकांना होणे आवश्यक आहे शिवाय शिक्षकीय कार्य करीत असतांना त्यामध्ये आनंदाची प्राप्ती होणे गरजेचे आहे या सर्व बाबींशी शिक्षक समायोजीत होत असतील तर त्याला कार्याविषयीचे समायोजन असे म्हणतात.

Sharma Ram Nath, Sharma Rachana, (2004). Guidance and Counselling in india. New Delhi : Atlantic Publishers & Distributors. Page no. 131-141

१.३.४ शिक्षक समायोजन प्रक्रियेचे घटक :

समायोजन होण्यासाठी समायोजन प्रक्रिया जाणने महत्त्वपूर्ण ठरते. खालील आकृतीवरुन समायोजन प्रक्रिया समजण्यास मदत होईल.

प्रेरणा :

विशिष्ट ध्येयपूर्तीसाठी मनुष्य जे वर्तन करते व कृती चालू ठेवण्यास प्रवृत्त होते. त्या घटकाला प्रेरणा असे म्हणतात. प्रेरणा तीव्र व कमी स्वरुपाच्या असतात.

विफलता :

प्रेरणेमुळे व्यक्ती आपले उद्दिष्ट ध्येय गाठण्यासाठी प्रयत्न करते. बरेच वेळा प्रयत्न करुनही यश येत नाही किंवा अडथळे येतात, अडथळयांमुळे नैराश्य येते. एका प्रतिक्रियेत दुसऱ्या प्रतिक्रियांचा अडथळा निर्माण होतो व विफलता येते.

विविध प्रयत्न :

कोणतेही उद्दिष्ट गाठण्याचे एक किंवा अनेक मार्ग असतात. पण जेव्हा एका मार्गाने उद्दिष्ट प्राप्त होत नाही. अशा वेळी व्यक्ती अनेक संभाव्य मार्गाचा अवलंब करुन आपल्या उद्दिष्टांपर्यत पोहचत असते.

समस्यापूर्ती :

आपले ध्येय गाठण्यासाठी आपण विविध प्रकारे प्रयत्न करतो आणि शेवटी ते उद्दिष्ट पूर्ण होते. म्हणजे प्रेरणा ही समायोजन प्रक्रियेची सुरुवात आणि समस्यापूर्ती ही शेवटची पायरी होय. समस्यापूर्ती झाली की समायोजन होते. मनुष्य जीवनाची परिस्थिती ही नेहमी बदलत असते. नेहमी नवीन समस्या मानवासमोर येत असतात. आणि त्याला तोंड देण्यासाठी मानव झगडत असतो. हीच प्रक्रिया समायोजन प्रक्रिया होय.

पाण्डेय कल्पलता, श्रीवास्तव शंकर शरण. (२००५). शिक्षा मनोविज्ञान. न्यू दिल्ली : टाटा मॅसग्रेव्ह पब्लिकेशन. पृष्ठ क्र. २९४-३००

१.३.५ समायोजन स्थापित करण्यासाठी होणारे प्रयत्न :

१. समर्थन (Rationalization) :

एखादया कृतीत आपली चूक झाली असता ती मान्य न करता इतरांना खऱ्या वाटतील अशा सबबी सांगणे म्हणजे समर्थन होय.

२. प्रक्षेपण (Projection) :

या प्रकारामध्ये दोष आपला असला तरी तो दुसऱ्यांच्या माथी मारला जातो.

३. प्रतिपूरण (Compensation) :

एका क्षेत्रात यश मिळवता आले नाही तर दुसऱ्या क्षेत्रात यश मिळवून त्याची भरपाई करण्याचा प्रयत्न व्यक्ती करीत असतो.

४. दिवास्वप्न (Day Dreaming) :

जीवनात ज्या इच्छा किंवा स्वप्ने प्रत्यक्षपणे पूर्ण होत नाहीत त्या व्यक्ती दिवास्वप्न पाहते.

५. तादाम्य (Idenyification) :

आपली प्रतिष्ठा वाढविण्यासाठी, आपली उणीव लपविण्यासाठी काही व्यक्ती प्रसिध्द व्यक्तीच्या छायेत राहतात.

६. उदात्तीकरण (Sublimation) :

समायोजन साधण्याचा उदात्तीकरण हा एक अत्यंत चांगला मार्ग आहे.

७. क्षमण (Repression) :

माणसाच्या मनात कित्येक वेळा अतिशय वाईट विचार येतात वासना निर्माण होतात व्यक्ती असे विचार वासना दडपून टाकण्याचा प्रयत्न करीत असते या दाबून टाकण्याच्या दडपून टाकण्याच्या वृत्तीला दमन असे म्हणतात.

८. आत्मक्लेश (Self Punishment) :

आपली चूक झाली असताना आपल्याला जबरदस्त शिक्षा झाली आहे, हे दाखविण्यासाठी काही व्यक्ती स्वत:लाच शिक्षा करून घेतात त्याला आत्मक्लेष म्हणतात.

९. विस्थापन (Displacement) :

आपल्यापेक्षा श्रेष्ठ, वरचढ व्यक्ती आपल्यावर रागावली तर, आपण त्या व्यक्तीवर रागावू शकत नाही, तर तो राग आपण आपल्या कनिष्ठ व्यक्तीवर प्रगट करतो याला विस्थापन असे म्हणतात.

१०. नकारात्मकता (Negativism) :

असहकार पुकारून काही वेळा समायोजन साधण्याचा प्रयत्न केला जातो.

११. दांभिक आजार (Malingering) :

दांभिक आजार ही एक प्रकारची पळवाट आहे. कठिण परिस्थितीतून माघार घेण्यासाठी आजाराचे खोटे कारण दाखविले जाते.

समायोजन साधण्यासाठी प्रत्येक व्यक्ती संरक्षण यंत्रणेचा उपयोग कमी अधिक प्रमाणात करीत असते त्यापासून व्यक्तीस काही हानी पोहचत नाही. संरक्षण यंत्रणेचा अतिरेक झाला तर त्यातून मानसिक विकृती निर्माण होण्याची शक्यता असते. व्यक्तीला परिस्थितीशी जुळवून घेता आले नाही की त्याला विषम समायोजन म्हणतात. विषम समायोजनामध्ये व्यक्तीला परिस्थिती नीट समजावून घेता येत नाही. त्यामुळे परिस्थितीनुसार वर्तन घडत नाही. ज्या व्यक्तीत विषम समायोजन आढळते त्या व्यक्तीचे मानसिक आरोग्य बरे नाही असे समजावे.

करंदीकर सुरेश, (२००५). शैक्षणिक मानसशास्त्र. कोल्हापूर : फडके प्रकाशन. पृष्ठ क्र. १५५-१५८

१.३.६ शिक्षक समायोजनामध्ये मानसिक आरोग्याची भुमिका :

सुदृढ शरीरात आरोग्यदायी सुदृढ मन वास करते 'Sound Mind in a Sound Body' मन निरोगी, सुदृढ, आरोग्यदायी असण्यासाठी शरीरही आरोग्य संपन्न असावे लागते. शरीर आरोग्य संपन्न असणे याचा अर्थ बाहय व अंतर्गत शरीरातील सर्व संस्था पंचनसंस्था, श्वसनसंस्था, रक्ताभिसरण संस्था, उत्सर्जन संस्था, मेंदू प्रजनन संस्था या निकोप, निरोगी व कार्यक्षम असणे शरीरातील सर्व अवयव व इंद्रिये यांचे कार्य विनातक्रार, एकजिनसीपणे चालणे, शरीर आणि मन यातील संतुलन सुयोग्य असणे शरीराची उंची व वजन हे प्रमाणबद्ध असणे, कोणत्याही प्रकारचा आजार किंवा जीवाणू, विषाणू यांचा शरीरात प्रवेश झालेला नसणे अशा शारीरिक स्थितीस शारीरिक आरोग्य सुस्थितीत आहे असे म्हणता येईल.

सुदृढ शरीरात मन निरोगी राहण्यासाठी स्वत:पुरतेच मर्यादित नियम शोधते व त्याआधारे मन निरोगी राखण्याचा प्रयत्न करते. ते मानसिक रोगांपासून दूर ठेवण्याचा, त्यांचे संरक्षण करण्याचा व यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करते. मानसशास्त्राची आणि मानसस्थितीचे ज्ञान असलेली कोणतीही व्यक्ती मानसिक आरोग्य टिकविण्यात आणि त्यांचे स्थास्थ राखण्यात मदत करू शकते शिक्षक आणि पालक बालकांचे मानसिक आरोग्य सुदृढ ठेवण्यास महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात. तसेच शिक्षक निर्माण झालेल्या परिस्थितीमध्ये आपली भूमिका काय आहे याचा विचार करून आपले मानसिक स्वास्थ टिकविणे आवश्यक असते कारण ज्या विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याची जबाबदारी शिक्षकावर आहे अशा शिक्षकांचे मानसिक आरोग्य प्रथमत: पूर्णत: स्वस्थ असणे आवश्यक आहे.

मानसिक आरोग्य समायोजन शक्तीवर निर्भर असते किंबहुना समायोजन शक्ती म्हणजेच मानसिक आरोग्य असे समीकरण मांडले जाते. समायोजन हे दोन प्रकारचे असते. आपल्या मनस्थितीशी व बाहय परिस्थिती असलेले समायोजन.

वास्तवतेला न डावलता किंवा तिच्यापासून न पळता, आहे ती, मग ती परिस्थिती असो वा मन:स्थिती असो पत्करून त्यातून जास्तीत जास्त सुख समाधान व सफलता मिळवित जीवन जगणे, परिस्थितीशी भांडून वा झगडून ती किंवा आपली मन:स्थिती बिघडवून तर घ्यावयाची नाही किंवा नाकबूल करून पळपुटेपणाने स्वप्नसृष्टीत रमायचे नाही. म्हणजेच आहे ते पत्करून त्यातून अधिकाधिक सुख समाधान कसे मिळेल याचा विचार करून योग्य समायोजन साधले जाते.

विद्यार्थ्याप्रमाणेच शिक्षकांच्याही मानसिक आरोग्याचा विचार व काळजी घ्यावयास हवी शिक्षकाला आपलेच मन:स्वास्थ व मानसिक आरोग्य टिकविता आले नाही तर तो आपल्या विद्यार्थ्यांना त्याबाबत काय मदत वा मार्गदर्शन करू शकेल. शिक्षकांनी समस्यापेक्षा त्यांच्याकडे पाहण्याचा स्वत:च्या दृष्टिकोनाचा अधिक गंभीरतेने विचार करावा कारण घटनेपेक्षा त्या घटनेचा अर्थ लावण्याची पध्दती अधिक महत्त्वाची असते. चुकीचे दृष्टिकोन पूर्वग्रह व गैरसमज यांच्यामुळे जितके नुकसान होते तितके त्या प्रत्यक्ष समस्येनेही होत नाही. आपल्या अडचणी या स्वकृत असतात त्यामुळे शिक्षकांनी आपल्या दृष्टिकोनाचा, पूर्वग्रहाचा तसेच श्रध्दानिष्ठतेचा परिणाम विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन करताना कधीच होऊ देऊ नये.

शिक्षकांच्या मानसिक स्वास्थाची जपणूक करण्यासाठी सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे शिक्षकाने आपल्या व्यवसायाकडे पाहण्याचा दृष्टिकोन शिक्षकाला जर आपल्या व्यवसायाविषयी समायोजन साधण्यात यश मिळविण्याचा हा हमखास मार्ग आहे. Try to increase area of agreement of in every field of life कोणत्याही वस्तू, व्यक्ती, घटना यातील चांगली बाजूच पाहण्याची सवय लावून घेणे हा समायोजनाचा उत्तम उपाय आहे. म्हणून शिक्षकाने मनस्थिती सुस्थितीत ठेवणे आवश्यक बाब आहे.

पाण्डेय कल्पलता, श्रीवास्तव शंकर शरण. (२००५). शिक्षा मनोविज्ञान. न्यू दिल्ली : टाटा मॅसग्रेव्ह पब्लिकेशन. पृष्ठ क्र. २९५-२९८

अशा शिक्षकांच्या व्यवसायातील काही चांगल्या गोष्टीचा उल्लेख खालील प्रमाणे केला आहे.

१. आपण चरित्र्य घडवू शकतो.
२. संस्कृती सत्प्रवृत्तीचे पोषण भरण करू शकतो.
३. आर्थिक स्थैर्य आज आलेले आहे.
४. युवकांच्या सहवासात सतत राहिल्यामुळे आपला उत्साह, तारूण्य पुष्कळ दिवस टिकते.
५. अनेक स्वभाव चारित्र्ये नमुने पहावयास मिळत असल्याने आपली समायोजन शक्ती वाढते व आपल्याला मनस्वास्थ लाभते.

याचा अर्थ ज्या वास्तविक अडचणी व उणिवा आहेत त्याचा विचारच करावयाचा नाही असे नाही. काही अडचणी किंवा शिक्षकांच्या व्यवसायाकरिता नित्य भेडसावीत असतात जसे.,

१. समाजात शिक्षकाला मानाचे स्थान मिळत नाही. शिक्षकांविषयीच्या समाजाच्या केवळ अपेक्षाच आहेत. मात्र शिक्षकांच्या अपेक्षा अडचणीचा विचार समाजाकडून होत नाही. त्याची प्रतिष्ठा विचारार्ह मानली जात नाही.

२. शिक्षकांचा पगार हा इतर सर्व व्यवसायातील लोकांच्या पगारापेक्षा कमीच आहे.

३. नोकरीची शाश्वती व काम करण्याला आवश्यक वातावरण हया गोष्टी खूप महत्त्वाच्या आहेत, शिक्षक ज्या वातावरणात काम करतात त्या वातावरणाचा विचार केल्यास फारच निराशा वाटते, राजकीय व सामाजिक हेवेदावे वैयक्तिक भांडणे व गटबाजी आदी सर्व बाबींचा सुळसुळाट झाला असल्याने शिक्षकांची लायकी व कौशल्याचा विचार करण्याची जरूरी वाटेनाशी झाली आहे. शिक्षकांच्या या असाहाय्य स्थितीचे यथार्थ वर्णन फारच विदारक रितीने लिहिले आहे. Teacher या शब्दाचे व्याकरण सांगताना म्हटले जाते की, Teacher is a common noun neutral gender hopeless case subject to the whims of the H. M. and the department.

४. शाळेच्या व्यवस्थापनात शिक्षकांना मताधिकार असावेत, त्यांचे विचार सहकार्य व अडचणी या सर्व गोष्टी मांडण्याची संधी त्यांना मिळाली पाहिजे.

५. शिक्षकांच्या आजारपणात त्यांना भरपगारी रजा मिळावी, तसेच काही विशिष्ट प्रमाणात आर्थिक मदत अपेक्षित आहे.

वरील सर्व गोष्टींचा विचार केलेलाच शिक्षक आपले कार्य जबाबदारीने करू शकेल. त्याचप्रमाणे शिक्षकांच्या काही जबाबदाऱ्या आहे ते विसरूनही चालणार नाही.

१.३.७ शिक्षकांचा विद्यार्थ्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि शिक्षक समायोजन:

विद्यार्थ्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन ज्याप्रमाणे निकोप सहानुभूतीचा पाहिजे त्याचप्रमाणे त्यास आपल्या पेशाविषयी अभिमान असावयास हवा. या सर्वावर शिक्षकाचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन जो असेल त्याचा परिणाम होत असल्याने, शिक्षकांचे जीवन कसे आनंदमय होईल याची धडपड सदैव शिक्षकाने केली पाहिजे. त्यामुळे शिक्षकाला आपल्या व्यवसायाविषयीची माहिती, त्यातील आवश्यक कौशल्ये, पुढारी म्हणून विद्यार्थीप्रीय होणाऱ्या शिक्षकांविषयी काही अपेक्षा आवश्यक आहेत.

१. शिक्षकाला व्यक्तिस्वातंत्र्य व व्यक्तित्व विकसन याविषयी आदर असावा.

२. कोणत्याही समस्येचा विचार शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, संयुक्तिक व तर्कशुध्द पध्दतीने करण्याची सवय यामध्ये आवश्यक आहे.

३. विद्यार्थ्यांविषयी प्रेम जिव्हाळा व सहानुभूतीची भावना असून त्यांच्या सहकार्यावर विश्वास ठेवण्याची वृत्ती.

४. आपल्या विषयाचे अद्ययावत ज्ञान आणि ते ज्ञान संक्रमित करण्याचे अध्यापन कौशल्य.

या सर्व गोष्टीकरिता शिक्षकांचे समायोजन कौशल्य अत्यावश्यक आहे समायोजन म्हणजे तारतम्याची जाणीव सर्व गोष्टीचा तारतम्याने विचार करणाऱ्यास मानसिक स्वास्थ सहज लाभते. थोडक्यात शिक्षक हा शारीरिक, मानसिकदृष्टया समायोजन कुशल हवा असा संतृष्ठ, ध्येयनिष्ठ प्रेमळ शिक्षकच आपले व विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य राखू शकतो.

म्हणजेच शिक्षकांच्या कार्याशी व क्षेत्राशी एखादा शिक्षक किती समायोजीत झालेला आहे ते शोधणे अपेक्षित असते.

Gupta Sen. (2012). Experiment in Teacher Education. Delhi : Indian Education NCERT Publication. Page no. 20-25

१.३.८ शिक्षकांचे मानसिक आरोग्य चांगले नसण्याची कारणे :

१. वैफल्य :

शिक्षक शिक्षकी पेशा स्वीकारताना व्यक्तीच्या मनात वैफल्याची भावना दिसून येते, त्यामुळे पुढे व्यवसायात व्यक्ती आत्मसमाधानी राहत नाही. त्यामुळे या व्यक्ती नाईलाजाने काम करीत असतात त्या सर्वांचा परिणाम त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर होतो.

२. वैषम्य :

शिक्षकापेक्षा समाजातील विविध क्षेत्रातील लोकांना अधिक आर्थिक लाभ मिळत असल्याने त्यामुळे शिक्षकाला वैषम्य वाटत राहते.

३. सामाजिक दबाव :

इतर व्यवसायाच्या तुलनेत शिक्षकी पेशात काही फरक आपणास दिसून येतो. सामाजिक नीतिनियम शिक्षकास पाळावे लागतात. त्याचा परिणाम शिक्षकांच्या पेशावर होतो. तो समाज प्रबोधनाचा पाईक आहे, त्यास सामाजिक अभियंता म्हणतात म्हणून इतरांपेक्षा त्यांच्यावर जास्त जबाबदारी आहे.

४. शिक्षणसंस्थेमधील हुकुमशाही कार्यपध्दती :

काही संस्थाचालक व मुख्याध्यापक वरिष्ठ मंडळी यांच्या हुकुमशाहीचा प्रतिकुल वा अनुकूल परिणाम आपणास दिसून येतो.

५. कामाचा ताण :

वेतनातील सुधारणा केली की, शासन शिक्षकांच्या कामाच्या तासात वाढ करतेच पुन्हा कामाचा बोजा वाढला जातो त्याचाही परिणाम शिक्षकांच्या व्यक्तिमत्त्वावर होतो.

६. शिक्षकी व्यवसायामध्ये आवश्यक असणारे गुण नसताना केवळ उदरनिर्वाहासाठी काही लोकांनी हा व्यवसाय निवडलेला असतो. त्यामुळे अशा शिक्षकांना काम करतांना अस्वस्थता जाणवत राहते.

पाण्डेय कल्पलता, श्रीवास्तव शंकर शरण. (२००५). शिक्षा मनोविज्ञान. न्यू दिल्ली : टाटा मॅसग्रेव्ह पब्लिकेशन. पृष्ठ क्र. ३०१-३०३

१.३.९ शिक्षक समायोजनाचे महत्व :

शालेय जीवनामध्ये शिक्षकांची भुमिका महत्वाची आहे. शिक्षक हा राष्ट्रनिर्माणाचा आधार विकसित करण्याचे कार्य करतो. अशा स्थितीत ज्या भावी पिढीला घडविण्याची आणि एक आदर्श भारतीय नागरिक निर्माण करण्याची जबाबदारी ज्या शिक्षकांकडे आहे, ते शिक्षक स्वत: आपल्या व्यवसायामध्ये असलेल्या विविध जबाबदाऱ्याविषयी समायोजित असणे गरजेचे आहे. शिक्षक आपल्याकडे असलेल्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्य तेव्हाच सक्षमपणे पार पाडू शकतील, जेव्हा ते स्वत: पूर्ण समायोजित असतील. समायोजित शिक्षकच आपल्या जबाबदाऱ्या प्रभावीपणे पार पाडू शकतात आणि त्या जबाबदाऱ्यांच्या माध्यमातून शालेय शिक्षणाच्या संदर्भात असलेल्या भावी नागरिकाच्या प्रती असलेल्या उदिद्ष्टांची साध्यता करू शकतात. म्हणून शिक्षक समायोजनाची भुमिका महत्त्वाची आहे. त्यासाठी शिक्षकांचे सेवांतर्गत शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम, विविध प्रकारची सभा सम्मेलने यामाध्यमातून शिक्षकांच्या समायोजनाच्या संदर्भात असलेल्या समस्या दूर करण्याचा प्रयत्न करण्यात येतो.

१.४ शिक्षकांचे वैफल्य :

शालेय स्तरावर आपल्या शिक्षकीय पेशामध्ये कार्य करीत असतांना शिक्षकांना विविध प्रकारच्या वैफल्याच्या परिस्थितीला सामोरे जावे जागते. या वैफल्याच्या संदर्भात काही कारणे अध्ययन अध्यापनाशी संबंधित असतात, तर काही कारणे ही शालेय स्तरावर घडणाऱ्या विविध घटनांशी संबंधित असतात. जेव्हा शालेय स्तरावरील विविध घटना या शिक्षकांच्या मनाच्या विरूध्द होतात

अथवा शिक्षक जी समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करतो, परिणामत: त्यामध्ये त्यांना यश प्राप्त होत नाही. अशी स्थिती पुन्हा पुन्हा निर्माण होते त्यामुळे शिक्षकांमध्ये वैफल्य निर्माण होते. तात्पर्य शालेय स्तरावर निर्माण होणाऱ्या विविध घटना सोडविण्यासाठी शिक्षक प्रयत्न करतात परंतु त्या सोडविल्या जात नाही. अशा घटनांमुळे शिक्षकांमध्ये शालेय स्तरावर निर्माण होणारे वैफल्य म्हणजे शालेय घटनांमधील वैफल्य होय. शिक्षकांमध्ये निर्माण होणाऱ्या विविध शालेय घटनांच्या संदर्भातील वैफल्याच्या संदर्भात विवेचन पुढील प्रमाणे करण्यात आलेले आहे.

व्यक्तीला हवी असेल तशी अथवा अपेक्षित आदर्श परिस्थिती नेहमीच उपलब्ध असेल असे नाही ही परिस्थिती उपलब्ध नसणे यामुळे व्यक्तीमध्ये जे मानसिक द्वंद्व निर्माण होते आणि त्याचा परिणाम ताण निर्माण होण्यामध्ये होतो. थोडक्यात

ताण = अपेक्षित असलेले जीवन / वास्तव जीवन

ताणामुळे भीती निर्माण होते, वैफल्य येते, अस्वस्थता निर्माण होते, दबाव निर्माण होतो, व्यक्ती ज्या वातावरणात वाढत असते, त्या सर्व बाबींचा परिणाम व्यक्तीच्या वर्तनावर होत असतो. हीच परिस्थिती संघर्षास देखील कारणीभूत होत असते. संस्कार व बाहय जगातील वातावरण यामध्ये जर फरक असेल तर संघर्ष वाढतात. संघर्षाशी निगडीत आणखी एक बाब म्हणजे नैराश्य किंवा वैफल्य होय.

Mani Vempati Rajo, Rao Digumarti Bhaskar. (2009). Frustration of prospective Teachers. New Delhi : Discovery Publication House. Page no. 12-16

१.४.१ मानसिक संघर्ष :

शिक्षकांच्या जीवनात अनेक वेळी विविध कारणांवरून मानसिक संघर्ष निर्माण होतात. मनात केव्हाही, कोणत्याही प्रकारचा संघर्ष निर्माण झाला नाही असे व्यक्ती जीवन आढळत नाही. परंतु निर्माण झालेला मानसिक संघर्ष प्रयत्नाने टाळता येईल किंवा कमी करता येईल. पण पूर्णपणे संघर्ष विरहित जीवन उपभोगता येणार नाही. बऱ्याचदा ज्याच्यावर आपला ताबा असत नाही अशा बाहय कारणांमुळे आपले मन द्विधा होते आणि मानसिक संघर्ष निर्माण होतो. संघर्ष निर्माण होऊ नये याची दक्षता व काळजी घेणे, संघर्ष टाळण्याचा प्रयत्न करणे, इष्ट पण संघर्ष निर्माण झालाच तर त्याला तोंड देण्यावाचून गत्यंतर नसते. व्यक्ती मानसिक संघर्षांना नीट तोंड देऊ शकली नाही तर तिचे मानसिक स्वास्थ्य बिघडते.

लेविन या मानसशास्त्रज्ञांच्या मते, मानसिक संघर्षाचे तीन प्रमुख प्रकार आहेत.

व्यक्तीला एकाच वेळी दोन निरनिराळया गोष्टी तितक्याच तीव्रतेने हव्या असतात किंवा कराव्याशा वाटतात. पण त्यापैकी कोणती तरी एकच गोष्ट मिळणे किंवा करता येणे शक्य असते. अशा स्थितीत नेमकी कोणती गोष्ट मिळवावी किंवा करावी याबद्दल मनाची द्विधा स्थिती होते व संघर्ष निर्माण होतो.

व्यक्तीला एकाच वेळी दोन गोष्टी नको असतात. पण त्यापैकी कोणती एकच टाळता येणे शक्य असते. जसे 'इकडे आड तिकडे विहीर'

एकाच वेळी एकच गोष्ट हवीही असते व नकोही असते. अशा स्थितीत हवे-नको प्रकारचे संघर्ष निर्माण होतात.

Robinson S. (2009). Foundation of Educational Psychology. New Delhi : Ane Books Publication Pvt. Ltd. Page no. 190

१.४.२ मानसिक संघर्षाची कारणे :

१. व्यक्तीच्या निरनिराळया गरजा असतात. प्रत्येक व्यक्तीला इतरांचे प्रेम मिळावे, आपली अस्मिता काय राहावी, प्रतिष्ठा लाभावी व वाढावी असे वाटत असते, काम करतात त्या ठिकाणी प्रेमळ वातावरण नसेल, केलेल्या कार्याची साधी स्तुती नसेल, आपसी स्पर्धा निर्माण झाली असेल तर संघर्ष निर्माण होतो.

२. आपल्याला नेहमीच आपल्या इच्छेनुसार वागता येत नाही. दिलेल्या निर्देशांनुसारच कार्य करावे लागते व वागावे लागते. परंतु यामुळे समस्या निर्माण होतात त्या सोडविण्यासाठी सुध्दा अनुचित प्रकारच्या क्लृप्त्या सुचविल्या जातात व त्याची अंमलबजावणी करावी असे सांगितले जाते परंतु हया क्लृप्त्या तुटपुंज्या आहेत असे वाटते तेव्हा मनामध्ये संघर्ष निर्माण होतो.

३. एकलकोंडेपणा हे सुध्दा मानसिक संघर्षाचे कारण आहे. जेव्हा शाळेमध्ये एखादया शिक्षकाला शिक्षक वेगळे टाकतात तेव्हा मी काय केले की माझ्याशी हे सर्वजण असे वागतात अशी भावना निर्माण होते व त्यामुळे मानसिक संघर्ष निर्माण होतो.

Mani Vempati Rajo, Rao Digumarti Bhaskar. (2009). Frustration of prospective Teachers. New Delhi : Discovery Publication House. Page no. 32

१.४.३ मानसिक संघर्षाचे परिणाम :

मानसिक संघर्षाचा मानसिक स्वास्थ्यावर परिणाम होतो. मानसिक संघर्षामुळे विषम समायोजन घडून येते. मनाची द्विधा अवस्था झाली की, एक प्रकारे तणाव निर्माण होतो आणि शक्तिक्षय होऊ लागतो. संघर्षामुळे व्यक्तीला नेमके काय करावे हे सुचत नाही. तिच्या कृती युक्तीतील जोम कमी होतो. संघर्ष तीव्र झाला तर ईम्लेटसारखे जगावे की मरावे असे वाटू लागते. व्यक्ती नैराश्याच्या व वैफल्याच्या तावडीत सापडते. वैफल्यातून बाहेर पडण्यासाठी ती समायोजनाचे कृत्रिम वर्तनप्रकार शोधण्याचा प्रयत्न करते.

१.४.४ मानसिक संघर्ष कमी करण्याचे उपाय :

१. मानसिक संघर्षाच्या कारणापासून अलिप्त राहण्याचा प्रयत्न करावा.
२. संघर्ष निर्माण झाला असता त्याची कारणमीमांसा करून नेमकी कारणे कोणती हे निश्चित करावे.
३. मानसिक संघर्ष निर्माण करणाऱ्या गोष्टीपैकी कोणती गोष्ट अधिक महत्त्वाची व इष्ट याचा एकूण परिस्थिती लक्षात घेऊन विचार करावा जास्त इष्ट अशा गोष्टीकडे वळून दुसरी गोष्ट टाळावी लागली याबद्दल खंत बाळगू नये.
४. आपल्यापेक्षा अधिक जीवनानुभव असलेल्या व्यक्तीचा सल्ला घ्यावा.
५. काय करावे व काय करू नये हे ठामपणे ठरविण्याची कालमर्यादा निश्चित करावी.
६. निर्णय तडीस नेण्याचा प्रयत्न करावा वगळलेल्या गोष्टीकडे विचार करीत बसू नये.

कुळकर्णी के. वी. शैक्षणिक मानसशास्त्र. पुणे : नुतन प्रकाशन. पृष्ठ क्र. ३२८-३३०

१.४.५ वैफल्याची संकल्पनात्मक रूपरेखा :

जेव्हा व्यक्तीच्या ध्येयपूर्तीत अडथळा येतो व तिचे ध्येय पूर्ण होऊ शकत नाही तेव्हा त्या व्यक्तीस वैफल्य येते तसेच जेव्हा व्यक्तीच्या मनासारखे होत नाही, व्यक्तीच्या इच्छा पूर्ण होत नाही तेव्हाही व्यक्तीला वैफल्य येते. वैफलयामुळे व्यक्तीच्या मनावरचा ताणतणाव वाढतो ज्यावेळी व्यकतीला एखादया गोष्टीची गरज भासते, त्यावेळी त्या गरजेची पूर्तता करण्यासाठी त्या व्यक्तीची धडपड चालू असते परंतु खूप प्रयत्न करूनही गरजेची पूर्तता होत नाही त्यावेळी वैफल्य येण्याची शक्यता असते.

जगताप ह. ना. शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र. पुणे : नित्य नुतन प्रकाशन पृष्ठ क्र. १५१

कोणतीही गोष्ट करतांना एखादा हेतू आपल्या मनात असतो. हेतू साध्य करण्यासाठीच आपली सर्व धडपड चालू असते. हेतू किंवा ध्येय नेहमीच साध्य होते असे नाही. इप्तिस साध्य झाले नाही, मनासारखे घडले नाही, अपयश पदरी आले की आपले मन खटटू होते, मनात उद्विग्नता व निराशा घर करू लागतात. या स्थितीतून वैफल्याचा जन्म होतो. ध्येयसिध्दी झाली नाही किंवा इप्सित साध्य झाले नाही तर मनाची जी स्थिती होते ती म्हणजेच वैफल्य होय. वैफल्यामुळे मानसिक स्वास्थ्य बिघडते, वैफल्यभावनेने मनाचा ताबा घेतला की व्यक्ती पुन्हा प्रयत्न, चढाई, पीछेहाट, ध्येयान्तर किंवा संरक्षण यंत्रणांचा आधार घेते.

१.४.६ वैफल्याची कारणे :

इप्सित साध्य होण्यास अडथळे निर्माण झाले, अपमान वा अपयश पदारी आले की, मनोविग्रह होऊन मनात वैफल्याची भावना घर करू लागते. वैफल्याची काही कारणे बाहय परिस्थितीशी तर काही व्यक्तीतील उणीवा व दोषाशी निगडित असतात.

वैफल्याची बाहय कारणे :

वैफल्याची बाहय कारणे ही बाहय परिस्थितीवर निर्भर असतात. यामध्ये व्यक्ती निराधार होणे, मोठया प्रमाणावरील अडचण निर्माण होणे वा अडचणीमध्ये सापडणे, विविध प्रकारच्या निर्बधामुळे एखादी गोष्ट करण्यास मज्जाव होतो. अशा प्रकारच्या कारणामुळे व्यक्तीच्या मनासारखे घडत नाही. यशाच्या व सुखाच्या मार्गात अनेक अडचणी निर्माण होतात. प्रयत्न करूनही काही जमत नाही परिणामत: वैफल्याची भावना रूजू लागते.

वैफल्याची वैयक्तिक कारणे :

अपेक्षित असलेल्या बाबी पूर्ण करण्यामध्ये वा साध्य करण्यामध्ये व्यक्तीची शारीरिक किंवा बौद्धिक कुवत कमी पडते. करीत असलेल्या व्यवसायामध्ये जम बसावा असे वाटत नाही. पण निवडलेल्या व्यवसायाच्या अनुशंगाने आवश्यक क्षमता आणि बांधिलकी अंगी नसते. कार्यामधील अपयश नको असते पण दिलेले वा निर्धारित केलेले कार्य करण्याची वैयक्तिक क्षमता नसते.

बाहय अडथळयामुळे निर्माण होणाऱ्या वैफल्यापेक्षा व्यक्तिगत उणीवांमुळे येणारे वैफल्य जास्त हानिकारक असते. अपयशाच्या भीतीचा पगडा एकदा मनावर बसला, आपण काही करू शकत नाही कुचकामाचे आहोत असा न्यूनगंड एकदा निर्माण झाला की शक्य त्या गोष्टीही व्यक्ती नीट करून शकत नाही. वैफल्याची भावना आणखी दृढ होऊन व्यक्तीचे जीवन दु:खमय होते.

तात्पर्य एखादया ध्येयसिद्धीसाठी आवश्यक असणारी क्षमता स्वत:मध्ये नसणे हे व्यक्तिगत स्वरूपाचे कारण होय तर क्षमता नसून देखील आर्थिक, सामाजिक वा सांस्कृतिक बंधनामुळे ध्येयसिद्धि करता न येणे हे परिस्थिती स्वरूप कारण होय.

कुळकर्णी के. वी. (२००५). शैक्षणिक मानसशास्त्र. पुणे : नुतन प्रकाशन. पृष्ठ क्र. ३३२

१.४.७ वैफल्याचे परिणाम :

१. वैफल्यामुळे परिस्थितीला सामोरे जाण्याची भिती निर्माण होऊन आपल्याला अपयश येईल हीच भिती सतत व्यक्तीला भेडसावत असते.
२. वैफल्यामुळे व्यक्ती सतत चिंतेत असतो की आता आपले कसे होईल.
३. जसे जसे वैफल्य वाढू लागते, व्यक्तीतील आत्मविश्वास जास्त प्रमाणात ढासळू लागतो.
४. वैफल्यामुळे व्यक्तिचे मन उदिवग्न व उदास होते, त्याच्यातील उत्साह नाहीसा होतो त्याचे मनोरथ व महत्त्वाकांक्षा ढासळू लागतात.
५. वैफल्यामुळे व्यक्तीची नव-निर्माण क्षमता कमी होते. कल्पनाशक्ती क्षीण होत जाते.
६. अशा व्यक्ती वैफल्यातून काही वेळा आक्रमक व विध्वंसक बनतात व समाजविघातक गोष्टीकडे वळतात.
७. वैफल्यामुळे विषम समायोजनाचे दुष्टचक्र सुरू होते वैफल्यातून चिंता, भिती कार्यक्षमतेचा क्षय या सर्वामुळे विषम समायोजन, अपयश आणि त्यातून पुन्हा वैफल्य असे ते चक्र असते.

नानकर शिरोडे, सुबोध शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र. नागपूर : श्री विद्या प्रकाशन पृष्ठ क्र. १४४-१४५

वैफल्य हे संघर्षातून निर्माण होते व्यक्तीच्या जीवनात अनेकवेळा संघर्षाची परिस्थिती निर्माण होते ही परिस्थिती बरेचदा गरजांची पूर्तता न झाल्यामुळे निर्माण होते. अशा वेळी मनुष्य ज्या मानसिक परिस्थितीचा अनुभव घेतो, त्याचा अभ्यास करणे मानसशास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाचे असते त्यामुळे व्यक्तिवर्तनाचा उलगडा होण्यास मदत होते.

१.४.८ वैफल्यातून बाहेर पडण्याचे मार्ग :

स्वत:ची कुवत आणि परिस्थितीचे यथायोग्य मूल्यमापन न केल्यामुळे वैफल्य नशिबी येते. स्वत:च्या कुवतीविषयी अवास्तव व अतिरेकी कल्पना उराशी बाळगून जीवनात वावरणाऱ्या व्यक्तीला जास्त अपयश पाहावे लागते. परिस्थिती नेहमीच अनुकूल असेल अशी कल्पना करून घेतलेल्या व्यक्तीला प्रतिकूल घडल्यास जास्त त्रास होतो. म्हणून स्वत:विषयी व परिस्थिती विषयी योग्य व

सम्यक विचार करून ध्येये ठरवावीत आणि पावले उचलावीत हे इष्ट आहे. वैफल्याचा अंमल सुरू होऊ लागला आहे, असे वाटताच त्याच्या कारणांचा शोध घ्यावा, बाहय कारणापैकी जी कारणे दूर करता येणे शक्य असेल, ती दूर करण्याचा प्रयत्न करावा. यशाचा मार्ग अपयशातून पुढे जात असतो हे लक्षात ठेवून अपयशाने गांगरून जाऊ नये. नैराश्याला सहजासहजी थारा देऊ नये. अनेक संकटांना व अडचणींना तोंड देऊन कणखरपणे उभ्या असलेल्या व्यक्तीचे आदर्श समोर ठेवावेत. वैफल्यातून बाहेर पडून जीवनाशी समरस झालेल्या व्यक्ती आढळतात, वैफल्याच्या वेळी व्यक्तीला कुणाचा तरी आधार हवा असतो. भावनिकदृष्टया अस्वस्थ व्यक्ती अविचाराला जितकी लवकर तयार होतात तितकीच ती लवकर शांतही होतात. वैफल्याच्या स्थितीत आशेचा किरण दाखविणारा कुणी तरी हवा असतो.

कुळकर्णी के. वी. (२००५). शैक्षणिक मानसशास्त्र. पुणे : नुतन प्रकाशन. पृष्ठ क्र. ३३३

१.४.९ शालेय घटनांच्या संदर्भात शिक्षकांचे वैफल्य :

शाळा स्तरावर शिक्षकीय पेशामध्ये कार्यरत असताना शिक्षकांना विविध प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागते. या समस्या सोडविण्यासाठी शिक्षक सक्रीय प्रयत्न करतात. परंतु शालेय स्तरावर काही घटना अशा असतात की त्या सोडविताना शिक्षकांकडून करण्यात येणाऱ्या प्रयत्नांना यश प्राप्त होत नाही. अशा स्थितीत प्रथमत: शिक्षकामध्ये शालेय घटनांच्या संदर्भात चिंता निर्माण होते. शिक्षक पुन्हा प्रयत्न करतात परंतु तरीही समस्या सुटत नाहीत परिणामत: ताण-तणावाची परिस्थिती निर्माण होते. आणि या स्थितीत शालेय स्तरावरील विविध घटनांच्या संदर्भात शिक्षकांना असलेल्या समस्या न सुटल्यास त्यांच्यामध्ये वैफल्याची स्थिती निर्माण होते.

अध्ययन अध्यापन प्रक्रियेच्या दरम्यान शालेय स्तरावर शिक्षकांना विविध घटनांचा सामोरे जावे लागते. या घटनांच्या संदर्भात त्यांच्या सोडवणुकीसाठी सातत्याने प्रयत्न करून सुध्दा त्याची प्रभावी सोडवणूक होत नाही आणि पुन्हा पुन्हा अशा घटना घडत राहतात त्यामुळे शिक्षकांना वैफल्य येते.

१.५ संशोधन विषयाची निवड :

अध्ययन अध्यापन प्रक्रियेमध्ये शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेची भूमिका महत्त्वपूर्ण असते त्याची अभियोग्यता ही अध्ययन अध्यापन प्रक्रियेशी संबंधित विविध घटक ज्यामध्ये प्रामुख्याने वर्गामध्ये, शाळेतील शिक्षकांमध्ये आणि विविध आंतरक्रियात्मक बाबीमध्ये समायोजन कसे साधावे यासाठी दिशा देण्याचे कार्य होत असते. अध्ययन अध्यापनाच्या प्रक्रियेमध्ये शिक्षकांच्या समायोजनाची भूमिका महत्त्वाची आहे. जर शिक्षक शालेय वातावरणाच्या विविध घटकांशी समायोजित असतील तर त्यामाध्यमातून ते आपली मनस्थिती स्थीर ठेवू शकतात आणि निर्धारित उद्दिष्टये साध्य करू शकतात.

याशिवाय अध्यापन अभियोग्यतेच्या संदर्भात अपेक्षित बाबींची शिक्षकांमधील उपस्थिती आणि शिक्षकांचे शालेय स्तरावरील विविध घटकांशी असलेल्या समायोजनाची कमतरता अथवा अभाव शिक्षकांच्या शालेय घटनांच्या संदर्भातील वैफल्याला प्रभावीत करीत असतात. अध्यापन अभियोग्यता, शालेय समायोजनाचा शिक्षकांचा स्तर चांगला असेल तर शालेय घटनांच्या माध्यमातून ज्या वैफल्य येण्यासारख्या बाबी घडतात, त्यामध्ये योग्य समन्वय प्रस्थापित करून मार्ग काढण्याचा प्रयत्न शिक्षकाकडून होतो. म्हणजे शिक्षकांची अध्यापन अभियोग्यता आणि त्यांचे समायोजन जर प्रभावी असेल तर शालेय घटनाच्या माध्यमातून शिक्षकांमध्ये वैफल्य निर्माण होणार नाही आणि त्याचा परिणाम त्यांच्या अध्ययन अध्यापन प्रक्रिया आणि एकंदर शालेय जीवनावर अनुकूल होण्यास मदत होईल. अशा स्थितीत माध्यमिक स्तरावरील अनुदानित विनाअनुदानित माध्यमिक शाळांमध्ये ग्रामीण व शहरी भागामध्ये कार्यरत असलेल्या पुरूष आणि महिला शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेच्या संदर्भात त्यांचे समायोजन आणि शालेय घटनांच्या संदर्भातील वैफल्याचा अभ्यास यामध्ये करण्यात आलेला आहे.

१.६ संशोधनाची गरज व महत्त्व :

कोणत्याही राष्ट्राचा विकास हा तेथील नागरिकांना दिल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या गुणवत्तेवर अवलंबून असतो आणि शिक्षणाची गुणवत्ता ही शिक्षकांच्या वर्तनाशी आणि त्यांच्या गुणवत्तेशी संबंधित असते. आजच्या २१ व्या शतकाच्या उंबरठयावर असताना माहिती व तंत्रज्ञान युगात विद्यार्थ्यांचे भवितव्य हा विषय शिक्षकांसाठी महत्त्वाचा आहे. त्यासाठी शालेय जीवनामध्ये शिक्षकांनी आपल्या व्यवसायाशी संबंधित आचारसंहितांचे काटेकोर पालन करून शिक्षकीय पेशाशी संबंधित तत्त्वाचे आचरण प्रत्यक्ष आपल्या अध्यापकीय व्यवसायामध्ये करणे आवश्यक आहे. अध्यापन अध्ययन प्रकियेमध्ये शिक्षकांची आवड असणे आवश्यक आहे तसेच त्यामध्ये अध्यापकीय अभियोग्यता सुध्दा प्रभावी असली पाहिजे. ही प्रभावी अध्यापकीय अभियोग्यता शिक्षकांना त्यांच्या अध्यापन कार्यामध्ये येणाऱ्या विविध प्रकारच्या अडथळयांना आणि अडचणींना दूर करण्याचे कार्य करीत असते. कारण माझा मुख्य हेतू हा अध्ययन अध्यापन कार्य प्रभावी करणे व त्यामध्ये येणाऱ्या विविध प्रकारच्या अडचणींचे सातत्याने निरसन करणे आहे. शालेय स्तरावर आलेल्या अडचणी दूर करूनच शिक्षणाच्या संदर्भात विद्यार्थ्यांचे अपेक्षित उद्दिष्टे साध्य होऊ शकतात, याची जाणीव शिक्षकांना असल्यास ते विविध अडचणींवर सहजतेने मात करतात यासाठी शिक्षकांमध्ये अध्यापन अभियोग्यतेची भूमिका ही

महत्त्वाची आहे. ज्या शिक्षकांमध्ये ही अध्यापन अभियोग्यता प्रभावी आहे ते सातत्याने आपल्या अध्यापन कार्याशी संबंधित बाबीवर सर्वाधिक लक्ष देतात. शिवाय वर्गामधील विद्यार्थ्यांशी होणाऱ्या आंतरक्रिया, शिक्षकांशी होणाऱ्या आंतरक्रिया यामध्ये योग्य समायोजन प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात. म्हणजे शालेय वातावरणांशी अशा शिक्षकांचे समायोजन चांगले असते. याउलट परिस्थिती असल्यास समायोजनावर विपरीत प्रभाव पडतो आणि शालेय वातावरणामध्ये विविध समस्या निर्माण होतात. म्हणजे शिक्षकांमध्ये शालेय वातावरणाशी निगडीत होण्यासाठी त्यांच्यामध्ये प्रभावी अध्यापन अभियोग्यता असणे अपेक्षित आहे त्यामुळे त्यांचे प्रभावी समायोजन शालेय वातावरणाशी होऊन अपेक्षित उद्दिष्टये साध्य होतील. तसेच शालेय स्तरावर शालेय घटनांच्या संदर्भात विविध प्रकारची वैफल्य निर्माण करणारी परिस्थिती निर्माण होते त्यामध्ये विद्यार्थ्यांचे परस्परांशी होणारे वाद, विद्यार्थ्यांना आशय न समजणे, एकमेकांचे दोष शिक्षकाकडे सांगणे अशा स्थितीत शिक्षकांना योग्य प्रकारचा निर्णय घ्यावा लागतो. कधी कधी या शालेय घटनांमुळे शिक्षकांमध्ये वैफल्य निर्माण होण्याची भिती सुध्दा नाकारता येत नाही. अशा स्थितीत माध्यमिक स्तरावरील शिक्षकांमध्ये असलेली अध्यापन अभियोग्यतेच्या संदर्भात त्यांचे समायोजन आणि शालेय घटनांमधील वैफल्य काय आहे याचा अभ्यास करणे आवश्यक आहे जेणे करून त्यांची अध्यापन अभियोग्यता आणि समायोजनाचा स्तर विकसित करता येईल आणि त्यामाध्यमातून त्यांचे वैफल्य कमी करून शालेय माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या संदर्भात अपेक्षित उद्दिष्टे साध्य होतील आणि विद्यार्थ्यांच्या संदर्भातील गुणवत्ता विकासाला चालना मिळेल यासाठी प्रस्तुत संशोधन कार्य करणे गरजेचे आहे.

१.७ संशोधन विषयाचे शीर्षक :

"माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेच्या संदर्भात त्यांचे समायोजन व शालेय घटनातील वैफल्य एक सर्वेक्षण"

१.८ संशोधन विषयाच्या शीर्षकातील संज्ञांच्या कार्यात्मक व्याख्या :

प्रस्तुत संशोधनातील संज्ञांच्या कार्यात्मक व्याख्या पुढीलप्रमाणे निर्धारित करण्यात आलेल्या आहेत.

माध्यमिक स्तरावरील शिक्षक :

इयत्ता ९ वी मधील विद्यार्थ्यांना अध्ययन अध्यापन करणाऱ्या शिक्षकांना प्रस्तुत संशोधनामध्ये माध्यमिक स्तरावरील शिक्षक म्हणून संबोधण्यात आलेले आहे.

अध्यापन अभियोग्यता :

प्रस्तुत संशोधनामध्ये शिक्षकांची अध्यापन अभियोग्यता म्हणजे शर्मा एस. एन. यांनी विकसित केलेल्या Teaching Aptitude Battery मध्ये निर्धारित करण्यात आलेले प्रमुख घटक त्यामध्ये शिक्षकांची मानसिक क्षमता, विद्यार्थ्यांच्या संदर्भात दृष्टिकोन किंवा वृत्ती, स्वीकार्यता/अनुकून क्षमता, व्यवसायिक माहिती आणि व्यवसायिक अभिरूची व या प्रत्येक घटक निहाय निश्चित करण्यात आलेल्या विधानांना माध्यमिक स्तरावरील शिक्षकांनी दिलेल्या प्रतिसादाची संख्यात्मक स्वरूपात गणना करून प्राप्त झालेले प्राप्तांकांना प्रस्तुत संशोधनामध्ये शिक्षकांची अध्यापन अभियोग्यता म्हणून संबोधण्यात आलेले आहे.

समायोजन :

प्रस्तुत संशोधनामध्ये शिक्षकांचे समायोजन म्हणजे मंगल एस. के यांनी विकसित केलेल्या Adjustment Inventory मध्ये निर्धारित करण्यात आलेले प्रमुख घटक यामध्ये शिक्षकांचे सामाजिक-मानसिक-शारीरिक समायोजन, व्यवसायिक संबंध समायोजन, वैयक्तिक जीवन समायोजन आणि वित्तीय समायोजन व कार्य समाधान व या प्रत्येक घटक निहाय निश्चित करण्यात आलेल्या विधानांना माध्यमिक स्तरावरील शिक्षकांनी दिलेल्या प्रतिसादाची संख्यात्मक स्वरूपात गणना करून प्राप्त झालेल्या प्राप्तांकांना प्रस्तुत संशोधनामध्ये शिक्षकांचे समायोजन म्हणून संबोधण्यात आलेले आहे.

शालेय घटनांतील वैफल्य :

प्रस्तुत संशोधनामध्ये शिक्षकांचे शालेय घटनांमधील वैफल्य म्हणजे गोयल यांनी विकसित केलेल्या Teacher Reaction to Frustration in School situation Scale मध्ये निर्धारित करण्यात आलेले प्रमुख घटक यामध्ये आक्रमकतेचे क्षमण, प्रगती, आक्रमण, अवरोध वर्चस्व, अहंकार संरक्षण आणि गरज अत्यावश्यकता व या प्रत्येक घटक निहाय निश्चित करण्यात

आलेल्या विधानांना शिक्षकांनी दिलेल्या प्रतिसादाची संख्यात्मक स्वरूपात गणना करून प्राप्त झालेले प्राप्तांकांना प्रस्तुत संशोधनामध्ये शिक्षकांचे शालेय घटनांमधील वैफल्य म्हणून संबोधण्यात आले आहे.

१.९ संशोधनाची उद्दिष्टये :

१. माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेचा अभ्यास करणे.

२. माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या समायोजनाचा अभ्यास करणे.

३. माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या शालेय घटनांमधील वैफल्यांचा अभ्यास करणे.

४. माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेच्या संदर्भात त्यांच्या समायोजनाचा अभ्यास करणे.

५. माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेच्या संदर्भात त्यांच्या शालेय घटनातील वैफल्यांचा अभ्यास करणे.

१.१० संशोधनाच्या परिकल्पना :

१. माध्यमिक स्तरावरील शाळा प्रकार (Aided & Non-aided school), लिंग (Gender) आणि शाळा क्षेत्राचा (Area of School) शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेवर (Teaching Aptitude) सार्थक प्रभाव पडत नाही.

२. माध्यमिक स्तरावरील शाळा प्रकार (Aided & Non-aided school), लिंग (Gender) आणि शाळा क्षेत्राचा (Area of School) शिक्षकांच्या समायोजनावर (Teacher Adjustment) सार्थक प्रभाव पडत नाही.

३. माध्यमिक स्तरावरील शाळा प्रकार (Aided & Non-aided school), लिंग (Gender) आणि शाळा क्षेत्राचा (Area of School) शिक्षकांच्या शालेय घटनातील वैफल्यावर (Frustration of school situation) सार्थक प्रभाव पडत नाही.

४. माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेचा (Teaching Aptitude) त्यांच्या समायोजनावर (Adjustment) सार्थक प्रभाव पडत नाही.

५. माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेचा (Teaching Aptitude) त्यांच्या शालेय घटनातील वैफल्यावर सार्थक प्रभाव पडत नाही.

१.११ संशोधनाची व्याप्ती :

१. प्रस्तुत संशोधन हे अमरावती विभागतील माध्यमिक स्तरावरील शिक्षकापुरती या संशोधनाची व्याप्ती आहे.

२. प्रस्तुत संशोधनामध्ये अमरावती विभागातील माध्यमिक स्तरावरील शिक्षकांची अध्यापन अभियोग्यता, समायोजन आणि शालेय घटनांच्या संदर्भातील वैफल्यापुरती या संशोधनाची व्याप्ती आहे.

१.१२ संशोधनाच्या मर्यादा व परिमर्यादा:

१. प्रस्तुत संशोधन माध्यमिक स्तरावरील शिक्षकापुरतेच मर्यादित आहे.

२. प्रस्तुत संशोधन कार्य हे अमरावती विभागातील अनुदानित व विनाअनुदानित माध्यमिक विद्यालयापुरते मर्यादित आहे.

३. प्रस्तुत संशोधन कार्य अमरावती विभागातील ग्रामीण व शहरी भागातील माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकांपुरते मर्यादित आहे.

४. या संशोधनामध्ये अनुदानित व विनाअनुदानित माध्यमिक शाळांमध्ये ग्रामीण व शहरी भागामध्ये अध्यापन करणारे पुरूष व स्त्री शिक्षक यांचाच अभ्यास या संशोधनामध्ये करण्यात आला आहे.

५. प्रस्तुत संशोधनामध्ये माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेचाच अभ्यास करण्यात आलेला आहे.

६. प्रस्तुत संशोधनामध्ये माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या समायोजनाचाच अभ्यास करण्यात आला आहे.

७. प्रस्तुत संशोधनामध्ये माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या शालेय घटनांमधील वैफल्याचा अभ्यास करण्यात आला आहे.

८. प्रस्तुत संशोधन कार्य हे माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेच्या संदर्भात त्यांचे समायोजन आणि शालेय घटनांमधील वैफल्यापुरतेच मर्यादित आहे.

प्रकरण २ रे

संबंधित पूर्व साहित्याचा व संशोधनांचा आढावा

२.१ प्रस्तावना :

शैक्षणिक संशोधनाच्या क्षेत्रात पूर्व संशोधनांचा आढावा व संबंधित साहित्याचे समालोचनाला विशेष महत्त्व आहे. कोणतेही संशोधन करीत असताना या संशोधन विषयाच्या संदर्भात पूर्वी काय अभ्यास झाला आहे, कोणत्या घटकांचा अभ्यास करण्यात आला आहे, कोणत्या चलांचा विचार करण्यात व कोणते संशोधन झाले आहे, याचा आढावा घेणे आवश्यक आहे. त्यामुळे संशोधनकर्त्याला संशोधन कार्याच्या संदर्भात योग्य मार्गदर्शन प्राप्त होऊन संशोधनाचा पाया मजबूत होण्यास दिशा प्राप्त होते.

२.२ पूर्व संशोधनाचा आढावा घेण्याची आवश्यकता :

संशोधन कार्य करीत असताना संदर्भ साहित्याचा उपयोग फार महत्त्वपूर्ण ठरतो. त्या विषयासंबंधी यापूर्वी झालेल्या संशोधनाचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते. संशोधन करीत असताना संशोधन कार्याची पुनरावृत्ती होऊ नये, संशोधन अधिक विश्वसनिय ठरावे त्यात मौलिकता, नवा दृष्टिकोन असावा तसेच संशोधन कार्याला योग्य दिशा प्राप्त व्हावी व संशोधन विषयाच्या संदर्भात योग्य माहिती मिळावी या हेतूने संबंधित पूर्व संशोधनाचा आढावा घेणे आवश्यक असते.

Moule George यांनी **"The Science of Education Research"** या पुस्तकात म्हटले आहे की, "The review of literature promote a greater understanding of the problem and it accepts ensure the avoidance of necessary duplication. It is also provides comparative data on the basis of which to evaluated and interprete the significance of one's finding."

पूर्वी झालेल्या संशोधन कार्याचा शोध घेण्याकरिता दीर्घ प्रयत्न करावे लागत असले तरी, त्यामुळे संशोधनाचे कार्य पद्धतशीर सफल होण्यास मदत होते. शैक्षणिक संशोधनात संशोधकाला सुद्धा त्या-त्या विषयाबद्दल माहिती असणे आवश्यक आहे, कारण त्यावरुन संशोधन विषयाबद्दल अधिक माहिती मिळू शकते.

२.३ पूर्व संशोधनाचा आढावा घेण्याची उद्दिष्टये :

उपयुक्त समस्या क्षेत्र निवडणे :

सबंधित साहित्याचा आढावा घेतल्याने अफलदायी व निरुपयोगी क्षेत्र वगळून समस्या क्षेत्र निवडण्यास मदत होते. परिणामी संशोधन समस्येच्या निवडीकरिता मदत होते.

संशोधन पद्धतीची जाणीव करुन देणे :

संशोधकास संशोधनाच्या विविध पद्धतीची माहिती प्राप्त होते. यामुळे कोणती संशोधन पद्धती निवडावी हे कळते. यथार्थ व उपयुक्त माहितीमुळे अंतर्दृष्टी प्राप्त होऊन संशोधनाच्या यशप्राप्तीकडे यशस्वीपणे वाटचाल करता येते.

संशोधन साधनाची निवड करणे :

संशोधन समस्येचे निराकरण करण्याकरिता विविध प्रकारची माहिती संकलित करावी लागते. यथार्थ, वैध, विश्वसनीय माहिती संकलनाकरिता योग्य साधनांची निवड करावी लागते. याकरिता पूर्व संशोधन व साहित्याच्या आढाव्याने दिशादर्शन होते.

पूर्व संशोधनाच्या शिफारशी जाणून घेणे :

पूर्वी झालेल्या संशोधनाचा आढावा घेण्याचा उद्देश म्हणजे त्यांनी आपल्या संशोधनात कोणत्या शिफारशी केलेल्या आहेत याची माहिती मिळविणे होय. पुढील संशोधनाकरिता कोणत्या विधायक सूचना केलेल्या आहे याचीही माहिती मिळते.

संशोधन क्षेत्राची मर्यादा निश्चित करणे :

पूर्व संशोधनाच्या आढाव्यामुळे आपल्याला संशोधनाचे कार्यक्षेत्र निश्चित करणे, व्याप्ती व मर्यादा ठरविणे, न्यादर्शाची निवड करणे.

पूर्व संशोधनाचे गुणदोष ठरविणे :

पूर्व संशोधनाच्या आढाव्याच्या आधारे संशोधनातील गुण व उणिवा लक्षात येण्यास मदत होते. या आधारावर नवीन संशोधन करताना उनात्मक संशोधनाकरिता दोष वगळून उत्कृष्टतेचा स्वीकार करण्यास मार्गदर्शक व उपयुक्त ठरतात.

महत्त्वपूर्ण चलाचा शोध घेणे :

पूर्व संशोधनाच्या आढाव्याच्या आधारावर संबंधित चलाचे ज्ञान प्राप्त करुन नवीन चलाच्या शोध कार्यास मदत होते.

सांख्यिकीय तंत्रा बाबत मार्गदर्शन :-

संशोधन साधनाद्वारे प्राप्त माहितीचे अर्थ निर्वचन करण्याकरिता, सांख्यिकीय तंत्राची निवड करण्याकरिता मार्गदर्शक ठरतात.

२.४ संबंधित साहित्याचा आढावा :

दांडेकर, वा. ना. (२०००). शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र.

नागपुर : विद्या प्रकाशन. ६ वी आवृत्ती.

प्रस्तुत संदर्भ साहित्यामधुन वैफल्य, वैफल्याची संकल्पनात्मक रूपरेखा, व्याख्या, समायोजन, समायोजनाची संकल्पनात्मक रूपरेखा, समायोजनाचे घटक, समायोजन प्रक्रिया, समायोजनाला प्रभावित करणारे घटक याचा अभ्यास या संशोधन साहित्याच्या माध्यमातुन करण्यात आला आहे तसेच मानसिक आरोग्याची संकल्पना, मानसिक आरोग्य सदृढ राहण्यासाठी घ्यावयाची दक्षता, स्वस्थ मानसिक आरोग्य असणा-या व्यक्तीची वैशिष्टये त्यांचे वर्तन व व्यक्तिमत्व याचे सविस्तर विश्लेषण या संदर्भ साहित्यामध्ये करण्यात आलेले आहे.

बडवे, शेवतेकर, शारदा. (२००४). विकासाचे व अध्ययनाचे मानसशास्त्र.

नागपुर : श्री विद्या प्रकाशन.

प्रस्तुत संदर्भ साहित्याच्या माध्यमातुन शिक्षकांच्या मानसिक आरोग्याविषयी माहिती मिळाली तसेच विद्यार्थ्याप्रमाणे शिक्षकांच्याही मानसिक आरोग्याचा विचार व काळजी घ्यावयास हवी शिक्षकांना आपले मानसिक आरोग्य व मनःस्वास्थ टिकविता आले पाहीजे जर ते टिकविता आले नाही तर ते आपल्या विद्यार्थ्यांना त्याबाबत काय मदत व मार्गदर्शन करू शकतील त्यामुळे शिक्षकांचे मानसिक आरोग्य व समायोजन यांच्यामध्ये योग्य समन्वय साधने आवश्यक असल्याचे प्रतिपादन करण्यात आले आहे. याशिवाय शिक्षकांचे मानसिक आरोग्य यामधुन विद्यार्थ्याप्राणेच शिक्षकांच्याही मानसिक आरोग्याचा विचार व काळजी आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. शिक्षकांचा व्यावसायाविषयी चांगल्या गोष्टी त्याच प्रमाणे शिक्षकांचे मानसिक आरोग्य चांगले नसण्याची कारणे याविषयी सविस्तर माहिती यामध्ये विश्लेषित करण्यात आलेली आहे.

सोनवणे संजीव, कागरे शोभा (२००४). शैक्षणिक संशोधन व संख्याशास्त्र.

प्रस्तुत संदर्भ साहित्याच्या माध्यमातुन संशोधनाच्या पध्दती विषयी माहिती प्राप्त झाली तसेच पथदर्शी अभ्यासाविषयी माहिती, नमुना निवड त्याचे विविध प्रकार यापैकी योग्य पध्दतीचा वापर कसा

करावा याविषयी माहिती विश्लेषित करण्यात आलेली आहे. तसेच सांख्यिकीय प्रविधींचा वापर कसा करावा याविषयी संकल्पनात्मक माहिती सविस्तर प्रतिपादीत करण्यात आलेली आहे.

भिंताडे, वि. रा. (२००५). शैक्षणिक संशोधन पध्दती.

पुणे : नित्य नुतन प्रकाशन.

या संदर्भ साहित्याच्या माध्यमातुन संशोधन, संशोधनाची संकल्पना, शैक्षणिक संशोधन, संशोधन साहित्याचा आढावा, संशोधनाची जनसंख्या आणि न्यादर्श, संशोधनाची साधने आणि त्यांचा वापर यासंदर्भात उपयुक्त माहिती विश्लेषित करण्यात आली आहे.

करंदीकर, सुरेश (२००५). शैक्षणिक मानसशास्त्र.

या संदर्भ साहित्याच्या माध्यमातुन समायोजनाची व्याख्या, संकल्पना, अर्थ, महत्त्व, समायोजनाचे क्षेत्र, शिक्षकांचे व्यवस्थापनाच्या बाबतीत असलेले समायोजन, समायोजन साध्य करणसाठी मार्गदर्शन व समुपदेशन यांची भुमीका, समायोजित व्यक्तीची लक्षणे, विषम समायोजन याविषयी सविस्तर माहिती या साहित्यामधुन प्राप्त झाली तसेच समायोजन साधण्यासाठी प्रत्येक व्यक्ती सरंक्षण यंत्रणेचा कमी अधिक प्रमाणात वापर करीत असतो या सरंक्षण यंत्रणेचे सविस्तर विश्लेषण या संदर्भ साहित्यामध्ये करण्यात आलेले आहे.

बुरकले रामदास, पिचड नलिनी (२००६). शैक्षणिक मानसशास्त्र.

या संदर्भ साहित्याच्या माध्यमातुन शिक्षकाला मानसिक ताण येण्याची कारणे जसे अत्याधिक कार्यभार, व्यावसायिक असुरक्षितता, बढती नाही, असुरक्षितता, प्रतिष्ठेचा अभाव, कठोर नियंत्रण, इतर कार्यावर नियंत्रण याविषयीची सविस्तर माहिती मिळाली तसेच मानसिक तणावाचे व्यवस्थापन व तणावमुक्त शिक्षण जसे आपल्या विद्यार्थ्यांबरोबर सहानुभुतीचे वर्तन, सहकार्यांबरोबर मैत्रीपूर्ण संबंध आपल्या उणीवा मर्यादांचे भान, इत्यादी विषयीचे सविस्तर विश्लेषण या संदर्भ साहित्यामध्ये करण्यात आलेले आहे.

जगताप ह. ना. (२००७). शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र

पूणे : नित्य नुतन प्रकाशन

प्रस्तुत संदर्भ साहित्यामध्ये मानसिक आरोग्य, व मानसिक आरोग्यशास्त्र या घटकामधुन समायोजन, संघर्ष, शिक्षकांचे मानसिक आरोग्य व ते चांगले नसण्याची कारणे, वैफल्य, वैफल्याचे परिणाम याविषयी माहिती प्राप्त झाली या माहितीचा वापर प्रस्तुत संशोधनामध्ये करण्यात आला आहे. तसेच एखादया ध्येयसिध्दीसाठी आवश्यक असणारी क्षमता स्वत:मध्ये नसणे हे व्यक्तीगत स्वरूपाचे

कारण होय तर क्षमता असुन देखील आर्थिक सामाजिक वा सांस्कृतीक बंधनामुळे ध्येयसिध्दी करता न येणे हे परिस्थिती स्वरूप कारण आहे याविषयी विश्लेषण करण्यात आलेले आहे.

पोंक्षे, द. बा. (२००७). शैक्षणिक मानसशास्त्र आणि प्रायोगिक कार्य.

पुणे : नित्य नुतन प्रकाशन.

या संदर्भ साहित्याच्या माध्यमातुन शिक्षकांचे मानसशास्त्राविषयी माहिती प्राप्त झाली. तसेच शिक्षकांमध्ये असलेली विविध क्षमता क्षेत्रे, बांधिलकी क्षेत्र आणि त्यांचा प्रत्यक्ष अध्ययन अध्यापनामध्ये वापर कसा करावा याविषयी माहिती प्राप्त झाली तसेच शिक्षकांच्या अध्यापन विषयक विविध क्षमता वाढविण्यासाठी म्हणजे व्यावसायिक बांधिलकी वृध्दींगत करण्यासाठी विविध प्रकारचे उपाय यामध्ये प्रतिपादीत करण्यात आले आहे. त्याचा संशोधनाच्या संदर्भ साहित्यामध्ये वापर करण्यात आला आहे.

देशमुख, एल. जी. (२००७). शैक्षणिक मानसशास्त्र व अध्यापन शास्त्र.

कोल्हापूर : फडके प्रकाशन.

प्रस्तुत संदर्भ साहित्यामध्ये शिक्षकांच्या विविध भुमीका, त्या पार पाडतांना त्यांना घ्यावी लागणारी दक्षता, अध्ययन अध्यापनाबरोबरच सामाजिक बांधिलकी जोपासतांना करावे लागणारे समायोजन त्यामध्ये सामाजिक समायोजन, शालेय समायोजन कौटुंबिक समायोजन यासंदर्भातील आवश्यक माहितीचे विश्लेषण करण्यात आलेले आहे.

बर्वे, बी. एन., नरके, एच. के. (२००८). मनोमापन.

नागपूर : विद्या प्रकाशन प्रथम आवृत्ती.

प्रस्तुत संशोधन साहित्यामध्ये अभियोग्यता, अभियोग्यतेचे मापन, अभियोग्यतेची संकल्पनात्मक रूपरेखा या विषयी माहिती प्राप्त झाली तसेच अभियोग्यतेचे मापन करण्याच्या विविध पध्दतीपैकी कोणती पध्दती वापरणे शक्य आहे याची माहिती या संदर्भ साहित्याच्या माध्यमातुन प्राप्त झाली आहे. तसेच अभियोग्यता ही एक अशी व्यवस्था आहे की, त्यामध्ये काही गुणांचा अथवा गुणवैशिष्टयांचा संच असतो जो सुयोग्य प्रशिक्षणातुन काही ज्ञानातुन, आकलनातुन अथवा कौशल्यामधुन विकसित होतो याविषयीचे विवेचन यामध्ये करण्यात आले आहे.

गांजरे, रा. वि., चिटणीस अशुमती (२००९). अध्ययन अध्यापनाचे मानसशास्त्र आणि मानसशास्त्रीय प्रयोग.

पुणे : नित्य नुतन प्रकाशन.

या संदर्भ साहित्यामध्येमानसिक आरोग्य, मानसिक आरोग्याचे विविध घटक ते बिघडण्याची कारण मानसिक आरोग्य बिघडल्यामुळे निर्माण होणारे वैफल्य आणि त्याचे विविध घटकांवर होणारे परिणाम याविषयीची माहिती प्रतिपादीत करण्यात आली आहे.

चव्हाण, गणेश (२००९). अध्ययन अध्यापन पारंपारीक ते आधुनिक.

पुणे : नित्य नुतन प्रकाशन.

या संदर्भ साहित्यांच्या माध्यमातुन ताण-तणाव व्यवस्थापन कशाप्रकारे करावे याचे विवेचन करण्यात आले आहे तसेच वैफल्याची स्थिती निर्माण झाली असता त्यामधुन योग्य मार्ग कसा काढावा म्हणजे समायोजन प्रस्थापित करता येईल आणि आपली पूर्वस्थिती स्थापित करता येईल याविषयीचे विवेचन करण्यात आलेले आहे. याशिवाय समायोजन याविषयीची माहिती प्रतिपादीत करण्यात आलेली आहे.

पंडित, र. वि. शैक्षणिक मानसशास्त्र.

अभियोग्यता, अभियोग्यतेची संकल्पनात्मक रूपरेखा, अभियोग्यता क्षमता आणि संपादन यातील भेद, विशिष्ट कार्याला अनुसरून तयार केलेल्या अभियोग्यता चाचण्या याविषयी सविस्तर माहिती मिळाली तसेच समायोजन प्रक्रिया वैफल्यामुळे घडणा-या कार्याभिमुख प्रतिक्रिया, वैफल्यामुळे घडणा-या प्रतिकाभिमुख प्रतिक्रिया याविषयीचे विश्लेषण यामध्ये करण्यात आलेले आहे.

नानकर, शिरोडे. सुबोध शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र.

वैफल्याचे परिणाम जसे परिस्थितीला सामोरे जाण्याची भिती, सतत चिंता, आत्मविश्वास ढासळणे, कल्पना शक्ती क्षिण होणे, विषम समायोजन, वैफल्याचे चक्र याविषयीची माहिती मिळाली वैफल्य संघर्षातुन कसे निर्माण होतात याविषयीचे विश्लेषण यामध्ये करण्यात आलेले आहे.

घोरमोडे, के. यु. घोरमोडे कला. उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण.

माध्यमिक शिक्षण आयोगाने सांगितलेली माध्यमिक शिक्षणाची उदिद्ष्टये जसे व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास, देशप्रेम भावनेचा विकास, लोकशाही नागरीकत्वाचा विकास, व्यावसायिक कौशल्याचा विकास, नेतृत्व गुणांचा विकास, जीवनकलेचा विकास या विषयी सविस्तर माहिती प्राप्त झाली. तसेच उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षकांची भुमिका जसे शिक्षकांचे महत्व, त्यांची गुणवैशिष्टये, शिक्षकांचा व्यावसायिक विकास, शिक्षकांच्या व्यावसायिक विकासाचे प्रयत्न, याविषयी सविस्तर माहिती मिळाली. शिवाय विविध मूल्यांचा विकासात शिक्षकांची भूमिका याविषयी माहिती प्राप्त झाली.

२.५ संबंधित पूर्व संशोधन साहित्याचा आढावा :

प्रस्तुत संशोधन विषयाच्या संदर्भात संबंधित संशोधन साहित्याचा आढावा हा पीएच्. डी. प्रबंध, इंटरनेट वरील संशोधनपर माहिती आणि लेख, मासिके, साप्ताहिके, जर्नल यामधील संशोधनपर लेख

आणि विविध प्रोजेक्ट यांचा आधार घेऊन प्रस्तुत संशोधनाच्या बाबतीत संशोधन साहित्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेण्यात आलेला आहे.

Pandya (1993), Teaching Aptitude of secondary school teachers of Gujarat state in the contex of som psychosocial variable.

Ph. D. Education, Sardar patel University.

Online Catalogur of thesis Acc. No. 164025

या संशोधनामध्ये शिक्षक अभियोग्यतेचा विविध मानसशास्त्रीय व सामाजिक चलांच्या संदर्भात अभ्यास करण्यात आला. या संशोधनाची उद्दिष्टये पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली त्यामध्ये माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या व्यावसायिक अभियोग्यतेचा त्यांच्या मनो-सामाजिक चलांच्या संदर्भात अभ्यास करणे. माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या मनो-सामाजिक चलांचा त्यांच्या अध्यापन अभियोग्यतेवरील परस्पर आंतरक्रियांचा अभ्यास करणे.

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला आहे तसेच सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यासाठी प्रसरण विश्लेषण, टी परिक्षण या सांख्यिकीय प्रविधींचा वापर करण्यात आला.

या संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आले की, माध्यमिक स्तरावरील महिला आणि पुरूष शिक्षकांचा त्यांच्या अध्यापन अभियोग्यतेवर सार्थक प्रभाव पडत नाही. म्हणजे त्यांची अध्यापन अभियोग्यता जवळपास सारखी असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

Jaykand, Y. (2003), Eximined the Relationship Between the General Teaching competence and teacher attitude toward teaching.

Ph. D. in Education University of Mysore.

https://www.researchgate.net/.../313100853_Extraction_Characterization_and_Applicati...

यांनी आपल्या संशोधनामध्ये सामान्य शिक्षण क्षमता आणि शिक्षकांबद्दलच्या मनोवृत्तीमधील संबंधाचा अभ्यास केलेला आहे. या संशोधनासाठी १४ शाळांमधील ३०० शिक्षकांची नमुना म्हणून निवड करण्यात आली. या संशोधनामध्ये माहितीचे संकलन करण्यासाठी पारसी यांची शिक्षक अभियोग्यता चाचणी आणि अहुवालीया यांची शिक्षक अभिवृत्ती मापिकेचा वापर करण्यात आला. या संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आले की, शासकीय आणि अनुदानित शाळांमधील शिक्षकांच्या शिक्षक अभिक्षमतेमध्ये लक्षणीय फरक आहे, त्यामध्ये अनुदानित माध्यमिक शाळांमधील शिक्षकांची शिक्षक

अभिक्षमता सर्वाधिक प्रभावी आहे. तसेच पुरूष आणि महिला शिक्षकांच्या अध्यापन अभिक्षमतेमध्ये सार्थक फरक आढळून आला. त्याचप्रमाणे शिक्षकांचे वय, त्यांची शैक्षणिक पात्रता यासंदर्भात शिक्षकांची अध्यापन अभियोग्यता त्यांच्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत असलेल्या अभिवृत्तीला प्रभावीत करत असल्याचे स्पष्ट केले आहे. म्हणजे ज्या शिक्षकांची अध्यापन अभियोग्यता प्रभावी आहे त्या शिक्षकांचा त्यांच्या विद्यार्थ्यांच्या संदर्भातील दृष्टिकोन अधिक चांगला असल्याचे दिसून आले. तर कमी अध्यापन अभियोग्यता असलेल्या शिक्षकांचा त्यांच्या विद्यार्थ्यांच्या संदर्भातील दृष्टिकोन निम्न असल्याचे स्पष्ट केले आहे.

Kukreti, saxena and Gihar (2005), Correlational study between the values and teacher competence Special reference to Baswara District Rajasthan.
Journal of All Indian association for Educational Research 17 (3-4), 12-17
(Indian educational abstract,5 (1&2) 2005)
www.ijsret.org/pdf/EATHD-15032.pdf

या संशोधनामध्ये शिक्षकामधील मूल्य आणि त्यांची व्यावसायिक बांधिलकी यामधील संबंधाचा अभ्यास करण्यात आला आहे. त्यामध्ये व्यावसायिक बांधिलकी असलेले आणि व्यावसायिक बांधिलकी नसलेल्या शिक्षकांमधील मूल्याचा अभ्यास करण्यात आला. तसेच यामधील व्यावसायिक बांधिलकी असलेले आणि व्यावसायिक बांधिलकी नसलेल्या महिला आणि पुरूष शिक्षकांच्या संदर्भात त्यांच्या मूल्यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

या संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला आहे यामध्ये बहुआयामी न्यादर्शन प्रविधीचा वापर करण्यात आला त्यामाध्यमातून ३०० शिक्षकांची निवड यादृच्छिक न्यादर्शन प्रविधीच्या सहाय्याने १५ माध्यमिक शाळामधून करण्यात आली.

या संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आले की, न्यादर्श स्वरूपात निवड करण्यात आलेल्या शिक्षकांमध्ये कमी प्रमाणात धार्मिक, सामाजिक आणि सौदर्यात्मक मूल्ये आढळून आली. बांधिलकी असलेले आणि बांधिलकी नसलेल्या पुरूष शिक्षकांच्या सौदर्यात्मक, सामाजिक आणि मानवी मूल्यांच्या संदर्भात सार्थक फरक आढळून आला नाही. तर बांधिलकी असलेल्या महिला शिक्षकांमध्ये बांधिलकी नसलेल्या महिला शिक्षकांच्या तुलनेत त्यांच्या ज्ञानात्मक मूल्य, सर्जनशिलता, मानवी मूल्ये आणि धार्मिक मूल्ये अधिक प्रभावी आढळून आली. बांधिलकी नसलेल्या शिक्षकांमध्ये आर्थिक आणि राजकीय मूल्ये ही बांधिलकी असलेल्या शिक्षकांच्या तुलनेत अधिक प्रमाणात आढळून आली. तसेच

व्यवसायिक बांधिलकी असलेल्या शिक्षकांमध्ये व्यावसायिक मूल्य ही व्यावसायिक बांधिलकी नसलेल्या शिक्षकांच्या तुलनेत अधिक प्रमाणात आढळून आली असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

Jamal (2007), A Study of relationship of organization commitment of teacher stress, job satisfaction, teacher adjustment and socio emotional school climate.

Ph.D. in Education, VBS Purvanchal University Jaunpur

https://books.google.co.in/books?isbn=1365634833

यांनी आपल्या संशोधनामध्ये शिक्षकांचा तणाव, नोकरीमधील समाधान, शिक्षकांचे समायोजन आणि पुरूष व महिला शिक्षकांमधील सामाजिक भावनिक शाळा वातावरणामधील संबंधाचा अभ्यास केलेला आहे. त्यांना असे आढळून आले की, शिक्षकांचा ताण नकारात्मक संघटनात्मक वातावरणाशी निगडीत आहे याचा अर्थ असा की, जर शिक्षकांनी आपल्या संघटनाला वचनबद्ध होणे अपेक्षित होते, तर त्यांना तणावमुक्त राहणे आवश्यक आहे. शिक्षक समायोजन आणि सामाजिक व भावनिक शालेय वातावरण देखील संस्थात्मक व व्यावसायिक बांधिलकीसह सकारात्मक सहसंबंधीत असल्याचे आढळून आले. ज्या शिक्षकांचे शिक्षक समायोजन उच्च दर्जाचे होते त्यांच्या शाळांमधील संघटनात्मक वातावरण उच्च दर्जाचे असल्याचे या संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आले आहे.

वानखडे प्रतिभा, (२००९), अमरावती विभागातील ग्रामीण आणि शहरी भागातील माध्यमिक शाळेतील शिक्षकांची अध्यापन परिणामकारकता, शालेय वातावरण आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादन प्रेरणा यांच्या सहसंबंधाचा अभ्यास.

पीएच. डी. शिक्षण संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

या संशोधनाच्या संदर्भात पुढील उद्दिष्टये निश्चित करण्यात आलेली आहेत. त्यामध्ये अमरावती विभागातील ग्रामीण व शहरी भागातील इयत्ता ९ वी ला अध्यापन करणाऱ्या शिक्षकांच्या अध्यापन परिणामकारकतेचे मापन करणे. अमरावती विभागातील ग्रामीण व शहरी भागातील इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेल्या शालेय वातावरणाचा शोध घेणे. अमरावती विभागातील ग्रामीण व शहरी भागातील इयत्ता ९ वी मध्ये अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादन प्रेरणेचे मापन करणे. अमरावती विभागातील शहरी व ग्रामीण भागातील इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांच्या अध्यापन करणाऱ्या शिक्षकांच्या अध्यापन परिणामकारकतेचा अभ्यास करणे. अमरावती विभागातील शहरी व ग्रामीण भागातील इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांना अध्यापन करणाऱ्या अध्यापकांच्या अध्यापन

परिणामकारकता व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादन प्रेरणा यांचा सहसंबंध अभ्यासणे. अमरावती विभागातील इयत्ता ९ वी मधील विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेल्या शालेय वातावरणाचा व त्यांच्या शैक्षणिक संपादन प्रेरणेचा सहसंबंध अभ्यासणे. अमरावती विभागातील शहरी व ग्रामीण भागातील इयत्ता ९ वी मध्ये अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांना अध्यापन करीत असलेल्या शिक्षकांची अध्यापन परिणामकारकता विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादन प्रेरणा व शालेय वातावरण यांच्यातील सहसंबंध अभ्यासणे.

प्रस्तुत संशोधनामध्ये सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे. तसेच न्यादर्शाची निवड करण्यासाठी यादृच्छिक न्यादर्शन प्रविधीचा वापर करण्यात आला. त्यामाध्यमातून ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळामधील इयत्ता ९ वी ला अध्यापन करणारे शिक्षक व इयत्ता ९ वी मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांची या संशोधनासाठी निवड करण्यात आली. सांख्यिकीय विश्लेषणासाठी अनुमानपरक सांख्यिकीय तंत्राचा वापर करण्यात आला आहे.

या संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आले की, शिक्षकांच्या अध्यापन परिणामकारकतेतील घटक दृकश्राव्य साधने, वर्ग व्यवस्थापन यांचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादन प्रेरणेशी सार्थक सहसंबंध आहे. शहरी मुलींच्या शालेय वातावरणातील सर्जनशील उत्तेजना ज्ञानात्मक प्रोत्साहन नकार या घटकांचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादन प्रेरणेशी सार्थक सहसंबंध आहे.

Shrivastava and Pratibha (2009), To study the teaching competency of teacher relationship to their teaching attitude and professional commitment.

All Indian association for educational research, www.aiaer.net/ejournal/vol19107/22.html

यांनी आपल्या संशोधनामध्ये शिक्षकांच्या अध्यापन अभिक्षमतेचा त्यांच्या अध्यापन अभिवृत्ती आणि व्यावसायिक बांधिलकीशी असलेल्या संबंधाचा अभ्यास केला आहे. या संशोधनामध्ये सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला आहे तसेच यादृच्छिक न्यादर्शन प्रविधीच्या माध्यमातुन न्यादर्शाची निवड करण्यात आली आहे. या संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आले की, माध्यमिक स्तरावरील शिक्षकांची अध्यापन अभिक्षमता आणि त्यांची अध्यापन अभिवृत्ती यांच्यामध्ये सकारात्मक सार्थक सहसंबंध आढळून आला. तसेच शिक्षकांची अध्यापन अभिक्षमता आणि शिक्षकांची व्यावसायिक बांधिलकी यांच्यामध्ये सुध्दा उच्च दर्जाचा सहसंबंध आढळून आला. अनुदानित आणि विना-अनुदानित माध्यमिक शाळांमधील शिक्षकांच्या अध्यापन अभिक्षमता, अध्यापन अभिवृत्ती आणि व्यावसायिक

बांधिलकी यांच्यामध्ये सार्थक फरक दिसून आला त्यामध्ये अनुदानित माध्यमिक शाळांमधील शिक्षकांची अभिक्षमता, अध्यापन अभिवृत्ती आणि व्यावसायिक बांधिलकी विना-अनुदानित माध्यमिक विद्यालयातील शिक्षकांच्या तुलनेत अधिक प्रभावी असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

Sood and Anand (2010), To Study the professional Commitment of teacher educatiors serving in secondary training institute of himachal Pradesh.

All Indian association for educational research

http://www.aiaer.net

यांनी आपल्या संशोधनामध्ये शिक्षणशास्त्र पदविका विद्यालयामध्ये कार्यरत असलेल्या शिक्षक प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकीच्या स्तराचा अभ्यास केलेला आहे. त्यासाठी त्यांनी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आणि माहिती संकलीत करण्यासाठी Scale for professional commitment of teacher educator या मापिकेचा वापर केलेला आहे. या संशोधनासाठी त्यांनी १३५ शिक्षक प्रशिक्षकांची निवड केली. त्यासाठी हिमाचल प्रदेशातील २५ शिक्षणशास्त्र महाविद्यालयांची निवड करण्यात आली आहे. या संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आले की, हिमाचल प्रदेश मधील शिक्षक प्रशिक्षकांचे व्यावसायिक बांधिलकीचा स्तर हा सामान्य आहे. तसेच महिला व पुरूष शिक्षक प्रशिक्षक, विवाहित आणि अविवाहित शिक्षक प्रशिक्षक तसेच अध्यापन अनुभवाच्या आधारावर त्यांच्या व्यावसायिक बांधिलकीमध्ये सार्थक फरक दिसून आलेला आहे. तसेच राष्ट्रीय पात्रता चाचणी परीक्षा उत्तीर्ण असलेले आणि अनुत्तीर्ण असलेले शिक्षक प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकीच्या स्तरामध्ये निम्न प्रमाणात सार्थक फरक दिसून आला असल्याचे स्पष्ट केलेले आहे.

Singh (2010), To study the relationship between the adjustment, attitude and job satisfaction among the central school teacher.

International Journal of Science and Research

https://www.ijsr.net/archive/v4i4/SUB153131.pdf

प्रस्तुत संशोधनामध्ये केंद्रीय विद्यालयातील शिक्षकांची शैक्षणिक कारकीर्द, त्यांचे समायोजन, दृष्टिकोन आणि कार्य समाधान यांच्यामधील सहसंबंधाचा अभ्यास करण्यात आला आहे. या संशोधनामध्ये सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला न्यादर्शाची निवड करण्यासाठी यादृच्छिक न्यादर्शन प्रविधीचा वापर करण्यात आला आहे. माहितीचे संकलन करण्यासाठी समायोजन शोधिका, कार्य समाधान मापीका आणि शिक्षक अभिवृत्ती या साधनांचा वापर करण्यात आलेला आहे. या संशोधनाच्या संदर्भात स्पष्ट करण्यात आले की, केंद्रीय विद्यालयातील शिक्षक त्यांच्या कार्याच्या

बाबतीत समाधानी आहेत. केंद्रीय शाळांमधील महिला शिक्षक त्यांच्या कार्याच्या बाबतीत कमी समाधानी आहेत. महिला शिक्षक हे पुरूषांच्या तुलनेत शैक्षणिक कामकाजामध्ये अधिक चांगल्या आढळल्या तर महिला शिक्षकांच्या तुलनेत पुरूष शिक्षक अध्यापनामध्ये अधिक प्रभावी असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. माध्यमिक आणि प्राथमिक शिक्षकांच्या संदर्भात त्यांचे कार्य समाधानाच्या बाबतीत, समायोजनाच्या बाबतीत आणि शालेय नोंदीच्या संदर्भातील कार्याच्या बाबतीत सकारात्मक सहसंबंध आढळून आला.

श्यामकुल महेंद्र, (२०१२). माध्यमिक शाळेतील नियमित शिक्षक व शिक्षण सेवक यांची अध्यापन योग्यता, मानसिक आरोग्य, व्यावसायिक समाधान आणि समायोजन यांचा तुलनात्मक अभ्यास.

पीएच. डी. शिक्षण संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

या संशोधनाची उदिद्ष्टये पुढीलप्रमाणे निर्धारित करण्यात आली आहेत त्यामध्ये नियमित शिक्षक व शिक्षण सेवक यांच्या अध्यापन योग्यतांचा तुलनात्मक अभ्यास करणे. नियमित शिक्षक व शिक्षण सेवक यांच्या मानसिक आरोग्याचा तुलनात्मक अभ्यास करणे. नियमित शिक्षक व शिक्षण सेवक यांच्या व्यावसायिक समाधानाचा तुलनात्मक अभ्यास करणे. नियमित शिक्षक व शिक्षण सेवक यांच्या समायोजनाचा तुलनात्मक अभ्यास करणे. अध्यापन योग्यता, मानसिक आरोग्य, व्यावसायिक समाधान आणि समायोजन यांच्या संदर्भात शिफारशी सुचविणे. ही उद्दिष्टये निश्चित करण्यात आली आहेत.

या संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आले की, नियमित शिक्षक व शिक्षण सेवक यांच्या अध्यापन अभियोग्यतेत सार्थक फरक आढळून आलेला आहे. शिक्षण सेवकांची अध्यापन योग्यता ही नियमित शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेपेक्षा चांगली आहे. नियमित पुरूष शिक्षक व नियमित स्त्री शिक्षिका यांच्या अध्यापन योग्यतेत सार्थक फरक आढळून आलेला नाही. नियमित पुरूष शिक्षक व नियमित स्त्री शिक्षिका यांची अध्यापन योग्यता सारखीच आहे. नियमित पुरूष शिक्षक व पुरूष शिक्षण सेवक यांच्या अध्यापन अभियोग्यतेत फरक आढळून आलेला आहे. पुरूष शिक्षण सेवकांची अध्यापन योग्यता ही नियमित पुरूष शिक्षकांच्या अध्यापन योग्यतेपेक्षा चांगली आहे. नियमित पुरूष शिक्षक व स्त्री शिक्षण सेविकास यांच्या अध्यापन योग्यतेत सार्थक फरक आढळून आलेला आहे. स्त्री शिक्षण सेविकांची अध्यापन योग्यता ही नियमित पुरूष शिक्षकांच्या अध्यापन योग्यतेपेक्षा चांगली आहे.

Samir Kumar Lenka, Ravi Kant (2012), Frustration and Work Motivation of Secondary School Teachers as A Correlate of Leadership Behavior of Their Heads.

Academic Research International, Vol. 2, No. 3,

www.savap.org.pk

प्रस्तुत संशोधनामध्ये माध्यमिक विद्यालयातील शिक्षकांच्या वैफल्य आणि कार्य प्रेरणेचा त्यांच्या विभाग प्रमुखाच्या नेतृत्व व्यवहाराशी असलेल्या संबंधाचा अभ्यास करण्यात आलेला आहे. या संशोधनामध्ये पुढील उद्दिष्टये निश्चित करण्यात आली. त्यामध्ये प्राचार्यांच्या आणि विभाग प्रमुखाच्या नेतृत्व व्यवहाराचा त्यांच्या शिक्षकांच्या वैफल्यावर आणि कार्य प्रेरणेवरील प्रभावाचा अभ्यास करणे. महिला आणि पुरूष प्राचार्यांच्या नेतृत्व वर्तनामध्ये असलेल्या सार्थक फरकाचा अभ्यास करणे. या संशोधनामध्ये वैकल्पिक परिकल्पनांचे निर्धारण करण्यात आले आहे. त्यामध्ये शिक्षकांचे वैफल्य आणि विभाग प्रमुख व प्राचार्याचे नेतृत्व वर्तन व व्यवहार यामध्ये सकारात्मक सार्थक सहसंबंध आहे. तसेच महिला आणि पुरूष प्राचार्य आणि विभाग प्रमुखांच्या नेतृत्व वर्तन व्यवहारामध्ये सार्थक फरक आहे या परिकल्पनांची निश्चिती करण्यात आली आहे.

प्रस्तुत संशोधनामध्ये सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला त्यामध्ये माध्यमिक स्तरावर कार्यरत असलेल्या रामपूर शहरातील एकूण शिक्षकापैकी ८० शिक्षकांची आणि २० प्राचार्याची निवड या संशोधनासाठी करण्यात आली आहे. निवड करण्यात आलेल्या प्राचार्यामध्ये ८ पुरूष प्राचार्य आणि १२ महिला प्राचार्याची निवड या संशोधनासाठी करण्यात आली आहे. या संशोधनामध्ये माहितीचे संकलन करण्यासाठी Mailer १९४९ यांनी विकसित केलेल्या Reaction to Frustration Scale, Agrawal १९८८ यांनी विकसित केलेल्या Work Motivation Questionnaire WQM आणि स्वनिर्मित Leadership Behavior Description Questionnaaire (LBDQ) या साधनांचा वापर माहितीचे संकलन करण्यासाठी करण्यात आला आहे.

या संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आले की, शिक्षकांचे वैफल्य आणि प्राचार्याचे नेतृत्व वर्तन व व्यवहार यांच्यामध्ये उच्च ऋणात्मक सार्थक सहसंबंध आढळून आला. म्हणजे शिक्षकांच्या वैफल्यामध्ये होणाऱ्या बदलाच्या धनात्मक प्रमाणात प्राचार्यांच्या नेतृत्व वर्तन व्यवहारामध्ये सार्थक बदल घडून येत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. माध्यमिक शाळांमधील शिक्षकांची कार्य प्रेरणा आणि प्राचार्यांचे नेतृत्व वर्तन आणि व्यवहार यांच्यामध्ये उच्च सार्थक सहसंबंध आढळून आला. त्यामध्ये शिक्षकांच्या कार्य प्रेरणेमध्ये होणाऱ्या बदलाच्या धनात्मक प्रमाणात त्यांच्या प्राचार्यांच्या नेतृत्व वर्तन व्यवहारामध्ये

सार्थक परिवर्तने घडून येतात. माध्यमिक शाळांमधील महिला आणि पुरूष प्राचार्यांच्या नेतृत्व वर्तन व्यवहारामध्ये सार्थक फरक आढळून आला. यामध्ये पुरूष प्राचार्यांचा नेतृत्व वर्तन व्यवहार हा महिला प्राचार्यांच्या नेतृत्व वर्तन व्यवहाराच्या तुलनेत अधिक चांगला असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

Goyal Anju (2012), A Study of Adjustment Level Among Primary School Teacher in Jhajjar District.

International Journal of Transormations in Business Management (IJTBM) 2012, Vol. No. I, Issue no. VI

http://www.ijtbm.com

यांनी आपल्या संशोधनाच्या संदर्भात पुढील उद्दिष्टये निश्चित केलेली आहेत. त्यामध्ये माध्यमिक स्तरावरील महिला आणि पुरूष शिक्षकांच्या समायोजनाचा अभ्यास करणे. ग्रामीण आणि शहरी माध्यमिक शाळांमधील शिक्षकांच्या समायोजनाचा अभ्यास करणे या उद्दिष्टांच्या आधारावर संशोधन कार्य केले आहे या संशोधनामध्ये वर्णनात्मक सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला या संशोधनासाठी १०० शिक्षकांची यादृच्छिक न्यादर्शन प्रविधीच्या सहाय्याने निवड करण्यात आली. त्यामध्ये ग्रामीण भागातील ५० शिक्षक, त्यामध्ये २५ महिला व २५ पुरूष शिक्षकांचा समावेश आहे तसेच शहरी भागातील ५० शिक्षकांची निवड करण्यात आली, त्यामध्ये २५ महिला व २५ पुरूष शिक्षकांची निवड करण्यात आली आहे. शिक्षकांच्या समायोजनाच्या संदर्भात आवश्यक माहितीचे संकलन करण्यासाठी मंगल एस. के. यांनी विकसित व प्रमाणित केलेल्या एम. टी. ए. आय. या चाचणीचा वापर करण्यात आला. या संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आले की, महिला आणि पुरूष शिक्षकांच्या समायोजनामध्ये सार्थक फरक आहे. तसेच ग्रामीण आणि शहरी शाळांमधील शिक्षकांच्या समायोजनामध्ये सार्थक फरक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

Lal Kumar A. C., Muthumanicakam R. (2013), [12] Investigating the Frustration of D.T.Ed., Teacher Trainees.

Gra - Global Research Analysis

Volume : 2 | Issue : 2 | Feb 2013 •

प्रस्तुत संशोधनामध्ये शिक्षणशास्त्र पदविका विद्यालयामधील प्रशिक्षणार्थ्यांच्या वैफल्याचे निर्धारण करण्यात आलेले आहे. या संशोधनाच्या संदर्भात पुढील उद्दिष्टये निर्धारित करण्यात आलेली आहेत. त्यामध्ये शिक्षणशास्त्र पदविका अभ्यासक्रमामध्ये शिकत असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांच्या वैफल्यांच्या स्तराचा अभ्यास करणे. शिक्षणशास्त्र पदविका अभ्यासक्रमामध्ये शिकत असलेल्या

प्रशिक्षणार्थ्यांमध्ये महिला आणि पुरूष प्रशिक्षणार्थी, प्रवेशित संवर्ग कला शाखा आणि विज्ञान शाखेतून प्रवेशित शिक्षणार्थी, पालकांचा शैक्षणिक स्तर यामध्ये निरक्षर आणि शालेय शिक्षण, निरक्षर आणि महाविद्यालयीन शिक्षण, शालेय शिक्षण आणि महाविद्यालयीन शिक्षण यांच्या संदर्भात प्रशिक्षणार्थ्यांमधील वैफल्याचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

या संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. न्यादर्शाची निवड करण्यासाठी यादृच्छिक न्यादर्शन प्रविधीचा वापर करण्यात आला संशोधनासाठी एकूण ४०० प्रशिक्षणार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये १२९ पुरूष प्रशिक्षणार्थी आणि २७१ महिला प्रशिक्षणार्थ्यांचा समावेश आहे. माहितीचे संकलन करण्यासाठी Muthayya यांनी विकसित व प्रमाणित केलेली Verbal Frustration Test (VFT) चा वापर करण्यात आलेला आहे.

या संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आले की, सर्वेक्षित प्रशिक्षणार्थ्यांपैकी सर्वाधिक प्रशिक्षणार्थ्यांमध्ये सामान्य प्रमाणात वैफल्य आहे. तर सर्वात कमी प्रशिक्षणार्थ्यांमध्ये उच्च प्रमाणात वैफल्य असल्याचे स्पष्ट करण्यात आलेले आहे. शिक्षणशास्त्र पदविका अभ्यासक्रमामध्ये प्रवेशित महिला व पुरूष प्रशिक्षणार्थ्यांच्या वैफल्यांचे प्रमाण सामान्य आहे. कला आणि विज्ञान शाखेतून प्रवेशित प्रशिक्षणार्थ्यांमध्ये वैफल्याचे प्रमाण सामान्य आहे. शिक्षणशास्त्र पदविका अभ्यासक्रमामध्ये प्रवेशित प्रशिक्षणार्थ्यांच्या पालकांच्या शैक्षणिक स्तराच्या संदर्भात निरक्षर, शालेय शिक्षण आणि महाविद्यालयीन शिक्षण यासंदर्भात प्रशिक्षणार्थ्यांमध्ये वैफल्याचे प्रमाण सामान्य आहे. शिक्षणशास्त्र पदविका अभ्यासक्रमामध्ये प्रवेशित महिला आणि पुरूष प्रशिक्षणार्थ्यांच्या वैफल्यामध्ये सार्थक फरक आहे त्यामध्ये महिला प्रशिक्षणार्थ्यांमध्ये वैफल्याचे प्रमाण प्रभावी असल्याचे स्पष्ट करण्यात आले. कला आणि विज्ञान शाखेतून प्रवेशित प्रशिक्षणार्थ्यांच्या वैफल्यामध्ये सार्थक फरक आढळून आला नाही. प्रशिक्षणार्थ्यांच्या पालकांच्या शिक्षणाच्या संदर्भात निरक्षर पालक आणि शालेय शिक्षण घेतलेले पालक यांच्या प्रशिक्षणार्थी पाल्यांच्या वैफल्यामध्ये सार्थक फरक आढळून आला. तर महाविद्यालयीन शिक्षण घेतलेले आणि शालेय शिक्षण व महाविद्यालयीन शिक्षण घेतलेल्या पालकांच्या प्रशिक्षणार्थी पाल्यांच्या वैफल्यामध्ये सार्थक फरक आढळून आला नाही.

Borkar Usha A. (2013), A Study of Teacher Effectiveness of Secondary School Teachers in Relation to Teacher Stress.

International Journal of Humanities and Social Science Invention.

Volume II, Issue XII www.ijhssi.org

प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भात पुढील उद्दिष्टये निश्चित करण्यात आली त्यामध्ये शिक्षकांच्या तणावाच्या संदर्भात प्रश्नावली विकसित करणे. उच्च अध्यापन प्रभावशीलता असलेले आणि निम्न अध्यापन प्रभावशीलता असलेल्या शिक्षकांचे निर्धारण करणे. उच्च व निम्न अध्यापन प्रभावशीलता असलेल्या शिक्षकांमधील ताण-तणावाचा अभ्यास करणे. महिला आणि पुरूष शिक्षकांच्या तणावाच्या स्तराचा अभ्यास करणे. शिक्षकांची अध्यापन परिणामकारकता आणि त्यांच्यामधील ताण-तणावामधील सहसंबंधाचा अभ्यास करणे. या संशोधनासाठी वर्णनात्मक सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला या संशोधनासाठी बहुआयामी नमुना निवड पध्दतीचा अवलंब करून १००० शिक्षकांची निवड करण्यात आली आहे. शिक्षक प्रभावशिलतेशी संबंधित माहितीचे संकलन करण्यासाठी प्रमोद कुमार यांनी विकसित व प्रमाणित केलेल्या Teacher Effectiveness Scale चा वापर करण्यात आला. तसेच शिक्षकामधील ताण-तणावाचा अभ्यास करण्यासाठी स्वनिर्मीत चाचणी विकसित करण्यात आली. या संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आले की, उच्च शिक्षक प्रभावशीलता आणि निम्न शिक्षक प्रभावशीलता असलेल्या शिक्षकांच्या ताण-तणावामध्ये सार्थक फरक आढळून आला त्यामध्ये उच्च शिक्षक प्रभावशीलता असलेल्या शिक्षकामध्ये निम्न ताण-तणाव आणि निम्न शिक्षक प्रभावशीलता असलेल्या शिक्षकांमध्ये उच्च ताण-तणाव आढळून आला. तसेच उच्च अध्यापन परिणामकारकता असलेल्या आणि निम्न अध्यापन परिणामकारकता असलेल्या शिक्षकांचा त्यांच्या ताण-तणावाशी ऋणात्मक सहसंबंध आढळून आला असल्याचे स्पष्ट करण्यात आले. म्हणजे शिक्षकांच्या अध्यापन परिणामकारकतेमध्ये होणाऱ्या बदलाच्या ऋणात्मक प्रमाणात त्यांच्या ताण-तणावामध्ये सार्थक बदल घडून येतात.

Hunnur Rashmi Ram, Vyas Brijmohan, Sudarshan S., Mathad Jyoti, Pareek Piyush (2013), A Study on Job Stress for school Teachers.

IOSR Journal of Busness and Management Volume VII, Issue IV

www.iosrjournals .org

या संशोधनामध्ये शाळा स्तरावरील शिक्षकांच्या ताण-तणावाचा अभ्यास करण्यात आलेला आहे. या संशोधनामध्ये वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. तसेच प्राथमिक

स्तरावरील आणि माध्यमिक स्तरावरील एकूण १०० शिक्षकांची निवड या संशोधनासाठी करण्यात आली. माहितीचे संकलन करण्यासाठी स्व-निर्मीत प्रश्नावलीची निर्मिती करून तिचा वापर करण्यात आला आहे. या संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आले की, सर्वाधिक शिक्षक आपल्यामध्ये शालेय स्तरावर ताण-तणाव असल्याचे मत व्यक्त करतात. या ताण-तणावामध्ये शालेय स्तरावरील पाठयसहगामी क्रियांमुळे सर्वाधिक ताण-तणाव निर्माण होतो. शाळा स्तरावर निर्माण झालेल्या या तणावामुळे त्यांच्या कार्यामध्ये अडथळे निर्माण होतात परंतु ते आपल्या व्यक्तिमत्त्वावर त्याचा विपरीत प्रभाव पडू देत नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. सर्वाधिक शिक्षकांच्या मते ते पाठय सहगामी क्रियांमध्ये आधुनिकीकरण आणण्यासाठी त्यांना पुरेसा वेळ मिळत नाही. त्यामुळे त्यांच्या कामामध्ये तणाव निर्माण होतो. याशिवाय प्राचार्याचे वर्तन, शालेय स्तरावरील कामाचा अतिव्याप, पाठय सहगामी क्रियामधील नाविण्यतेसाठी मिळणारा कमी वेळ, केलेल्या कार्यासाठी कधीही न मिळणारे प्रोत्साहन आणि शिक्षकांचे ताणलेले आंतरवैयक्तिक संबंध यामुळे शिक्षकांमध्ये ताण-तणाव निर्माण होत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

Nadeem N.A., Bhat Gawher Ahmed (2014), A Study of Adjustment Level among Secondary School Teachers in Kashmir.

Journal of Education and Practice
Vol.5, No.10, 2014 www.iiste.org

प्रस्तुत संशोधनामध्ये पुढील उद्दिष्टये निश्चित करण्यात आली. त्यामध्ये माध्यमिक स्तरावरील महिला आणि पुरूष शिक्षकांच्या समायोजनाची तुलना करणे. माध्यमिक स्तरावरील ग्रामीण व शहरी शाळामधील शिक्षकांच्या समायोजनाची तुलना करणे या उद्दिष्टांवर हे संशोधन कार्य करण्यात आले आहे. या संशोधनासाठी वर्णनात्मक सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला. त्यामध्ये २०० शिक्षकांची यादृच्छिक न्यादर्शन प्रविधीच्या सहाय्याने निवड करण्यात आली. संशोधनाच्या संदर्भात शिक्षक समायोजनाची माहिती संकलीत करण्यासाठी बेल यानी विकसित व प्रमाणित केलेल्या समायोजन शोधिकेचा वापर करण्यात आला आहे. या संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आले की, माध्यमिक स्तरावरील महिला व पुरूष शिक्षकांच्या कौटुंबिक समायोजनामध्ये आणि व्यावसायिक समायोजनामध्ये सार्थक फरक आढळून आला नाही, तर माध्यमिक स्तरावरील महिला व पुरूष शिक्षकांचे आरोग्य समायोजन, सामाजिक समायोजन, भावनिक समायोजन यांच्यामध्ये सार्थक फरक आढळून येत असल्याचे स्पष्ट केलेले आहे. तसेच माध्यमिक स्तरावरील ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळामधील शिक्षकांचे कौटुंबिक समायोजन व व्यावसायिक समायोजनामध्ये सार्थक फरक आढळून आला नाही,

तर त्याचे आरोग्य समायोजन, सामाजिक समायोजन, भावनिक समायोजन यांच्यामध्ये सार्थक फरक आढळून येत असल्याचे स्पष्ट केले आहे.

Janefer M Ophelia (2014), A Study on stress among school teachers in selected schools in Chennai.

IOSR Journal of Humanities and Social Science
www.iosrjournals.org

या संशोधनामध्ये पुढील उद्दिष्टये निश्चित करण्यात आली त्यामध्ये शिक्षकांमध्ये ताण-तणाव निर्माण होण्याच्या कारणांचा शोध घेणे. कार्याच्या संदर्भात निर्माण होणाऱ्या ताण-तणावाला कारणीभूत घटकांचा अभ्यास करणे आणि या ताण-तणावाचे नियोजन कसे करावे याचा शोध घेणे. या उद्दिष्टांचे निर्धारण या संशोधनाच्या संदर्भात करण्यात आले आहे. या संशोधनासाठी २०० शिक्षकांची निवड करण्यात आली आहे. तसेच माहितीचे संकलन करण्यासाठी Jeffrey यांनी विकसित व प्रमाणित केलेल्या Stress and Coping Behaviours among primary school Teachers या प्रश्नावलीचा वापर करण्यात आला. या संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आले की, महिला शिक्षकांना प्राप्त होणारे निम्न प्रमाणातील वेतन त्यांच्यामध्ये ताण-तणाव निर्माण करत नाही, तर शाळेच्या वेळे व्यतिरिक्त कराव्या लागणाऱ्या कामामुळे त्यांना मोठया प्रमाणात ताण-तणावाला सामोरे जावे लागते. शाळेच्या वेळेमध्ये विद्यार्थ्यांना सांभाळताना त्यांना ताण-तणाव येत नाही, तर त्यांच्या पारिवारिक कारणांचा त्याच्यावर ताण-तणाव येतो. प्रशासकीय कार्याचा शिक्षकांवर सर्वाधिक ताण-तणाव असल्याचे स्पष्ट करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या अनुचित वर्तनामुळे शिक्षकांचा ताण-तणाव वाढत असल्याचे दिसून आले. शिक्षक आपल्या सहकार्याच्या, मित्राच्या आणि कुटुंबाच्या माध्यमातून शालेय स्तरावरील ताण-तणाव कमी करत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

Pachaiyappan P. Raj D. Usshalaya, (2014). Evaluating the teacher Effectiveness of secondary and Higher Secondary school Teachers.

IOSR Journal of Research & Method in Education
Volume IV Issue I 2014. www.iosrjournals.org

प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भात पुढील उद्दिष्टये निश्चित करण्यात आलेली आहेत. त्यामध्ये माध्यमिक स्तरावरील महिला आणि पुरूष शिक्षकांच्या, ग्रामीण व शहरी शिक्षकांच्या शिक्षक प्रभावशीलतेचा अभ्यास करणे. कला आणि विज्ञान उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षकांच्या शिक्षक प्रभावशीलतेचा अभ्यास करणे. शिक्षकांच्या अध्यापन अनुभवाचा त्यांच्या अध्यापन प्रभावशीलतेवरील प्रभावाचा अभ्यास करणे. या उद्दिष्टावर हे संशोधन कार्य आधारित आहे. या

संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला. तसेच शिक्षक प्रभावशीलतेशी संबंधित माहितीचे संकलन करण्यासाठी Imme Kulsum यांनी विकसित व प्रमाणित केलेल्या Teacher Effectiveness scale चा वापर करण्यात आला आहे. या संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आले की, महिला आणि पुरूष शिक्षकांच्या अध्यापन प्रभावशीलतेमध्ये सार्थक फरक नाही, तर ग्रामीण आणि शहरी शिक्षकांच्या शिक्षक प्रभावशीलतेमध्ये सार्थक फरक आहे त्यामध्ये शहरी शिक्षकांची शिक्षक प्रभावशीलता अधिक आहे. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या शिक्षक प्रभावशीलतेमध्ये सार्थक फरक आहे त्यामध्ये उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षकांची शिक्षक प्रभावशीलता अधिक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. कला आणि विज्ञान शाखेमध्ये अध्यापन करणाऱ्या शिक्षकांच्या अध्यापन प्रभावशीलतेमध्ये सार्थक फरक आढळून आला त्यामध्ये विज्ञान शाखेतील शिक्षकांची शिक्षक प्रभावशीलता प्रभावी आढळून आली. शिक्षकांच्या अध्यापन अनुभवाचा त्यांच्या अध्यापन प्रभावशीलतेवर सार्थक प्रभाव पडत असल्याचे स्पष्ट करण्यात आले. शाळा व्यवस्थापन प्रकारचा शिक्षकांच्या अध्यापन प्रभावशीलतेवर सार्थक प्रभाव पडत असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

Pasricha Arti (2014), A Comparative Study of Frustration Among Adolescents Boys And Girls In Relation To Their Certain Cognitive Attributes.

International Research Journal of Management Sociology & Humanity
IRJMSH Volume 5 Issue 2 online http:www.irjmsh.com

प्रस्तुत संशोधनामध्ये कौमार्यावस्थेतील मुले आणि मुलींच्या वैफल्याचा त्यांच्या संज्ञानात्मक गुणांशी असलेल्या संबंधाचा अभ्यास करण्यात आला आहे. या संशोधनाच्या बाबतीत पुढील उद्दिष्टये निश्चित करण्यात आली. त्यामध्ये कौमार्यावस्थेतील मुले आणि मुलींच्या वैफल्याच्या स्तराचा अभ्यास करणे. कौमार्यावस्थेतील मुलाच्या उच्च आणि निम्न वैफल्य स्तराच्या संदर्भात त्यांच्या शैक्षणिक संपादणुकीचा अभ्यास करणे. कौमार्यावस्थेतील मुले आणि मुलींच्या उच्च आणि निम्न वैफल्य स्तराच्या संदर्भात त्यांच्या शैक्षणिक संपादणुकीचा अभ्यास करणे. कौमार्यावस्थेतील मुले आणि मुलींच्या उच्च आणि निम्न वैफल्य स्तराच्या संदर्भात त्यांच्या शैक्षणिक संपादणुकीची तुलना करणे. कौमार्यावस्थेतील मुलांच्या उच्च आणि निम्न वैफल्य स्तराच्या संदर्भात त्यांच्या बुध्दिमत्तेचा अभ्यास करणे. कौमार्यावस्थेतील मुले आणि मुलींच्या उच्च आणि निम्न वैफल्य स्तराच्या संदर्भात त्यांच्या बुध्दिमत्तेचा अभ्यास करणे ही उद्दिष्टये या संशोधनाच्या संदर्भात निर्धारित करण्यात आली आहेत.

प्रस्तुत संशोधनासाठी २०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे त्यामध्ये १०० मुले आणि १०० मुलींचा समावेश आहे. माहितीचे संकलन करण्यासाठी Chougan N. C. and Tiwari Govind यांनी विकसित व प्रमाणित केलेल्या Frustration Test चा वापर करण्यात आला आहे. तसेच Jalota S यांनी विकसित व प्रमाणित केलेल्या General Mental Ability Test चा वापर करण्यात आला आहे आणि शैक्षणिक संपादणुकीच्या बाबतीत माहिती प्राप्त करण्यासाठी त्यांच्या वार्षिक परीक्षेमधील गुण संकलीत करण्यात आले आहेत.

या संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आले की, कौमार्यावस्थेतील मुले आणि मुलींच्या वैफल्यामध्ये सार्थक फरक नाही. त्यांचे वैफल्याचे प्रमाण जवळपास सारखे आहे. कौमार्यावस्थेतील उच्च व निम्न वैफल्य स्तरामधील मुलांच्या शैक्षणिक संपादणुकीमध्ये सार्थक फरक आढळून आला. त्यामध्ये निम्न वैफल्य स्तरामधील मुलांची शैक्षणिक संपादणुक अधिक प्रभावी आढळून आली. उच्च आणि निम्न वैफल्य स्तरामधील मुलींच्या शैक्षणिक संपादणुकीमध्ये सार्थक फरक आढळून आला यामध्ये निम्न वैफल्य स्तरामधील मुलींची शैक्षणिक संपादणुक ही उच्च वैफल्य स्तरामधील विद्यार्थीनींच्या शैक्षणिक संपादणुकीच्या तुलनेत अधिक प्रभावी आढळून आली असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

Ramesh (2015), Teaching Aptitude and Adjustment of Secondary School Teachers.

International Journal of Science and Research (IJSR) (2015)

प्रस्तुत संशोधनामध्ये माध्यमिक शाळांमधील शिक्षकांची अध्यापन अभियोग्यता आणि समायोजनाचा अभ्यास करण्यात आलेला आहे. या संशोधनाच्या संदर्भात पुढील उद्दिष्टये निश्चित करण्यात आली, त्यामध्ये शासकीय आणि खाजगी माध्यमिक शाळांमधील शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेचा अभ्यास करणे. खाजगी आणि शासकीय माध्यमिक शाळामधील शिक्षकांच्या समायोजनाचा अभ्यास करणे. शासकीय आणि खाजगी माध्यमिक शाळांमधील शिक्षकांची आणि सर्वेक्षित शिक्षकांची अध्यापन अभियोग्यता आणि समायोजनामधील सहसंबंधाचा अभ्यास करणे. या संशोधनाच्या संदर्भात शून्य परिकल्पना निश्चित करण्यात आल्या आहेत.

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला संशोधनाच्या संदर्भात आवश्यक माहितीचे संकलन करण्यासाठी Singh R. P and Sharma यांनी विकसित व प्रमाणित केलेल्या Teaching Aptitude Test Baattery आणि Mangal S. K. यांनी

विकसित व प्रमाणित केलेल्या Teacher Adjustment Inventory चा वापर करण्यात आला आहे. सांख्यिकीय विश्लेषण करण्यासाठी मध्यमान, प्रमाण विचलन, टी परीक्षण आणि सहसंबंध गुणांक या सांख्यिकीय प्रविधींचा वापर करण्यात आला आहे.

या संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आले की, खाजगी आणि शासकीय माध्यमिक शाळांमधील शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेमध्ये सार्थक फरक आढळून आला. त्यामध्ये खाजगी माध्यमिक शाळांमधील शिक्षकांची अध्यापन अभियोगयता ही शासकीय माध्यमिक शाळांमधील शिक्षकांच्या तुलनेत अधिक प्रभावी आढळून आली. खाजगी आणि शासकीय माध्यमिक शाळांमधील शिक्षकांच्या शिक्षकीय समायोजनामध्ये सार्थक फरक आढळून आला नाही. म्हणजे शासकीय व खाजगी माध्यमिक शाळांमधील शिक्षकांचे शिक्षकीय समायोजन जवळपास सारखे असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. खाजगी माध्यमिक शाळामधील शिक्षकांची शिक्षकीय अभियोग्यता आणि समायोजन यामध्ये सार्थक सहसंबंध आढळून आला नाही. शासकीय माध्यमिक शाळांमधील शिक्षकांची शिक्षकीय अभियोग्यता आणि समायोजन यामध्ये सार्थक सहसंबंध आढळून आला नाही. सर्वेक्षित शिक्षकांची अध्यापन अभियोग्यता आणि समायोजन यांच्यामध्ये सार्थक सहसंबंध आढळून आला नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

Muraleedharan.T. (2015), Stress in Relation to Teaching Aptitude of Student Teachers in Colleges of Education.

International Journal of Advanced Research in Education Technology (IJARET) Vol. 2, Issue 3 (July - Sept. 2015)

प्रस्तुत संशोधनामध्ये शिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांच्या तणावाचा त्यांच्या अध्यापन अभियोग्यतेशी असलेल्या संबंधाचा अभ्यास करण्यात आलेला आहे. या संशोधनाच्या संदर्भात पुढील उद्दिष्टये निर्धारित करण्यात आलेली आहेत. त्यामध्ये शिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांचा तणाव वाढविण्याच्या आणि ताण वाढीच्या स्तराचा अभ्यास करणे. लिंग, शिक्षण महाविद्यालयाचे क्षेत्र, वैवाहिक स्थिती आणि व्यवस्थापन प्रकाराचा शिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांच्या तणावावरील प्रभावाचा अभ्यास करणे. शिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांचा तणाव आणि अध्यापन अभियोग्यता यांच्यातील संबंधाच्या स्वरूपाचा अभ्यास करणे. या उद्दिष्टावर संशोधन आधारित आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. या संशोधनामध्ये एकूण ५५० शिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांचा समावेश करण्यात आला. त्यामध्ये १६४ पुरूष प्रशिक्षणार्थी व ३८६ महिला प्रशिक्षणार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. माहितीचे संकलन

करण्यासाठी शिक्षक प्रशिक्षणाच्या तणावाचे मापन करण्यासाठी स्वनिर्मित तणाव शोधिकेची निर्मिती करण्यात आली आहे. विश्लेषण करण्यासाठी मध्यमान, प्रमाण विचलन, यांचा वापर केला आहे.

या संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आले की, सर्वेक्षित महिला व पुरूष प्रशिक्षणार्थ्यांपैकी सर्वाधिक प्रशिक्षणार्थी हे उच्च तणाव स्तरामध्ये आहेत तर सर्वात कमी प्रशिक्षणार्थी निम्न तणाव स्तरामध्ये आहेत. शासकीय शिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांपैकी सर्वाधिक प्रशिक्षणार्थी सामान्य तणाव स्तरामध्ये आहेत तर सर्वात कमी प्रशिक्षणार्थी निम्न तणाव स्तरामध्ये आहेत. खाजगी विना-अनुदानित महाविद्यालयातील सर्वाधिक प्रशिक्षणार्थी हे उच्च तणाव स्तरामध्ये तर सर्वात कमी प्रशिक्षणार्थी हे निम्न तणाव स्तरामध्ये आहेत. ग्रामीण व शहरी भागातील शिक्षण महाविद्यालयातील सर्वाधिक प्रशिक्षणार्थी हे उच्च तणाव स्तरामध्ये आहेत तर सर्वात कमी प्रशिक्षणार्थी हे निम्न तणाव स्तरामध्ये असल्याचे स्पष्ट करण्यात आले. शिक्षण महाविद्यालयातील महिला आणि पुरूष प्रशिक्षणार्थ्यांच्या तणावाच्या स्तरामध्ये सार्थक फरक आढळून आला त्यामध्ये पुरूष प्रशिक्षणार्थ्यांमध्ये तणावाचे प्रमाण सर्वाधिक आहे. शासकीय आणि खाजगी विना-अनुदानित शिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांच्या तणावामध्ये सार्थक फरक आहे त्यामध्ये खाजगी विना-अनुदानित शिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणामध्ये तणावाचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. ग्रामीण आणि शहरी शिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांच्या तणावामध्ये सार्थक फरक आढळून आला नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. महिला आणि पुरूष प्रशिक्षणार्थ्यांमधील तणाव आणि त्यांची अध्यापन अभियोग्यता यांच्यामध्ये सामान्य सहसंबंध आढळून आला. शासकीय आणि खाजगी विना-अनुदानित शिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांचा तणाव आणि अध्यापन अभियोग्यता यामध्ये सामान्य सहसंबंध आढळून आला. तसेच ग्रामीण व शहरी शिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांचा तणाव आणि अध्यापन अभियोग्यता यांच्यामध्ये उच्च सहसंबंध असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच सर्वेक्षित शिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांमधील तणाव आणि अध्यापन अभियोग्यता यामध्ये सामान्य सहसंबंध असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

Goutami S. (2015), Modes of frustration causing burnout among Government & Non-government School Teachers.
International Journal of Education and Psychological Research (IJEPR) Volume 4, Issue 1, March 2015

प्रस्तुत संशोधनामध्ये शासकीय व खाजगी शाळांमधील शिक्षकांमध्ये असलेल्या वैफल्यांच्या कारणांचा अभ्यास करण्यात आला आहे. त्यामध्ये शासकीय आणि खाजगी शाळांमधील शिक्षकांच्या

आक्रमतेचा तुलनात्मक अभ्यास करणे. शासकीय आणि खाजगी शाळांमधील शिक्षकांच्या राजीनामा स्तरामधील सार्थक फरकाचा अभ्यास करणे. शासकीय आणि खाजगी शाळांमधील शिक्षकांमध्ये फिक्सेशन स्तरामधील सार्थक फरकाचा अभ्यास करणे. शासकीय आणि खाजगी शाळांमधील शिक्षकांच्या प्रतिपगमन स्तरामधील सार्थक फरकाचा अभ्यास करणे. शासकीय आणि खाजगी शाळांमधील शिक्षकांच्या नैराश्य स्तरामधील सार्थक फरकाचा अभ्यास करणे. ही उद्दिष्टये या संशोधनाच्या संदर्भात निश्चित करण्यात आली आहेत.

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. संशोधनासाठी न्यादर्श स्वरूपात ६० शिक्षकांची यादृच्छिक न्यादर्शन प्रविधीच्या सहाय्याने निवड करण्यात आली आहे त्यामध्ये ३० शिक्षक शासकीय शाळांमधील असून ३० शिक्षक खाजगी शाळांमधील आहेत. या संशोधनाच्या संदर्भात आवश्यक माहितीचे संकलन करण्यासाठी Chauhan and Tiwari १९७२ यांनी विकसित व प्रमाणित केलेली Frustration Test चा वापर करण्यात आला आहे.

या संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आले की, शासकीय आणि खाजगी शाळांमधील शिक्षकांच्या वैफल्यामध्ये सार्थक फरक आहे. यामध्ये खाजगी शाळांमधील शिक्षकांमध्ये वैफल्याचे प्रमाण हे शासकीय शाळांमधील शिक्षकांच्या तुलनेत अधिक आहे. तसेच आक्रमकता आणि प्रतिपगमनाच्या संदर्भात शासकीय आणि खाजगी शाळांमधील शिक्षकांच्या वैफल्यामध्ये सार्थक फरक आढळून आला. त्यामध्ये खाजगी शाळांमधील शिक्षकांचे वैफल्य जास्त असल्याचे आढळून आले.

Rekha Rani & Deswal Y.S. (2015), **Relationship Of Frustration And Academic Achievement of Adolescents of Government And Non-Government Senior Secondary Schools.**

Bhartiyam International Journal of Education & Research
A Quarterly Peer Reviewed International Journal of Research & Education
Volume 4, Issue 2, March 2015, Issn:2277-1255

प्रस्तुत संशोधनामध्ये शासकीय आणि अशासकीय उच्च माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांचे वैफल्य आणि त्यांची शैक्षणिक संपादणुकीमधील सहसंबंधाचा अभ्यास करण्यात आला आहे. या संशोधनाची उद्दिष्टये पुढीलप्रमाणे निर्धारित करण्यात आली आहेत. त्यामध्ये शासकीय आणि खाजगी उच्च माध्यमिक विद्यालयातील मुलांचे वैफल्य आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यामधील सहसंबंधाचा अभ्यास करणे. शासकीय आणि खाजगी उच्च माध्यमिक विद्यालयामधील मुलींचे वैफल्य आणि त्यांच्या शैक्षणिक संपादणुकीमध्ये असलेल्या सहसंबंधाचा अभ्यास करणे. शासकीय आणि खाजगी

उच्च माध्यमिक विद्यालयामधील मुलांचे वैफल्य आणि शैक्षणिक संपादणुकीमधील सहसंबंधाचा अभ्यास करणे. ही उद्दिष्टये प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भात निर्धारित करण्यात आली आहेत.

या संशोधनासाठी वर्णनात्मक सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये शिकत असलेल्या एकूण २०० विद्यार्थ्यांची निवड न्यादर्श स्वरूपात करण्यात आली आहे. संशोधन विषयाशी संबंधित माहितीचे संकलन करण्यासाठी Dixit B. M. and Srivastava D. N. यांनी विकसित व प्रमाणित केलेल्या Reaction to frustration Scale चा वापर करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणूकीच्या बाबतीत माहिती संकलीत करण्यासाठी त्यांच्या वार्षिक परिक्षेतील गुणांचे संकलन करण्यात आलेले आहे.

या संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आले की, उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचे वैफल्य आणि त्यांची शैक्षणिक संपादणूक यांच्यामध्ये ऋणात्मक उच्च सार्थक सहसंबंध आहे. म्हणजे विद्यार्थ्यांच्या वैफल्यामध्ये होणाऱ्या बदलाच्या ऋणात्मक प्रमाणात त्यांच्या शैक्षणिक संपादणुकीमध्ये सार्थक बदल घडून येतात. माध्यमिक स्तरावरील शासकीय आणि अशासकीय विद्यालयातील विद्यार्थीनींचे आणि विद्यार्थ्यांचे वैफल्य आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यामध्ये ऋणात्मक सार्थक सहसंबंध आहे.

Kumar Ajay, (2015), Attitude Towards Teaching Profession in Relation to Adjustment among senior Secondary School Teachers.

International Journal of Science and Research (IJSR)

Volume IV Issue IV April 2015, wwwijsr.net

यांनी आपल्या संशोधनाच्या संदर्भात पुढील उद्दिष्टये निश्चित केली आहेत त्यामध्ये माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचा अध्यापन विषयक दृष्टिकोनाचा त्यांच्या समायोजनाशी असलेल्या संबंधाचा अभ्यास करणे. माध्यमिक स्तरावरील महिला आणि पुरूष शिक्षकांच्या अध्यापन विषयक दृष्टिकोनाचा आणि समायोजनाचा अभ्यास करणे. ग्रामीण आणि शहरी माध्यमिक शाळामधील शिक्षकांच्या अध्यापन विषयक दृष्टिकोनाचा आणि समायोजनाचा अभ्यास करणे. या उद्दिष्टांचे निर्धारण या संशोधनामध्ये करण्यात आले आहे. या संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला त्यामध्ये २०० माध्यमिक शिक्षकांची निवड करण्यात आली आहे. शिक्षकांच्या दृष्टिकोनाशी संबंधित माहितीचे संकलन करण्यासाठी अहुवालीया यांनी विकसित व प्रमाणित केलेल्या Teacher Attitude Inventory चा वापर करण्यात आला आहे. तसे शिक्षक समायोजनाच्या संदर्भात माहिती

संकलित करण्यासाठी ओझा यांनी विकसित व प्रमाणित केलेल्या Teacher Adjustment Inventory चा वापर करण्यात आला आहे. या संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आले की, माध्यमिक स्तरावरील पुरूष शिक्षकांचा, महिला शिक्षकांचा, शहरी शिक्षकांचा आणि ग्रामीण शिक्षकांचा अध्यापन विषयक दृष्टिकोन आणि समायोजन यांच्यामध्ये उच्च धनात्मक सार्थक सहसंबंध आहे म्हणजे शिक्षकांच्या अध्यापन विषयक दृष्टिकोनामध्ये होणाऱ्या बदलाच्या धनात्मक प्रमाणात त्यांच्या शिक्षकीय समायोजनामध्ये सार्थक बदल घडून येत असल्याचे दिसून आले.

Patil Muddanagouda (2016), Aggression and Frustration among Rural and Urban Secondary School Students.

The International Journal of Indian Psychology
Volume 3, Issue 4, No. 60, http://www.ijip.in | July-September, 2016

प्रस्तुत संशोधनामध्ये माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची आक्रमकता आणि वैफल्याच्या स्तराचा अभ्यास या संशोधनामध्ये करण्यात आलेला आहे. या संशोधनामध्ये वैकल्पिक परिकल्पनांची रचना करण्यात आली त्यामध्ये ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या आक्रमकतेमध्ये आणि वैफल्यामध्ये सार्थक फरक आढळून येतो अशी परिकल्पना करण्यात आलेली आहे.

या संशोधनामध्ये माध्यमिक स्तरावर शिकत असलेल्या १२० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यामध्ये ग्रामीण माध्यमिक शाळांमधून ६० विद्यार्थी आणि शहरी माध्यमिक शाळामधून ६० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे. संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला. वैफल्याच्या संदर्भात माहितीचे संकलन करण्यासाठी चव्हान आणि तिवारी यांनी विकसित केलेल्या Frustration Test चा वापर करण्यात आलेला आहे आणि आक्रमकतेच्या संदर्भात आवश्यक माहितीचे संकलन करण्यासाठी Pal and Naqvi (१९८६) यांनी विकसित केलेल्या Aggression Test चा वापर केलेला आहे. सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यासाठी मध्यमान, प्रमाण विचलन आणि टी परीक्षण या सांख्यिकीय प्रविधींचा वापर केलेला आहे.

या संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आले की, ग्रामीण आणि शहरी माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या आक्रमकतेमध्ये सार्थक फरक आढळून आला. त्यामध्ये ग्रामीण माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांची आक्रमकता ही शहरी माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत अधिक असल्याचे स्पष्ट करण्यात आले. तर ग्रामीण आणि शहरी माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या वैफल्यामध्ये सार्थक फरक आढळून आलेला नाही. म्हणजे ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या वैफल्याचे प्रमाण जवळपास सारखे आढळून आले.

Mahesh Kumar Muchhal, Arun Kumar, (2016), A Study of Teaching Aptitude of Science Teachers of Senior Secondary Schools.

The International Journal of Indian Psychology
Volume 3, Issue 2, No.3,
http://www.ijip.in | January - March, 2016

प्रस्तुत संशोधनामध्ये उच्च माध्यमिक शाळांमधील विज्ञान शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेचा अभ्यास करण्यात आलेला आहे. या संशोधनामध्ये पुढील उद्दिष्टये निश्चित करण्यात आली. त्यामध्ये उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये कार्यरत असलेल्या विज्ञान शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेचा अभ्यास करणे. शासकीय आणि खाजगी उच्च माध्यमिक शाळांमधील विज्ञान शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेचा अभ्यास करणे. उच्च माध्यमिक शाळांमधील विज्ञान विषयाचे अध्यापन करणारे महिला व पुरूष शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेचा अभ्यास करणे. वरील उद्दिष्टये या संशोधनाच्या बाबतीत निर्धारित करण्यात आली आहेत.

या संशोधनासाठी १५ उच्च माध्यमिक शाळांमधून ३० विज्ञान शिक्षकांची न्यादर्श स्वरूपात निवड करण्यात आलेली आहे. त्यामध्ये १५ महिला विज्ञान शिक्षिका आणि १५ पुरूष विज्ञान शिक्षकांची निवड करण्यात आली, तसेच १५ विज्ञान शिक्षक शासकीय उच्च माध्यमिक विद्यालयातील आणि १५ विज्ञान शिक्षक खाजगी उच्च माध्यमिक विद्यालयातील आहेत. या संशोधनाच्या संदर्भात आवश्यक माहितीचे संकलन करण्यासाठी Srivastava R. P and Tiwari Geeta १९८६ यांनी विकसित व प्रमाणित केलेल्या Teacher Teaching Aptitude Questionnaire चा वापर करण्यात आला आहे.

या संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आले की, शासकीय आणि खाजगी उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये कार्यरत असलेल्या विज्ञान विषयाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेमध्ये सार्थक फरक आढळून आला नाही, म्हणजे शासकीय व खाजगी शाळामधील विज्ञान विषयाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांची अध्यापन अभियोग्यता जवळपास सारखी असल्याचे स्पष्ट होते. विज्ञान विषयाचे अध्यापन करणाऱ्या महिला आणि पुरूष शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेमध्ये सार्थक फरक आढळून आला नाही, म्हणजे उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये विज्ञान विषयाचे अध्यापन करणाऱ्या महिला आणि पुरूष शिक्षकांची अध्यापन अभियोग्यता जवळपास सारखी असल्याचे दिसून आले.

Sudha K Sharmaa, Sajad Ahmed, (2016), A Study of Teaching Aptitude of Prospective Teachers in Relation to their Gender and Educational Background.

International Educational E-Journal, {Quarterly}, Volume-V, Issue-I, Jan-Feb-Mar 2016

प्रस्तुत संशोधनामध्ये शिक्षक प्रशिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेचा त्यांचे लिंग आणि शैक्षणिक पार्श्वभूमीच्या संदर्भातील संबंधाचा अभ्यास करण्यात आलेला आहे. या संशोधनाची उद्दिष्टये पुढीलप्रमाणे निर्धारित करण्यात आली. त्यामध्ये कला शाखेतून शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमामध्ये प्रवेशित महिला आणि पुरूष शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांच्या अध्यापन अभियोग्यतेचा अभ्यास करणे. विज्ञान शाखेतून शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमामध्ये प्रवेशित महिला आणि पुरूष शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांच्या अध्यापन अभियोग्यतेचा अभ्यास करणे. कला आणि विज्ञान शाखेतून प्रवेशित झालेल्या शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांच्या अध्यापन अभियोग्यतेचा तुलनात्मक अभ्यास करणे. ही उद्दिष्टये प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भात निर्धारित करण्यात आलेली आहेत.

प्रस्तुत संशोधनासाठी संर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला आहे तसेच न्यादर्श स्वरूपात एकूण २०० शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे. त्यामध्ये १०० पुरूष शिक्षक प्रशिक्षणार्थी असून १०० महिला शिक्षक प्रशिक्षणार्थी आहेत या संशोधनाच्या संदर्भात आवश्यक माहितीचे संकलन करण्यासाठी Dhahiya and Singh २००४ यांनी विकसित व प्रमाणित केलेल्या Teaching Aptitude Test चा वापर करण्यात आला आहे.

या संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आले की, महिला आणि पुरूष शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांच्या अध्यापन अभियोग्यतेमध्ये सार्थक फरक आहे. यामध्ये महिला शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांची अध्यापन अभियोग्यता ही पुरूष शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांच्या तुलनेत अधिक प्रभावी असल्याचे आढळून आले. शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांच्या शैक्षणिक पार्श्वभूमीचा त्यांच्या अध्यापन अभियोग्यतेवर सार्थक प्रभाव पडत नाही. शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांचे लिंग आणि त्यांची शैक्षणिक पार्श्वभूमी यांचा त्यांच्या अध्यापन अभियोग्यतेवर सार्थक प्रभाव पडत नसल्याचे स्पष्ट केलेले आहे.

Suhail Ahmed Khan, Khan Farhatunnisa (2016), Relationship Between Teaching Aptitude and Adjustment of Teachers Of Secondary & Higher Secondary Schools Of Raipur City -A Study.

Amity International Journal of Teacher Education (AIJTE), Volume 2, No.1, April 2016

प्रस्तुत संशोधनामध्ये रायपूर शहरातील माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षकांची अध्यापन अभियोग्यता आणि समायोजनामधील संबंधाचा अभ्यास करण्यात आला आहे. या संशोधनाच्या संदर्भात पुढील उद्दिष्टये निश्चित करण्यात आली. त्यामध्ये माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षकांची अध्यापन अभियोग्यता आणि शिक्षकीय समायोजन यांच्यामधील सहसंबंधाचा अभ्यास करणे, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेचा अभ्यास करणे, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या समायोजनाचा अभ्यास करणे, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेची तुलना करणे, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षकांच्या शिक्षकीय समायोजनाची तुलना करणे, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयातील महिला आणि पुरूष शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेचा अभ्यास करणे, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयातील महिला व पुरूष शिक्षकांच्या शिक्षकीय समायोजनाचा अभ्यास करणे.

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला. रायपूर शहरातील इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या आहे. या जनसंख्येमधून ४४० माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांची निवड या संशोधनासाठी करण्यात आली. संशोधन विषयाच्या संदर्भात आवश्यक माहितीचे संकलन करण्यासाठी Jai Prakash and Shrivastava R. P यांनी विकसित व प्रमाणित केलेल्या Teaching Aptitude test चा वापर करण्यात आला तसेच शिक्षकीय समायोजनाच्या संदर्भात माहिती संकलनासाठी Mangal S. K. यांनी विकसित व प्रमाणित केलेल्या Teacher Adjistment Inventory चा वापर करण्यात आला आहे.

या संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आले की, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकांची अध्यापन अभियोग्यता आणि शिक्षकीय समायोजन यांच्यामध्ये सार्थक सहसंबंध नाही. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेमध्ये सार्थक फरक नाही. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षकांच्या शिक्षकीय समायोजनामध्ये सार्थक

फरक आढळून आला. त्यामध्ये उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षकांचे शिक्षकीय समायोजन अधिक प्रभावी आढळून आले. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयातील महिला आणि पुरूष शिक्षकांच्या समायोजनामध्ये सार्थक फरक आढळून आला नाही. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयातील महिला आणि पुरूष शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेमध्ये सार्थक फरक आढळून आला नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

Pinki Baruah, Manashee Gogoi (2017), Attitude towards Teaching Profession in relation to Adjustment among Secondary School Teachers of Dibrugarh District.

International Journal of Humanities & Social Science Studies (IJHSSS) Volume-III, Issue-IV, January 2017, Page No. 166-177 Website: http://www.ijhsss.com

प्रस्तुत संशोधनामध्ये माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचा अध्यापन व्यवसायाच्या प्रती असलेल्या दृष्टिकोनाचा त्यांच्या समायोजनाशी असलेल्या संबंधाचा अभ्यास करण्यात आला आहे. त्यासाठी पुढील उद्दिष्टये निश्चित करण्यात आली. त्यामध्ये शिक्षकांचा अध्यापन व्यवसायाच्या संदर्भात असलेल्या दृष्टिकोनाचा स्तरनिहाय अभ्यास करण्यात आला तसेच शिक्षकांचा अध्यापन व्यवसायाच्या प्रती असलेल्या दृष्टिकोनाचा, त्यांच्या समायोजनाशी असलेल्या सहसंबंधाचा अभ्यास करण्यात आला आहे. या संदर्भात शून्य परिकल्पनेची निश्चिती करण्यात आली, त्यामध्ये माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचा शिक्षकीय व्यवसायाच्या प्रती असलेल्या दृष्टिकोनाचा त्यांच्या समायोजनाशी सार्थक सहसंबंध आढळून येत नाही असे मानण्यात आले आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला या संशोधनामध्ये ३५० माध्यमिक शाळा आणि त्या शाळांमध्ये कार्यरत असलेले शिक्षक ही प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या निश्चित करण्यात आली. या जनसंख्येमधून न्यादर्श स्वरूपात ३४ माध्यमिक शाळांची निवड करण्यात आली त्यासाठी यादृच्छिक न्यादर्शन प्रविधीचा वापर करण्यात आला. तसेच शिक्षकांची न्यादर्श स्वरूपात निवड करण्यासाठी गुच्छ न्यादर्शन प्रविधीचा वापर करण्यात आला. यामाध्यमातून एकूण ३०० शिक्षकांची निवड या संशोधनासाठी करण्यात आली आहे. या संशोधनाच्या संदर्भात आवश्यक माहितीचे संकलन करण्यासाठी Mangal S. K. १९७१ यांनी विकसित केलेली Teacher Adjustment Inventory आणि Umme Kulsum २००५ यांनी विकसित केलेली Attitude Scale toward teaching profession. या साधनांचा वापर करण्यात आला आहे.

या संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आले की, माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचे समायोजन आणि अध्यापन व्यवसायाच्या संदर्भात त्यांचा दृष्टिकोन यामध्ये सार्थक सहसंबंध आढळून आला. म्हणजे शिक्षक समायोजनामध्ये होणाऱ्या बदलाच्या धनात्मक प्रमाणात त्यांच्या शिक्षकीय व्यवसायाच्या संदर्भात असलेल्या दृष्टिकोनामध्ये सार्थक परिवर्तन होत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. माध्यमिक स्तरावरील महिला आणि पुरूष शिक्षकांच्या संदर्भात त्यांचा शिक्षकीय व्यवसायाच्या संदर्भात असलेल्या दृष्टिकोनाचा त्यांच्या समायोजनाशी उच्च धनात्मक सार्थक सहसंबंध आढळून आला म्हणजे महिला आणि पुरूष शिक्षकांचा त्यांच्या शिक्षकीय व्यवसायाच्या प्रती असलेल्या दृष्टिकोनामध्ये होणाऱ्या बदलाच्या धनात्मक प्रमाणात त्यांच्या समायोजनामध्ये सार्थक बदल होत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. विवाहित आणि अविवाहित शिक्षकांचा त्यांच्या अध्यापकीय व्यवसायाच्या संदर्भात असलेल्या दृष्टिकोनाचा त्यांच्या समायोजनाशी उच्च सार्थक सहसंबंध आढळून आला. म्हणजे विवाहित आणि अविवाहित शिक्षकांचा त्यांच्या अध्यापकीय व्यवसायाच्या संदर्भात असलेल्या दृष्टिकोनामध्ये होणाऱ्या बदलाच्या प्रमाणात त्यांच्या समायोजनामध्ये सार्थक बदल होत असल्याचे या संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आले आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील माध्यमिक शाळांमधील शिक्षकांचा त्यांच्या शिक्षकीय व्यवसायाच्या संदर्भात असलेल्या दृष्टिकोनाचा त्यांच्या समायोजनाशी उच्च सार्थक सहसंबंध आढळून आला. त्यामध्ये ग्रामीण व शहरी शाळांमधील शिक्षकांचा त्यांच्या शिक्षकीय व्यवसायामध्ये होणाऱ्या बदलाच्या धनात्मक प्रमाणात त्यांच्या समायोजनामध्ये सार्थक बदल घडून येत असल्याचे स्पष्ट करण्यात आले. प्रशिक्षित आणि अप्रशिक्षित शिक्षकांचा त्यांच्या शिक्षकीय व्यवसायाप्रती असलेल्या दृष्टिकोनाचा त्यांच्या समायोजनाशी सार्थक सहसंबंध असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

२.६ संबंधित संशोधन साहित्याच्या अध्यासामुळे प्रस्तुत संशोधनास मिळालेली दिशा :

अ.क्र	संदर्भ साहित्याचे विवरण	प्रस्तुत संशोधनास मिळालेली दिशा
१	दांडेकर, वा. ना. (२०००). शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र. नागपुर : विद्या प्रकाशन. ६ वी आवृत्ती.	वैफल्याची संकल्पना, समायोजन, मानसिक आरोग्य या संकल्पना समजुन घेण्यास दिशा मिळाली
२	बडवे, शेवतेकर, शारदा. (२००४). विकासाचे व अध्ययनाचे मानसशास्त्र. नागपुर : श्री विद्या प्रकाशन.	मानसिक आरोग्याची समायोजन यांची माहिती मिळाली, तसेच मानसिक आरोग्य सदृढ ठेवण्यासाठी घ्यावयाची दक्षता कोणती आहे याची माहिती मिळाली.
३	सोनवणे संजीव, कागरे शोभा (२००४). शैक्षणिक संशोधन व संख्याशास्त्र.	संशोधनाच्या विविध पध्दती, पथदर्शी अभ्यास कसा करावा, नमुना निवड आणि सांख्यिकीय प्रविधीची निवड यासाठी दिशा प्राप्त झाली.
४	भिंताडे, वि. रा. (२००५). शैक्षणिक संशोधन पध्दती. पुणे : नित्य नुतन प्रकाशन.	संशोधनाची संकल्पना, शैक्षणिक संशोधन, संबंधित संशोधन साहित्याचा आढावा, संशोधनाची जनसंख्या न्यादर्श, संशोधनाची साधने याच्या अभ्यासाला दिशा मिळाली.
५	करंदीकर, सुरेश (२००५). शैक्षणिक मानसशास्त्र.	समायोजनाची संकल्पना, समायोजनासाठी होणारे प्रयत्न समायोजित व्यक्तीची लक्षणे समजुन घेण्यास दिशा मिळाली.
६	बुरकले रामदास, पिचड नलिनी (२००६). शैक्षणिक मानसशास्त्र.	मानसिक ताण, चिंता आणि वैफल्य ही प्रक्रिया समजण्यास मदत झाली. याशिवाय तणावाचे व्यवस्थापन कसे करावे याबाबत माहिती मिळाली.
७	जगताप ह. ना. (२००७). शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र पूणे : नित्य नुतन प्रकाशन	मानसिक आरोग्य, समायोजन शिक्षकांचे मानसिक आरोग्य, त्याची कारणे वैफल्य त्याचे परिणाम याचा अभ्यासाला दिशा मिळाली.
८	पोंक्षे, द. बा. (२००७). शैक्षणिक मानसशास्त्र आणि प्रायोगिक कार्य. पुणे : नित्य नुतन प्रकाशन.	शिक्षकांचे मानसशास्त्र त्यामध्ये शिक्षकांची विविध क्षमता क्षेत्रे,

		बांधिलकी क्षेत्रे याची माहिती प्राप्त झाली.
९	देशमुख, एल. जी. (२००७). शैक्षणिक मानसशास्त्र व अध्यापन शास्त्र. कोल्हापूर : फडके प्रकाशन.	शिक्षकांची बदलती भुमीका याविषयी माहिती प्राप्त झाली.
१०	बर्वे, बी. एन., नरके, एच. के. (२००८). मनोमापन. नागपूर : विद्या प्रकाशन प्रथम आवृत्ती.	अभियोग्यतेची संकल्पना, अभियोग्यतेचे मापन कसे करावे याच्या अभ्यासाकरीता दिशा प्राप्त झाली.
११	गांजरे, रा. वि., चिटणीस अशुमती (२००९). अध्ययन अध्यापनाचे मानसशास्त्र आणि मानसशास्त्रीय प्रयोग. पुणे : नित्य नुतन प्रकाशन.	मानसिक आरोग्य, मानसिक आरोग्याचे घटक, मानसिक आरोग्य योग्य नसण्याची कारणे, त्याला प्रभावित करणारे घटक याची माहिती प्राप्त होण्यास मदत झाली.
१२	चव्हाण, गणेश (२००९). अध्ययन अध्यापन पारंपारीक ते आधुनिक. पुणे : नित्य नुतन प्रकाशन.	ताण-तणावाचे व्यवस्थापन कसे करावे यासाठी दिशा प्राप्त झाली.
१३	पंडित, र. वि. शैक्षणिक मानसशास्त्र.	अभियोग्यता, अभियोग्यतेची संकल्पनात्मक रूपरेखा समजुन घेण्यास यामुळे दिशा प्राप्त झाली.
१४	नानकर, शिरोडे. सुबोध शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र.	वैफल्याचे व्यक्तीच्या मनस्थितीवर होणारे परिणाम समजुन घेण्यास दिशा मिळाली.
१५	घोरमोडे, के. यु. घोरमोडे कला. उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण.	शिक्षणाची उदिद्ष्टये समजुन घेण्यासाठी यामुळे दिशा प्राप्त झाली.

२.७ संबंधित पूर्व संशोधनांच्या अध्यासामुळे प्रस्तुत संशोधनास मिळालेली दिशा :

अ.क्र	पूर्व संशोधनाचे विवरण	प्रस्तुत संशोधनास मिळालेली दिशा
१	Pandya (1993),Teaching Aptitude of secondary school teachers of Gujarat state in the contex of som psychosocial variable.	या संशोधनामुळे शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेला प्रभावित करणा-या मनोसामाजिक घटकांच्या अभ्यासाला दिशा मिळाली शिवाय सांख्यिकीय विश्लेषणासाठी कोणती सांख्यिकीय तंत्रे वापरावी यासाठी दिशा मिळाली.
२	Jaykand, (2003),[2] Eximined the Relationship Between the General Teaching competence and teacher attitude toward teaching.	शिक्षकामधील क्षमता आणि मनोवृत्ती याचा अभ्यासामुळे प्रस्तुत संशोधामध्ये शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्ती क्षमतांच्या अभ्यासाला चालना मिळाली. शिवाय जनसंख्यात्मक चले या संशोधनामुळे निश्चित करण्यात दिशा मिळाली आहे.
३	Kukreti, saxena and Gihar (2005), Correlational study between the values and teacher competence Special reference to Baswara District Rajasthan.	शिक्षकांची व्यावसायिक बांधिलकीचा शिक्षकांच्या अभिवृत्ती विकासाकरीता असलेले महत्व प्रतिपादित करण्यास दिशा मिळाली आहे.
४	Jamal (2007), A Study of relationship of organization commitment of teacher stress, job satisfaction, teacher adjustment and socio emotional school climate.	शाळांमधील वातावरण शिक्षकांच्या समायोजनाला प्रभावित करते शिवाय शालेय वातावरणाचा शिक्षकांच्या वैफल्यावर सुध्दा परिणाम होतो त्यामुळे कशा प्रकारचे शालेय वातावरण असावे हे जाणून घेण्यास दिशा मिळाली.
५	वानखडे प्रतिभा, (२००९), अमरावती विभागातील ग्रामीण आणि शहरी भागातील माध्यमिक शाळेतील शिक्षकांची अध्यापन परिणामकारकता, शालेय वातावरण आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादन प्रेरणा यांच्या सहसंबंधाचा अभ्यास.	शिक्षकांची अध्यापन परिणामकारकता ज्या विविध घटकांवर आधारित आहे त्यामध्ये शिक्षकांची अध्यापन अभियोग्तेचे महत्व समजुन घेण्यास मदत झाली. शिवाय संशोधन पध्दती आणि जनसंख्यात्मक चले निश्चित करण्यास यामुळे दिशा मिळाली.
६	Shrivastava and Pratibha (2009), To study the teaching competency of teacher relationship to their teaching attitude and professional commitment.	शिक्षकांची अभिक्षमता, शिक्षकांची अभिवृत्ती जाणून घेण्यास मदत झाली शिवाय संशोधन पध्दती आणि जनसंख्यात्मक चलांचे निर्धारण करण्यास दिशा मिळाली.
७	Sood and Anand (2010), To Study the professional Commitment of teacher educatiors serving in secondary training institute of himachal Pradesh.	शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकीचा घटक म्हणून शिक्षकांच्या अभियोग्यतेचा उल्लेख करण्यात आला आहे त्यामुळे अध्यापन अभियोग्यतेच्या संदर्भातील बांधिलकी तत्वे आणि त्यांचे स्वरूप समजुन घेण्यास मदत झाली तसेच संशोधनाची पध्दती व माहिती संकलन

		साधने निश्चिती करीता दिशा मिळाली आहे.
८	Singh (2010), To study the relationship between the adjustment, attitude and job satisfaction among the central school teacher.	माध्यमिक शाळांमधील शिक्षकांचे समायोजन समजुन घेण्यास दिशा मिळाली तसेच संशोधन पध्दती, न्यादर्शाचे निर्धारण करण्यास यामुळे दिशा मिळालेली आहे.
९	श्यामकुल महेंद्र, (२०१२). माध्यमिक शाळेतील नियमित शिक्षक व शिक्षण सेवक यांची अध्यापन योग्यता, मानसिक आरोग्य, व्यावसायिक समाधान आणि समायोजन यांचा तुलनात्मक अभ्यास.	शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यता, समायोजन हया संकल्पना आणि त्यांच्यामधील संबंध समजुन घेण्यास घेण्यास दिशा मिळाली.
१०	Samir Kumar Lenka, Ravi Kant (2012), Frustration and Work Motivation of Secondary School Teachers as A Correlate of Leadership Behavior of Their Heads.	माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचे वैफल्य समजुन घेण्यास दिशा मिळाली तसेच संशोधन पध्दती, न्यादर्शाचे निर्धारण करण्यास यामुळे दिशा मिळाली आहे.
११	Goyal Anju (2012), A Study of Adjustment Level Among Primary School Teacher in Jhajjar District.	शिक्षकांच्या समायोजनाच्या अभ्यासाला दिशा मिळाली तसेच माहिती संकलनाची साधने त्यामधील घटक जाणून घेण्यास मदत झाली. तसेच सांख्यिकीय विश्लेषण प्रविधीचा वापराला यामुळे दिशा मिळाली आहे.
१२	Lal Kumar A. C., Muthumanicakam R. (2013), Investigating the Frustration of D.T.Ed., Teacher Trainees.	शिक्षक प्रशिक्षकांच्या वैफल्याची संकल्पना समजुन घेण्यास मदत झाली तसेच संशोधनाची पध्दती, न्यादर्शाचे निर्धारण संशोधनाची साधने यांचे निर्धारण व त्यामधील घटकांचा अभ्यास याला दिशा मिळाली सांख्यिकीय विश्लेषणासाठी वापरावयाच्या प्रविधीचे निर्धारण यामुळे शक्य झाले आहे.
१३	Borkar Usha A. (2013), A Study of Teacher Effectiveness of Secondary School Teachers in Relation to Teacher Stress.	शिक्षकांमधील ताण-तणाव, शिक्षक प्रभावशिलता आणि अध्यापन अभियोग्यता यांच्यामधील संबंध जाणून घेणे यामुळे शक्य झाले.
१४	Hunnur Rashmi Ram, Vyas Brijmohan, Sudarshan S., Mathad Jyoti, Pareek Piyush (2013), A Study on Job Stress for school Teachers.	वैफल्याच्या पूर्वीची स्थिती म्हणजे शिक्षकामधील ताण-तणाव यामुळे वैफल्य कसे निर्माण होते ही प्रक्रिया समजुन घेण्यास यामुळे दिशा मिळाली आहे.
१५	Nadeem N.A., Bhat Gawher Ahmed (2014) A Study of Adjustment Level among Secondary School Teachers in Kashmir.	शिक्षकांच्या समायोजनाची संकल्पना, विविध घटक त्यांच्यामधील परस्पर संबंध समजुन घेण्यास मदत झाली तसेच संशोधन पध्दती, संशोधनाची साधने, जनसंख्यात्मक चल आणि सांख्यिकी प्रविधीचा वापर यासाठी या संशोधनामुळे दिशा मिळाली.

१६	Janefer M Ophelia (2014), A Study on stress among school teachers in selected schools in Chennai.	शिक्षकांचा ताण-तणाव त्यास कारणीभुत परिस्थिती आणि त्यामुळे निर्माण होणारे वैफल्य ही प्रक्रिया समजुन घेण्यास या संशोधनामुळे दिशा मिळाली.
१७	Pachaiyappan P. Raj D. Usshalaya, (2014). Evaluating the teacher Effectiveness of secondary and Higher Secondary school Teachers.	शिक्षक प्रभावशिलतेमधील विविध घटकांचा अभ्यास करून शिक्षक अभियोग्यता या घटकाची अन्य घटकांच्या संदर्भातील महत्व समजुन घेण्यास या संशोधनामुळे दिशा मिळाली.
१८	Pasricha Arti (2014), A Comparative Study of Frustration Among Adolescents Boys And Girls In Relation To Their Certain Cognitive Attributes.	विद्यार्थ्यांचे वैफल्य त्यांच्या शालेय घटनामधील शिक्षकांच्या वैफल्याला कशा प्रकारे प्रभावीत करते याचा अभ्यास व स्वरूप समजुन घेण्यास दिशा मिळाली.
१९	Ramesh (2015), Teaching Aptitude and Adjustment of Secondary School Teachers.	शिक्षकांची अध्यापन अभियोग्यता आणि समायोजनाची संकल्पना त्यामधील विविध घटकांचा अभ्यास, संशोधनाची पध्दती, संशोधनाची साधने आणि सांख्यिकीय विश्लेषणाला यामुळे दिशा मिळाली.
२०	Muraleedharan.T. (2015), Stress in Relation to Teaching Aptitude of Student Teachers in Colleges of Education.	प्रशिक्षणार्थ्यांमधील ताण-तणाव आणि त्यांची अध्यापन अभियोग्यता यांच्यामधील संबंधाचा अभ्यासाला दिशा मिळाली.
२१	Goutami S. (2015), Modes of frustration causing burnout among Government & Non-government School Teachers.	शिक्षकामधील वैफल्य, त्याचे स्वरूप, कारणे समजुन घेण्यास या संशोधनामुळे दिशा मिळाली. शिवाय विविध जनसंख्यात्मक चलांचे निर्धारण करतांना या संशोधनाची मदत झाली आहे.
२२	Rekha Rani & Deswal Y.S. (2015), Relationship Of Frustration And Academic Achievement of Adolescents of Government And Non-Government Senior Secondary Schools.	विद्यार्थ्यांचे वैफल्य आणि त्यांची संपादणूक याचा शिक्षकांच्या वैफल्याशी असलेला संबंध पडताळून पाहण्यासाठी दिशा प्राप्त झाली.
२३	Kumar Ajay, (2015) Attitude Towards Teaching Profession in Relation to Adjustment among senior Secondary School Teachers.	शिक्षकांचा व्यावसायिक दृष्टिकोण त्यांच्या समायोजनाला कशाप्रकारे प्रभावित करतो त्याचे स्वरूप समजुन घेण्यास या संशोधनामुळे दिशा मिळाली.
२४	Patil Muddanagouda (2016) Aggression and Frustration among Rural and Urban Secondary School Students.	विद्यार्थ्यांची आक्रमकता आणि वैफल्यामुळे शालेय घटनांच्या संदर्भात होणारी परिवर्तन आणि त्यामुळे निर्माण होणारे शिक्षकांचे वैफल्य याचा अभ्यास करण्यास यामुळे दिशा मिळाली.
२५	Mahesh Kumar Muchhal, Arun Kumar, (2016), A Study of Teaching Aptitude of Science Teachers of Senior Secondary	शिक्षकाची अध्यापन अभियोग्यता व विविध घटकांच्या अभ्यासाला, संशोधन पध्दतीच्या निवडीला यामुळे दिशा मिळाली.

	Schools.	
२६	Sudha K Sharmaa, Sajad Ahmed, (2016) A Study of Teaching Aptitude of Prospective Teachers in Relation to their Gender and Educational Background.	शिक्षकांच्या अभियोग्यतेला विविध जनसंख्यात्मक चले कशाप्रकारे प्रभावित करतात हे जाणून घेण्यास दिशा मिळाली तसेच संशोधनाची पध्दती निश्चित करण्यासाठी यामुळे दिशा प्राप्त झाली.
२७	Suhail Ahmed Khan, Khan Farhatunnisa (2016), Relationship Between Teaching Aptitude and Adjustment of Teachers Of Secondary & Higher Secondary Schools Of Raipur City.	शिक्षकांची अध्यापन अभियोग्यता आणि त्यांचे समायोजन यामधील संबंध तसेच परस्पर प्रभावकारीता समजुन घेण्यास मदत झाली तसेच संशोधनाची पध्दती, माहिती संकलनाची साधने यांची निश्चिती करण्यास दिशा प्राप्त झाली.
२८	Pinki Baruah, Manashee Gogoi (2017) Attitude towards Teaching Profession in relation to Adjustment among Secondary School Teachers of Dibrugarh District	शिक्षकांच्या दृष्टिकोणाचा त्यांच्या समायोजनाशी असलेल्या सहसंबंधाचे स्वरूप समजुन घेण्यास मदत झाली तसेच संशोधनाची पध्दती, न्यादर्शाचे निर्धारण माहिती संकलनाची साधने यांच्या निवडीला यामुळे दिशा प्राप्त झाली.

२.७ प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण :

प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भात पूर्व संशोधनांचा अभ्यास केला असता स्पष्ट होते की, या संशोधन विषयाशी संबंधित असलेले पूर्व संशोधने त्यामध्ये शिक्षकांची अध्यापन अभियोग्यता, शिक्षकांचे समायोजन आणि शिक्षकांचे वैफल्य यासंदर्भात स्वतंत्रपणे अध्ययन झालेले आहेत. प्रस्तुत संशोधनामध्ये पूर्व संशोधनामधील एका चलांचा विचार न करता शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेच्या संदर्भात त्यांचे समायोजन आणि शालेय घटनांमधील वैफल्याचे अध्ययन करण्यात आलेले आहे. संबंधित संशोधन साहित्याचा अभ्यास केला असता दिसून येते की, शिक्षक समायोजन, शिक्षकांची अध्यापन अभियोग्यता आणि शिक्षकांचे वैफल्य यासंदर्भातील अध्ययन हे माध्यमिक, उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या संदर्भात करण्यात आलेले आहे, परंतु माध्यमिक स्तरावरील ग्रामीण व शहरी आणि अनुदानित विना-अनुदानित शिक्षकांच्या संदर्भात पूर्व संशोधने झालेली आढळून येत नाहीत.

प्रस्तुत संशोधनामध्ये या संशोधन विषयाच्या संदर्भात अनुदानित आणि विना-अनुदानित ग्रामीण माध्यमिक शाळामधील शिक्षकांच्या संदर्भात त्यांची अध्यापन अभियोग्यतेच्या बाबतीत या शिक्षकांचे समायोजन आणि शालेय घटनांमधील वैफल्याचा अभ्यास करण्यात आलेला आहे. हेच प्रस्तुत संशोधनाचे पूर्व संशोधनाच्या तुलनेत वेगळेपण आहे.

प्रकरण ३ रे

संशोधनाची कार्यपद्धती

३.१ प्रस्तावना :

आधुनिक काळामध्ये जवळपास सर्वच क्षेत्रामध्ये ज्ञानाचा विलक्षण विस्तार झाला आहे आणि सातत्याने होत आहे. ज्ञानाचे क्षेत्र झपाट्याने वाढत विविध ज्ञान स्त्रोत निर्माण होत आणि त्यामाध्यमातून समाजाचा विकास होत आहे. यासाठी वैज्ञानिक व इतर विद्वानांचे व सर्जनशील व्यक्तींचे संशोधन कार्यातील अविरत प्रयत्न मोठया प्रमाणात कारणीभूत ठरत आहेत. भारतीय शिक्षणाच्या संदर्भात विचार केल्यास लक्षात येते की, आपल्या देशात स्वातंत्र्यानंतर शैक्षणिक प्रगती ही संथ गतीने झालेली दिसून येते. या शिक्षणाच्या मंद प्रगतीमुळे अनेक समस्या व नव-नवीन प्रश्न शिक्षण तज्ज्ञ व प्रशासक यांच्या समोर उभे ठाकले आहेत. तसेच, भारतामध्ये जागतीकरण व उदारीकरणाच्या धोरणानंतर शिक्षण क्षेत्रात मोठे बदल झाले आहेत. जागतीकरणासाठी आवश्यक असलेले ज्ञान कौशल्याची मागणी सातत्याने वाढत आहे त्यामुळे शिक्षणाचा मूळ हेतु सुध्दा काही प्रमाणात बदलत चाललेला असल्याचे दिसून येते जसे शिक्षणाचा नोकरी व्यवसायाशी संबंध प्रस्थापित करणे, उपयोजित विषयांना असलेली मोठया प्रमाणावरील मागणी आणि मानविकी विषयाकडे विद्यार्थ्यांनी फिरवलेली पाठ, याशिवाय इंग्रजी माध्यमांच्या शाळांची वाढती मागणी आणि या शाळांचे व्यवसायामध्ये होत असलेले रुपांतरण अशातच शिक्षकांचा अध्यापनाचा हेतू त्यांच्या व्यावसायिक विकासाकडे होणारे दूर्लक्ष, त्यांना देण्यात येणारे कमी वेतन याचा शिक्षकांच्या व्यावसायिक अभिवृत्ती, समायोजन आणि वैफल्यावर विपरीत परिणाम होणे अपरिहार्य आहे यामुळे विविध प्रकारच्या समस्या शालेय स्तरावर शिक्षकांचय संदर्भात निर्माण होतांना दिसून येते आहेत. अशा या विविध समस्यांचे अभ्यासपूर्ण निराकरण करण्याचे उपाय शोधण्यासाठी संशोधन हेच एकमेव उपयुक्त साधन बनले आहे.

३.२ संशोधनाची संकल्पना :

ज्ञानाचे क्षेत्र व्यापक व सुदृढ करण्याकरिता, समस्यांचे आकलन व निराकरण करण्याकरिता आणि एकंदर मानवी जीवन प्रगतिशील व समृद्ध होण्यासाठी संशोधन हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. ज्ञान प्राप्तीसाठी वैज्ञानिक पद्धतीचा उपयोग करून मानवाचा आणि त्याच्या सर्व घटकांचा सर्वांगीण

विकास करण्याच्या प्रक्रियेला संशोधन म्हणता येईल, कारण या वैज्ञानिक संशोधन पद्धतीत तर्कसंगत विचार प्रणालीचा उपयोग शास्त्रशुद्ध पद्धतीने समस्या निराकरणासाठी आणि मानवी कल्याणासाठी केला जातो. संशोधनाचा मुख्य हेतू नवे ज्ञान प्राप्त करणे, विद्यमान माहितीबद्दल नवीन दृष्टिकोन प्रस्तुत करणे, घटनांचे विश्लेषण करुन त्यातील संबंध नव्याने प्रस्थापित करणे, जुन्या मापन साधनांमध्ये सुधारणा घडवून आणणे अथवा अधिक प्रभावी व कार्यक्षम नवी साधने तयार करणे आणि या सर्वांद्वारे जगाबद्दलचे आपले एकंदर ज्ञान वाढवून मानवाच्या, समाजाच्या, राष्ट्राच्या आणि जागतिक प्रगतीला पोषक परिस्थिती आणि वातावरण निर्माण करणे हा होय.

३.२.१ संशोधनाच्या व्याख्या :

"खऱ्या अर्थाने संशोधन म्हणजे वैज्ञानिक पद्धती प्रत्यक्षात कार्यान्वित करण्याची अधिक नियमबद्ध, आकारबद्ध, सुव्यवस्थित व सखोल अशी प्रक्रिया होय."

बेस्ट जॉन डब्ल्यू, खान जे. व्हि

घाटोळे, रा. ना., (२००४). समाजशास्त्रीय संशोधन तत्त्वे व पद्धती. नागपूर : मंगेश प्रकाशन. पृष्ठ क्र. ५

"Systematimized Effort to Gain New Knowledge"

Redman and Mory

Redman, L. V., and Mory A.V.H., (1923). The Romance of Research. ,Page No.10

"Research is an honest, exhaustive intelligent searching for facts and their meanings or implication with references to a given problems."

Cook P. M.

Oxford Dictionary, (2003). *Great Eleandol Street*. Page no. 203

"A careful investigation or in enquiry specially through search for new fact in any branch of knowledge"

The Advance learner dictionary of current English oxford, 1952.

Oxford Dictionary, (2003). *Great Eleandol Street*. Page no. 203

"Research is the systematic attempt to provide and answer to questions."

Tuckman B. W.

घोरमोडे, के. यु. आणि घोरमाडे, के. के., (२००८). शैक्षणिक संशोधनाची मुलतत्त्वे. नागपूर : विद्या प्रकाशन. पृष्ठ क्र. ३

वरील व्याख्यांचा परामर्श घेता असे लक्षात येते की, संशोधन ही पद्धतशीर आणि वस्तुनिष्ठ स्वरुपाची वैज्ञानिक प्रक्रिया आहे. ज्यामध्ये समीक्षा आणि चिकित्सा करुन समस्येची उत्तरे शोधली जातात. संशोधनातून प्राप्त झालेल्या निष्कर्षांना पडताळून पाहता येते. सत्य असत्याचा नेमकेपणा पाहता येतो. संशोधन हे वस्तुस्थितीकडे पाहाण्याचा वैज्ञानिक दृष्टिकोन देते व त्यामुळे पूर्वीची वस्तुस्थिती आपल्याला अर्थपूर्ण वाटू लागते. संशोधनात माहितीचे वस्तुनिष्ठपणे वर्गीकरण, सामान्यीकरण आणि खुलासा केला जातो. संशोधनाच्या प्रक्रियेतून नवीन ज्ञान प्राप्तीचा पद्धतशीर प्रयत्न केला जातो. तसेच जुन्या माहितीचे पुनर्स्पष्टीकरण मांडण्याचा प्रयत्न केला जातो. अशा प्रकारे संशोधन या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट होतो.

३.२.२ शैक्षणिक संशोधनाची संकल्पना :

ज्ञानाच्या स्फोटाने मानवाने काल मिळविलेली एखाद्या विषयाची माहिती आज अपुरी ठरते आहे. गेल्या साठ वर्षात मानवाने प्राप्त केलेले विविध विषयाचे ज्ञान त्यापूर्वीच्या सात-आठशे वर्षातील प्राप्त केलेल्या ज्ञानाच्या कित्येक पटीने जास्त आहे. आर्थिक, राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक या जीवनाच्या प्रमुख क्षेत्रात प्रचंड परिवर्तन घडून येत आहे. या विविध क्षेत्रांमध्येही शैक्षणिक क्षेत्र हे असे क्षेत्र आहे, की इतर क्षेत्रांमध्ये योग्य दिशेने प्रगती करण्यासाठी शैक्षणिक क्षेत्रातील विविध विचार, तत्त्वे, प्रणाली, प्रवाह हे जितके परिपूर्ण असतील तितकी या पद्धतीतून शिकून बाहेर पडणारी पिढी समृद्ध असणार. शिक्षण क्षेत्रातील ही परिपूर्णता त्यामध्ये होणाऱ्या सतत व मूलगामी संशोधनानेच प्राप्त होणार आहे.

शैक्षणिक संशोधनातून मिळालेल्या निष्कर्षांच्या आधारे केलेले शिक्षणविषयक बदलच अधिक यशस्वी ठरतात. यावरुन भारतासारख्या विकसनशील व प्रचंड मानवी संपत्ती असलेल्या देशाला शैक्षणिक संशोधनाची आवश्यकता किती अधिक प्रमाणात आहे हे सिद्ध होते. वैज्ञानिक व इतर क्षेत्रांप्रमाणेच शैक्षणिक क्षेत्रातदेखील अनेक अडचणी व समस्या पुढे येत असतात. उद्दिष्टे संपादन करण्याकरिता या समस्यांचे विश्लेषण करुन त्यांच्या निराकरणाचे उपाय शोधणे आवश्यक आहे. शिक्षण क्षेत्रातील अनेक पैलूंशी संबंधित सुधारणेच्या कामी आवश्यक नियम उपयुक्त पद्धती आणि तत्त्वांचा शोध घेणे हे शैक्षणिक संशोधनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. शिक्षण प्रक्रियेत निर्माण होणाऱ्या अनेक समस्यांवर मात करण्यासाठी शैक्षणिक संशोधन करणे गरजेचे आहे. अशा संशोधनात नियोजनपूर्व

पद्धतशीरपणे आवश्यक माहिती गोळा करुन तिचे शास्त्रशुद्ध विवेचन करुन विद्यमान समस्येचे निराकरण करण्यासाठी प्रभावी व विश्वसनीय उपाय शोधून काढले जातात.

३.२.३ शैक्षणिक संशोधनाच्या व्याख्या :

"शैक्षणिक संशोधन म्हणजे अशी कृती जी शैक्षणिक परिस्थितीमधील वर्तन शास्त्राच्या प्रगतीच्या दिशेने गतिमान झालेली असते.अतिशय प्रभावी पद्धतीने आपली ध्येये प्राप्त करण्यास शिक्षकास मदत करणारे ज्ञान प्राप्त करुन देणे हे या शास्त्राचे अंतिम ध्येय असते."

ट्रॅव्हर्स

भिंताडे, वि. रा., (२००५). शैक्षणिक संशोधन पद्धती. पुणे : नूतन प्रकाशन. पृष्ठ क्र. २६

ट्रॅव्हर्स ने शैक्षणिक संशोधनाचे दोन हेतू सांगितले आहे.

१. शैक्षणिक परिस्थितीत प्रगती साधणे.

२. शिक्षकाला आपली ध्येये प्राप्त करण्यास आवश्यक असणारे ज्ञान देणाऱ्या प्रभावी पद्धती उपलब्ध करुन देणे.

"**The term educational research should be reserve for activities designed to discover fact and relationship that will make the educational process more effective**".

Mouley G. J.

मुळे, रा. श., आणि उमाठे, वि. तु., (१९७७). शैक्षणिक संशोधनाची मुलतत्त्वे. नागपूर : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ. पृष्ठ क्र. १२

शास्त्रीय तत्त्वज्ञानात्मक पद्धतीने शिक्षण क्षेत्रातील समस्यांच्या उत्तराचे ध्येय ठेवून त्या दिशेने केलेले कार्य हे शैक्षणिक संशोधनाचे उद्दिष्ट असते.

व्हिटनेच्या या व्याख्येत दोन महत्त्वाच्या संकल्पना आहेत.

शास्त्रशुद्ध पद्धतीने संशोधन करणे आणि शिक्षण क्षेत्रातील समस्या सोडविणे याच दोन संकल्पना व त्यांचे एकत्रीकरण म्हणजे शैक्षणिक संशोधन होय.

३.३ संशोधनाच्या पद्धती :

संशोधनाच्या प्रमुख पद्धती पुढीलप्रमाणे आहेत.

ऐतिहासिक संशोधन पद्धती :

ऐतिहासिक-संशोधन पध्दतीत भूतकालीन घटनांचा शोध, नोंदी, विश्लेषण अर्थनिर्वचन यांचा समावेश होतो. भूतकाळ आणि वर्तमानकाळ या दोहोंचे आकलन होणे हा ऐतिहासिक संशोधनाचा हेतू

असतो. हयातून घेतलेल्या सामान्यीकरणाच्या शोधातून भविष्यातील घटनांसबंधी अंदाज बांधण्याचा हेतूदेखील अल्प-प्रमाणात साधला जाऊ शकतो.

वर्णनात्मक संशोधन पद्धती :

वर्णनात्मक संशोधन पद्धतीत, संख्यात्मक आणि गुणात्मकरितीने, वर्तमान समस्येचे वर्णन व निराकरण केले जाते. वर्तमानकालीन परिस्थितीच्या नोंदी, विश्लेषण व अर्थनिर्वचन करून परिस्थिती समजून घेणे हा वर्णनात्मक संशोधनाचा हेतू असतो. भिन्न परिस्थितीची तुलना करणे, साम्यभेद शोधून काढणे, जाणीवपूर्वक परिस्थिती निर्माण न करता, आहे त्या परिस्थितीमध्ये विविध चलांतील संबंध जेथे शोधून काढला जातो. विविध प्रकारच्या सांख्यिकीय पद्धती विश्लेषणासाठी वापरल्या जातात.

प्रायोगिक संशोधन पद्धती :

भविष्यकाळात एखाद्या समस्येसंबंधी काय स्थिती असेल याचा अभ्यास ज्या संशोधन पद्धतीत केला जातो त्या संशोधन पद्धतीला 'प्रायोगिक पध्दती' असे म्हणतात. प्रस्तुत संशोधनाचा हेतू, अशा प्रकारच्या संशोधनात भविष्य काळाशी संबंधित असणाऱ्या घटनांचे किंवा समस्यांचे संशोधन प्रामुख्याने हाती घेण्यात येत असल्याने येथे भविष्याचा वेध घेण्यात येतो. याबदद्ल असे निदर्शणास येते की, भविष्यकाळातील समस्यांशी अथवा घटनांशी जे संशोधन संबंधित असते त्यास प्रायोगिक संशोधन पद्धती असे संबोधण्यात येते.

३.३.१ प्रस्तुत संशोधनाकरिता संशोधन पद्धतीची निवड :

संशोधन कार्यामध्ये संशोधन पद्धतीला सर्वाधिक महत्त्व आहे. संशोधन कार्य करीत असताना योग्य अशा संशोधन पद्धतीची निवड करणे आणि त्या पद्धतीचा वापर संशोधनामध्ये करणे गरजेचे आहे. संशोधनाच्या ज्या विविध पद्धती आहेत त्यापैकी प्रस्तुत संशोधनामध्ये सर्वेक्षण पद्धतीची निवड करण्यात आली आहे. या संशोधन कार्यामध्ये माध्यमिक स्तरावरील शिक्षकांची व्यावसायिक अभिवृत्ती आणि त्यांच्या समायोजनाच्या संदर्भात त्यांच्या शालेय घटनांमधील वैफल्य यासंदर्भात संशोधन कार्य करावयाचे असल्यामुळे संशोधन विषयामध्ये निर्धारित करण्यात आलेल्या चलांच्या संदर्भात त्यामध्ये अनुदानित व विना-अनुदानित माध्यमिक शाळामधील शिक्षक, ग्रामीण व शहरी, महिला व पुरूष शिक्षक यांच्या संदर्भातील आवश्यक माहिती संकलन केवळ सर्वेक्षणाच्या माध्यमातूनच करणे शक्य आहे. या संशोधनामध्ये माध्यमिक स्तरावरील शिक्षकांमध्ये अध्यापन अभिवृत्तीची स्थिती काय आहे,

त्यांच्या समायोजनाची स्थिती काय आहे, त्यांच्या शालेय घटनांच्या संदर्भातील वैफल्याची स्थिती काय आहे यासंदर्भात माहिती प्राप्त करण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचे सर्वेक्षण करून त्यासंदर्भात आवश्यक माहिती प्राप्त करणे आणि या शिक्षकांच्या व्यावसायिक अभिवृत्ती आणि समायोजनाच्या संदर्भात त्यांचे शालेय घटनांमधील वैफल्य कसे आहे याचा अभ्यास केवळ वर्णनात्मक संशोधन पद्धतीच्या अंतर्गत असलेल्या सर्वेक्षणाच्या माध्यमातूनच शक्य होऊ शकते अन्य कोणत्याही पद्धतीचा अवलंब प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भात करणे शक्य नाही म्हणून या संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे. त्याअंतर्गत संशोधनासाठी माध्यमिक स्तरावरील अनुदानित व विनाअनुदानित शाळांचे सर्वेक्षण करून तेथे कार्यरत असलेल्या शिक्षकांच्या माध्यमातून आवश्यक माहिती प्राप्त करण्यासाठी सर्वेक्षण करण्यात आलेले आहे.

यामध्ये अमरावती विभागामधील अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशिम, बुलढाणा या जिल्हयामध्ये असलेल्या माध्यमिक शाळा ज्या अनुदानित आणि विना-अनुदानित तत्त्वावर कार्यरत आहेत. शिवाय या शाळा ग्रामीण आणि शहरी भागामध्ये कार्यरत आहेत. या शाळांमध्ये महिला आणि पुरूष शिक्षक कार्यरत आहेत, त्यांच्या संदर्भात अध्यापन अभियोग्यतेच्या बाबतीत असलेले समायोजन आणि शालेय घटनांमधील वैफल्य या घटकांच्या संदर्भात असलेली माहिती या संशोधनासाठी निश्चित करण्यात आलेल्या प्रमाणित साधनांच्या माध्यमातून प्राप्त करण्यात आली. त्यामध्ये माध्यमिक स्तरावरील शिक्षकांची अध्यापन अभियोग्यता, शिक्षकांचे समायोजन आणि शालेय घटनातील वैफल्य या संशोधन साधनांचे वरील माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या संदर्भात कार्यन्वयन करून त्यांच्याकडून आवश्यक माहिती प्राप्त करण्यात आलेली आहे. त्यासाठी अमरावती विभागातील पाचही जिल्हयातील निवड करण्यात आलेल्या शाळांमधील शिक्षकांचे सर्वेक्षण करण्यात आले आणि या संशोधनाच्या संदर्भात आवश्यक माहिती संकलित करण्यात आलेली आहे. अशाप्रकारे प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.

३.४ संशोधनाची जनसंख्या व न्यादर्श (Population and Sampling) :

प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भात संशोधनाची जनसंख्या आणि न्यादर्शाचे निर्धारण पुढीलप्रमाणे करण्यात आलेले आहे.

३.४.१ संशोधनाची जनसंख्या (Population of the Study)

"न्यादर्श अभ्यासात ज्यांच्याविषयी निष्कर्ष काढावयाचे असतात, त्या सर्व व्यक्तींच्या किंवा वस्तुच्या समुहाला जनसंख्या (Population) म्हणतात"

मुळे, रा. श., आणि उमाठे, वि. तु., (१९७७). शैक्षणिक संशोधनाची मुलतत्त्वे. नागपूर : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ. पृष्ठ क्र. ३२०

"By population we mean the aggregate or totality of objects or individuals regarding which interence to be made in a sampling study."

Blommers P. & Lindquist, E.F.

Blammers & Lindquist E. F., (1960). Elementary statistical method. Calcutta : Oxford Book company. page no.234.

प्रस्तुत संशोधनकार्यासाठी अमरावती विभागातील ५ जिल्हयामध्ये ग्रामीण आणि शहरी भागामध्ये कार्यरत असलेल्या अनुदानित आणि विना-अनुदानित माध्यमिक शाळा आणि या शाळांमध्ये कार्यरत असलेले सर्व महिला व पुरूष शिक्षक प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या निश्चित करण्यात आलेली आहे.

३.४.२ संशोधनाचा न्यादर्श (Sample of the Study) :-

संशोधनाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्वात महत्त्वाची व आवश्यक बाब म्हणजे योग्य व समर्पक न्यादर्शाची निवड होय.

"जनसंख्येच्या माहितीाविषयी पूर्वानुमान करण्याकरिता जनसंख्येतून निवडलेल्या व्यक्ती किंवा वस्तू यांच्या लहान संचाला न्यादर्श (Sample) म्हणतात."

मुळे, रा. श., आणि उमाठे वि. तु., (१९८७). शैक्षणिक संशोधनाची मुलतत्त्वे. नागपूर : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ. पृष्ठ क्र. ३२१

"A sample as the name implies, is smaller representative of larger whole."

George & Hatt

भिंताडे, वि. रा., (१९९८). शैक्षणिक संशोधन पद्धती. पुणे : नूतन प्रकाशन. पृष्ठ क्र. ८८

"Sampling is the process by which a relatively small number of individuals or measures of individuals, objects or event is selected and analysed in order to find out something about the entire population from which it was selected."

Bogardus

Kaul, Lokesh, (1996). Methodology of Educational Research. New Delhi : Vikas Publishing house Pvt. Ltd. Page no.394.

जॉर्ज व हॅट यांनी आपल्या नमुना (Sample) याचा अर्थ मोठ्या गटातून प्रातिनिधिक स्वरुपाचा लहान गट असा दिला आहे. तर बोगार्डस्च्या मताप्रमाणे नमुना निवड म्हणजे पूर्वनियोजित योजनेनुसार (मोठ्या गटातून) ठराविक टक्केवारी निवडणे होय.

प्रस्तुत संशोधनाकरिता यादृच्छिक नमुना निवड प्रणालीचा वापर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये अमरावती विभागामध्ये असलेल्या प्रत्येक जिल्हयामधून यादृच्छिक न्यादर्श प्रविधीच्या माध्यमातून अनुदानित आणि विना-अनुदानित माध्यमिक शाळांची निवड करण्यात आलेली आहे. या शाळांमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकांपैकी यादृच्छिक न्यादर्शन प्रविधीचा वापर करून शिक्षकांची निवड लॉटरी पद्धतीच्या माध्यमातून संशोधनासाठी करण्यात आलेली आहे. प्रस्तुत संशोधनाकरिता न्यादर्शाचा आकार पुढीलप्रमाणे निर्धारित करण्यात आलेला आहे.

कोष्टक क्र. ३.१

संशोधनासाठी न्यादर्श स्वरूपात निवड करण्यात आलेल्या शाळांचे विवरण कोष्टक

जिल्हा	अनुदानित विद्यालय			विना-अनुदानित विद्यालय			एकूण
	ग्रामीण	शहरी	एकूण	ग्रामीण	शहरी	एकूण	
अकोला	५	५	१०	५	५	१०	२०
वाशिम	५	५	१०	५	५	१०	२०
अमरावती	५	५	१०	५	५	१०	२०
यवतमाळ	५	५	१०	५	५	१०	२०
बुलढाणा	५	५	१०	५	५	१०	२०
एकूण	**२५**	**२५**	**५०**	**२५**	**२५**	**५०**	**१००**

प्रस्तुत संशोधनामध्ये अमरावती विभागातील निवड करण्यात आलेल्या ग्रामीण व शहरी भागातील अनुदानित आणि विनाअनुदानित माध्यमिक शाळांमधून शिक्षकांची या संशोधनासाठी निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये अमरावती विभागातील प्रत्येक जिल्हयामधून अनुक्रमे २० माध्यमिक शाळांची निवड करण्यात आली. त्यामध्ये १० माध्यमिक शाळा ग्रामीण भागातील असुन त्यामध्ये ५ माध्यमिक शाळा अनुदानित व ५ माध्यमिक शाळा विना-अनुदानित आहेत. तसेच १० माध्यमिक शाळा शहरी भागातील असून त्यामध्ये ५ माध्यमिक शाळा अनुदानित आणि ५ माध्यमिक शाळा विना-अनुदानित आहेत अशाप्रकारे एकूण अमरावती विभागातील ५ जिल्हयामधून १०० माध्यमिक शाळांची निवड करण्यात आली. त्यामध्ये ५० माध्यमिक शाळा ग्रामीण भागातील आहेत त्यामध्ये २५ माध्यमिक शाळा अनुदानित आणि २५ माध्यमिक शाळा विना-अनुदानित आहेत तसेच ५० माध्यमिक शाळा

शहरी भागातील असून त्यामध्ये २५ माध्यमिक शाळा अनुदानित आणि २५ माध्यमिक शाळा विना-अनुदानित आहेत. या माध्यमिक शाळांची निवड प्रस्तुत संशोधनासाठी करण्यात आली आहे.

कोष्टक क्र. ३.२

संशोधनासाठी न्यादर्श स्वरूपात निवड करण्यात आलेल्या शिक्षकांचे विवरणाचे कोष्टक

जिल्हा	अनुदानित विद्यालय						विना-अनुदानित विद्यालय					
	ग्रामीण		शहरी		एकूण		ग्रामीण		शहरी		एकूण	
	M. T.	F. T	M. T.	F. T	M. T.	F. T	M. T.	F. T	M. T.	F. T	M. T.	F. T
अकोला	१०	१०	१०	१०	२०	२०	१०	१०	१०	१०	२०	२०
वाशिम	१०	१०	१०	१०	२०	२०	१०	१०	१०	१०	२०	२०
अमरावती	१०	१०	१०	१०	२०	२०	१०	१०	१०	१०	२०	२०
यवतमाळ	१०	१०	१०	१०	२०	२०	१०	१०	१०	१०	२०	२०
बुलढाणा	१०	१०	१०	१०	२०	२०	१०	१०	१०	१०	२०	२०
एकूण	५०	५०	५०	५०	१००	१००	५०	५०	५०	५०	१००	१००

M.T.= Male Teachers पुरूष शिक्षक F.T.= Female Teacher महिला शिक्षक

प्रस्तुत संशोधनामध्ये अमरावती विभागातील प्रत्येक जिल्हयामधून अनुदानित शाळामधून २० पुरूष शिक्षक आणि २० महिला शिक्षकांची निवड करण्यात आली आहे. त्यापैकी ग्रामीण भागातील अनुदानित शाळांमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकांमधून १० पुरूष शिक्षक आणि १० महिला शिक्षकांची निवड करण्यात आली तसेच शहरी भागामध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकांमधून १० पुरूष शिक्षक आणि १० महिला शिक्षकांची निवड या संशोधनासाठी यादृच्छिक न्यादर्शन प्रविधीच्या लॉटरी पद्धतीने करण्यात आलेली आहे. तसेच अमरावती विभागातील प्रत्येक जिल्हयामधून विना-अनुदानित शाळामधून २० पुरूष शिक्षक आणि २० महिला शिक्षकांची निवड करण्यात आली आहे. त्यापैकी ग्रामीण भागातील विना-अनुदानित शाळांमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकांमधून १० पुरूष शिक्षक आणि १० महिला शिक्षकांची निवड करण्यात आली तसेच शहरी भागामध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकांमधून १० पुरूष शिक्षक आणि १० महिला शिक्षकांची निवड या संशोधनासाठी करण्यात आलेली आहे.

अशाप्रकारे अमरावती विभागामधील पाच जिल्हयामधून एकूण ४०० शिक्षकांची निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये अनुदानित माध्यमिक शाळांमधून २०० शिक्षकांची निवड करण्यात आली त्यामध्ये १०० पुरूष शिक्षक आणि १०० महिला शिक्षकांचा समावेश करण्यात आला. तसेच ग्रामीण भागामधील अनुदानित माध्यमिक शाळामधून १०० शिक्षकांची निवड करण्यात आली. त्यामध्ये ५० पुरूष शिक्षक आणि ५० महिला शिक्षकांचा समावेश आहे. शहरी भागामधील अनुदानित

शाळामधून एकूण १०० शिक्षकांची निवड करण्यात आली. त्यामध्ये ५० पुरूष शिक्षक आणि ५० महिला शिक्षकांची निवड या संशोधनासाठी करण्यात आली आहे.

अमरावती विभागातील विना-अनुदानित माध्यमिक शाळांमधून २०० शिक्षकांची निवड करण्यात आली. त्यामध्ये १०० पुरूष शिक्षक आणि १०० महिला शिक्षकांचा समावेश करण्यात आला. तसेच ग्रामीण भागामधील विना-अनुदानित माध्यमिक शाळामधून १०० शिक्षकांची निवड करण्यात आली. त्यामध्ये ५० पुरूष शिक्षक आणि ५० महिला शिक्षकांचा समावेश आहे. शहरी भागामधील विना-अनुदानित शाळामधून एकूण १०० शिक्षकांची निवड करण्यात आली. त्यामध्ये ५० पुरूष शिक्षक आणि ५० महिला शिक्षकांची निवड या संशोधनासाठी करण्यात आली आहे. अशा प्रकारे अमरावती विभागातून ग्रामीण व शहरी भागामध्ये कार्यरत असलेल्या अनुदानित विना-अनुदानित माध्यमिक शाळांमधून एकूण ४०० शिक्षकांची निवड गुच्छ न्यादर्शन पद्धतीने करण्यात आली आहे.

३.४.३ संशोधन न्यादर्शन प्रक्रिया :



प्रस्तुत संशोधनामध्ये अमरावती विभागातील माध्यमिक शिक्षकांची निवड संशोधनासाठी करण्यात आली. त्यामध्ये ग्रामीण व शहरी भागातील अनुदानित व विना-अनुदानित माध्यमिक विद्यालयामध्ये कार्यरत असलेले शिक्षक समाविष्ट आहे. एकूण ४०० शिक्षकांचे निर्धारण करून त्यांच्याकडून या संशोधन विषयाच्या संदर्भात त्यांची अध्यापन अभियोग्यता, समायोजन आणि शालेय घटनांमधील वैफल्य यासंदर्भात आवश्यक माहिती संकलीत करण्यात आली. त्यावर विश्लेषण करून संशोधनाच्या संदर्भात निष्कर्ष मांडण्यात आले आणि या मांडण्यात आलेल्या निष्कर्षांचे सामान्यीकरण करण्यात आलेले आहे.

३.५ संशोधनाची साधने :

प्रस्तुत संशोधनामध्ये पुढील साधनांचा वापर करण्यात आला आणि त्यामाध्यमातून आवश्यक सांख्यिकीय माहितीचे संकलन करण्यात आलेले आहे.

३.५.१ अध्यापन अभियोग्यता चाचणी Teaching Aptitude Test Battery :

प्रस्तुत संशोधनामध्ये शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेशी संबंधित माहिती प्राप्त करण्यासाठी सिंग आर. पी. आणि शर्मा एस. एन. यांनी विकसित व प्रमाणित केलेल्या Teaching Aptitude Test Battery चा वापर करण्यात आलेला आहे. या चाचणीचे स्वरूप, रचना, विश्वासनियता, वैधता याचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करण्यात आलेले आहे.

अध्यापन अभियोग्यता चाचणीचा उद्देश :

अध्यापन अभियोग्यता चाचणीच्या माध्यमातून शिक्षकांमध्ये कितपत अध्ययन अध्यापन अभियोग्यता आहे. याचा शोध घेणे हा या चाचणीचा उद्देश्य आहे. सामान्यता ही अध्यापन अभियोग्यता चाचणी २० वर्ष आणि त्यापेक्षा अधिक वयोगटामधील शिक्षकांसाठी वापरली जाऊ शकते. या अध्यापन अभियोग्यता चाचणीला एकूण ५ घटकामध्ये विभाजित करण्यात आलेले आहे त्यासाठी एकूण एकूण १२० विधाने निर्धारित करण्यात आली आहेत. या चाचणीमध्ये निश्चित करण्यात आलेल्या ५ घटकामध्ये शिक्षकांची मानसिक क्षमता, विद्यार्थ्याविषयीचा दृष्टिकोन, समायोजन पटुत्व, व्यावसायिक माहिती आणि व्यावसायिक आवड या घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

अध्यापन अभियोग्यता चाचणीचे स्वरूप :

प्रस्तुत संशोधनासाठी वापरण्यात आलेली अध्यापन अभियोग्यता चाचणी ही हिंदी व इंग्रजी अशा दोन्ही भाषामध्ये उपलब्ध आहे. अध्यापन अभियोग्यता चाचणीचे स्वरूप वैयक्तिक व सामूहिक आहे. प्रस्तुत अध्यापन अभियोग्यता चाचणी मुख्यत्वे भाषिक स्वरूपात असून ती बऱ्याच प्रमाणात संस्कृतिनिष्ठ आहे.

अध्यापन अभियोग्यता चाचणीचे प्रशासन व कार्यन्वयन :

प्रस्तुत अध्यापन अभियोग्यता चाचणीच्या माध्यमातून आवश्यक माहितीचे संकलन करण्यासाठी संबंधित शाळांमध्ये गेल्यानंतर शिक्षकांना पुढील सूचना ही चाचणी सोडविण्याच्या संदर्भात देण्यात आल्या.

१. प्रस्तुत चाचणी ही संशोधनासाठी आवश्यक माहितीचे संकलन करण्यासाठी आहे. या माहितीचा वापर केवळ संशोधनापुरताच करण्यात येईल इतर कोठेही या माहितीचा वापर करण्यात येणार नाही. तसेच प्राप्त झालेली वैयक्तिक माहिती ही पूर्णत: गोपनीय ठेवण्यात येईल.

२. आपणास ही चाचणी स्वत: सोडवायची आहे चाचणीच्या प्रथम पृष्ठावरील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात काही अडचणी असल्यास विचारणा करावी व शंकेचे समाधान करून घ्यावे.

३. शिक्षक अध्यापन अभियोग्यता चाचणीमध्ये दिलेले सर्व विधानांना प्रतिसाद देणे आवश्यक आहे.

४. ही चाचणी सोडवण्यासाठी कालमर्यादेचे बंधन नाही तरी सुध्दा साधारणता ९० मिनिटे वेळ पुरेसा आहे या वेळामध्ये चाचणी पूर्णत: सोडवून द्यावयाची आहे.

अध्यापन अभियोग्यता चाचणीची विश्वसनियता :

प्रस्तुत शिक्षक अध्यापन अभियोग्यता चाचणीची विश्वसनियता वेगवेगळया पध्दतीचा वापर करून मोजण्यात आली आहे.

कोष्टक क्र. ३.३

अध्यापन अभियोग्यता चाचणीची विश्वसनियता दर्शवणारे कोष्टक

विवरण	विश्वसनियता गुणांक
समभाग विभाजन पद्धती Split-half method	**०.९८**
पूर्व चाचणी उत्तर चाचणी Test-Retest Method	**०.९७**
K-R पध्दती	**०.८९**

वरील सारणीवरून शिक्षक अध्यापन अभियोग्यता चाचणीची विश्वसनियता स्पष्ट होते यामध्ये समभाग विभाजन पद्धतीच्या अंतर्गत विश्वसनियता गुणांक ०.९८, पूर्व व उत्तर चाचणीच्या अंतर्गत विश्वसनियता गुणांक ०.९७ आणि K-Rपद्धतीच्या अंतर्गत विश्वसनियता गुणांक ०.८९ आहे. या विश्वसनियता गुणांकाच्या किमतीवरून प्रस्तुत चाचणीची विश्वसनियता उच्च असल्याचे स्पष्ट होते.

अध्यापन अभियोग्यता चाचणीचे गुणांकन :

अध्यापन अभियोग्यता चाचणीचे गुणांकन पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेले आहे त्यामध्ये घटक क्र. १, २, ३, ४, व ५ मध्ये दिलेल्या विधानामध्ये बरोबर उत्तरासाठी १ गुण, तर कोणत्याही चुकीच्या उत्तरासाठी ०० गुण निश्चित करण्यात आलेले आहे. त्याचबरोबर सर्वोत्तम उत्तरासाठी ५ गुण निश्चित करण्यात आलेले आहेत. तर न्युनतम उत्तरासाठी १ गुण निश्चित करण्यात आलेला आहे. अशा प्रकारे सर्व विधानांना प्रतिसादकर्त्याने दिलेल्या प्रतिसादाच्या आधारावर एकूण प्राप्तांक व घटक निहाय प्राप्तांक काढण्यात आलेला आहे. या संशोधनामध्ये शिक्षक अभियोग्यतेचे मापन गुणांकन करण्यासाठी उत्तर सूचिचा (**Scoring Key**) वापर करण्यात आलेला आहे.

३.५.२ शिक्षक समायोजन शोधिका :

प्रस्तुत संशोधनामध्ये शिक्षकांच्या समायोजनाशी संबंधित माहिती प्राप्त करण्यासाठी मंगल एस. के. यांनी विकसित व प्रमाणित केलेल्या Teacher Adjustment Inventory (MTAI) चा वापर करण्यात आलेला आहे. या चाचणीचे स्वरूप, रचना, विश्वसनियता, वैधता याचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत संशोधनामध्ये वापरण्यात आलेल्या शिक्षक समायोजन शोधिकेच्या माध्यमातून शिक्षकांचे त्यांच्या क्षेत्रातील समायोजन कसे घडते आहे याचे मापन करण्यात आलेले आहे. यामध्ये मनोविकाराबद्दलचे समायोजनाचे मापन करणे अपेक्षित नाही. तर शिक्षकीय कार्याशी व क्षेत्राशी शिक्षक कितपत समायोजित झालेला आहे याचा शोध यामाध्यमातून घेणे अपेक्षित आहे.

प्रस्तुत शिक्षक समायोजन शोधिका ही साधारणतः २१ ते ५८ वर्ष वयोगटातील पुरूष व स्त्री शिक्षकांसाठी वापरली जाते. ज्या शिक्षकांचे समायोजन समाधानकारक नाही अशांसाठी हया शोधिकेद्वारे योग्य तो परिणाम निदान प्राप्त केल्यानंतर आवश्यक ते मार्गदर्शन घेण्यासाठी सुचविले जाते.

शिक्षक समायोजन शोधिकेचे स्वरूप :

प्रस्तुत शिक्षक समायोजन शोधिकेचा उपयोग प्रामुख्याने भारतातील शालेय शिक्षक व हिंदी भाषिक असलेले शिक्षक यांच्यासाठी केला गेलेला आहे. ही शोधिका व्दिभाषिक आहे, म्हणजे इंग्रजी व हिंदी भाषेमध्ये उपलब्ध आहे. या शोधिकेमध्ये एकूण २५३ विधाने आहेत ही शोधिका वैयक्तिक व सामूहिक अशा दोन्ही स्वरूपात देता येते. पूर्णतः शाब्दिक स्वरूपातील ही शोधिका मुख्यत्वे

संस्कृतिनिष्ठ आहे. तिचा पाया हिंदी भाषिक प्रदेशातील शिक्षक हाच आहे ही चाचणी वापरताना पुढील बाबी विचारात घेण्यात आल्या आहेत.

१. प्रस्तुत शोधिकेच्या माध्यमातून शिक्षकाकडून माहिती प्राप्त करण्याचा उद्देश्य स्पष्ट करण्यात आला.

२. या शोधिकेच्या प्रथम पृष्ठावरील माहिती प्रतिसादकर्त्या शिक्षकांना वाचण्याची सूचना देण्यात आली. त्यांना असलेल्या अडचणी निरसन करण्याची ग्वाही देण्यात आली.

३. शोधिकेमध्ये असलेल्या सर्व विधानांना प्रतिसाद देणे आवश्यक आहे.

शिक्षक समायोजन शोधिकेची विश्वसनियता :

प्रस्तुत संशोधनासाठी वापरण्यात आलेल्या शिक्षक समायोजन शोधिकेची विश्वसनियता तपासण्यात आलेली आहे त्यामध्ये उपयोजन पुनरोपयोजन व समार्ध पद्धतीव्दारे मिळालेला विश्वसनियता गुणांक ०.९९ आहे. याचा अर्थ असा की या शिक्षक समायोजन शोधिकेची विश्वसनियता उच्च दर्जाची आहे.

शिक्षक समायोजन शोधिकेची वैधता :

प्रस्तुत संशोधनासाठी वापरण्यात आलेल्या शिक्षक समायोजन शोधिकेची वैधता तपासण्यात आली आहे. त्यासाठी आशय वैधता, सैध्दांतिक वैधता आणि निकषसंबंधित वैधता या निकषांचा वापर करण्यात आलेला आहे. निकष संबंधित वैधता मोजताना बेल यांच्या समायोजन शोधिकेचा उपयोग करण्यात आलेला आहे. त्यानुसार मोजण्यात आलेली वैधता ०.९६७ आहे.

शिक्षक समायोजन शोधिकेचे गुणदान :

पुरूष आणि महिला अशा दोन्ही प्रकारच्या शिक्षकासाठी या शोधिकेचा वापर करण्यात आलेला आहे. या शोधिकेमध्ये गुणदान करण्यासाठी होय, नाही, अनिश्चित या पर्यायांची निश्चिती करण्यात आलेली आहे. त्यामध्ये प्रतिसादानुसार समायोजनासाठी २ गुण, अनिश्चितसाठी १ गुण, आणि समायोजनाचा अभाव असल्यास ०० गुण, याप्रमाणे प्रत्येक विधानाचे गुणांकन करण्यात आले आहे. या शिक्षक समायोजन शोधिकेमधील विधान निहाय गुणांचे विश्लेषण पुढील सारणीमध्ये देण्यात आले आहे.

कोष्टक क्र. ३.४

शिक्षक समायोजन शोधिकेचे गुणदान दर्शवणारे कोष्टक

विधानांचे विवरण	होय	अनिश्चित	नाही
४४,५३,५७,६१,७५,७६,८३,८७,८८,९०,९१,९२,९३,९४,१०१, १०२,१०३,११०,१११	२		
१८२,१८९,१९२,१९६,२०३,२०७		१	
११७,११८,११९,१२३,१२४,१२६,१३७,१४०,१४५,१४८,१५४, १५७,१६,१६७,१७६,१८१			००
उर्वरित २१२ विधानांसाठी	००	१	२

अशा प्रकारे गुणांकन केल्यास दोन प्रकारचे प्राप्तांक प्राप्त होतात. त्यामध्ये घटका प्रमाणे वा क्षेत्राप्रमाणे प्राप्तांक व एकूण समायोजन प्राप्तांक अशा प्रकारे क्षेत्रानुसार वा घटकानुसार गुणदान केल्यावरच एक निश्चित एकत्रित प्राप्तांक मिळू शकतो. तो प्रत्येक क्षेत्रानुसार मिळालेल्या प्राप्तांकाची बेरीज असते. पुढील सारणीमध्ये कोणत्या घटकांसाठी कोणती विधाने निश्चित करण्यात आली आहे याचे विश्लेषण देण्यात आलेले आहे.

कोष्टक क्र. ३.५

समायोजन शोधिकेचे घटक निहाय विधान क्रमांक, घटक निहाय विधानांची संख्या, घटक निहाय उच्चतम व निम्नतम प्राप्तांकाचे विवरण दर्शवणारे कोष्टक

अ.क्र	समायोजनाचे घटक	विधान क्रमांक	एकूण विधानांची संख्या	उच्चतम प्राप्तांक	निम्नतम प्राप्तांक
१	संस्थेच्या शैक्षणिक व सामान्य वातावरणाशी समायोजन	१ ते ४४ २०३ ते २२३	६५	१३०	००
२	सामाजिक, मानसशास्त्रीय व शारीरिक समायोजन	४५ ते ९५ २२४ ते २५३	८१	१६२	००
३	व्यावसायिक नातेसंबंधाशी समायोजन	९६ ते १३४ २०३ ते २१२	४९	९८	००
४	व्यक्तिगत जीवनातील समायोजन	१३५ ते १६७ २१३ ते २५३	७४	१४८	००
५	आर्थिक समायोजन व कार्यक्षेत्राचे समाधान	१६८ ते २०२	३५	७०	००
	एकूण		३०४	६०८	००

३.५.३ शालेय घटना मधील शिक्षकांची वैफल्य चाचणी :

शालेय घटनांमधील शिक्षकांच्या वैफल्याचा अभ्यास करण्यासाठी गोयल एम. के. यांनी विकसित व प्रमाणित केलेल्या शालेय घटनांमधील वैफल्यास शिक्षकांच्या प्रतिक्रियांचे मापन **Teacher Reaction to frustration in school situation** या चाचणीचा वापर करण्यात आलेला आहे.

शिक्षकांच्या जीवनात अनेक वेळा संघर्षाची परिस्थिती निर्माण होते. ही परिस्थिती बरेचदा गरजांची पूर्तता न झाल्यामुळे निर्माण होते. अशा वेळी शिक्षक ज्या मानसिक परिस्थितीचा अनुभव घेतो त्याचा अभ्यास करणे मानसशास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. त्यामुळे व्यक्तिवर्तनाचा उलगडा होण्यास मदत होते. हया चाचणीद्वारे चित्रांच्या मदतीने शिक्षकांच्या मनातील वैफल्याचे मापन केलेले आहे. ही चाचणी २१ ते ५० वर्ष वयोगटातील शिक्षकांवर वापरली जाऊ शकते.

रोझेनविग हयांनी वैफल्याशी निगडित असलेल्या मानवी परिस्थितीचा चांगल्या प्रकारे अभ्यास केलेला आहे. त्यातूनच त्यांनी आक्रमकता व वैफल्यग्रस्त परिस्थिती याविषयीचा आपला सिध्दांत मांडलेला आहे. या संदर्भात सखोल संशोधन करीत असताना व्यक्तिमत्त्व मापनासाठी रोझेनविग यांनी एक तंत्र विकसित केले. त्यास त्याने चित्रवैफल्य अभ्यास Picture frustration study हे नाव दिले. हया तंत्राद्वारे त्यांनी शाब्दिक साहचर्य चाचणी World Association व कथावस्तू प्रबोध चाचणी TAT हया दोहोचा मिलाफ साधलेला आहे. हया तंत्रातून दोन प्रकारचे फायदे होतात. एक म्हणजे शिक्षकाला स्वत:ची ओळख व स्वत:च्या व्यक्तिमत्त्वविषयक प्रतिक्रियांचा शोध घेता येतो. तसेच विविध परिस्थितीशी शिक्षकांचा असलेला आप्तसंबंध स्पष्ट होतो. प्रस्तुत चाचणीत गोयल एम. के. यांनी हयाच तंत्राचा वापर करून शिक्षकांच्या प्रतिक्रियांचे मापन करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

शालेय घटनांमधील शिक्षकांचे वैफल्य चाचणीची उद्दिष्टये :

प्रस्तुत शालेय घटनांमधील शिक्षकांच्या वैफल्य चाचणीची प्रमुख दोन उद्दिष्टये आहेत त्यामध्ये शालेय विश्वातील सर्वसामान्य वैफल्याशी निगडित घटनांचा शोध घेणे आणि विविध शाळांमधील वैफल्यग्रस्त शिक्षकांनी दिलेल्या प्रतिक्रिया जाणून घेणे.

शालेय घटनांमधील शिक्षकांचे वैफल्य चाचणीचे स्वरूप :

शालेय घटनांमधील शिक्षकांचे वैफल्य ही चाचणी प्रक्षेपन तंत्राचा एक भाग आहे. ती अशाब्दिक स्वरूपातील काही चित्रे प्रतिसादकर्त्यासमोर ठेवते व त्यावरील प्रयुक्तांची प्रतिक्रिया लिखित स्वरूपात मागते. ही चाचणी प्रामुख्याने वैयक्तिक तसेच सामूहिक स्वरूपातही वापरता येते. परंतु वैयक्तिकरित्या तिचा वापर करणे अधिक संयुक्तिक व उपयुक्त ठरते. ही चाचणी प्राधान्याने संस्कृतिनिष्ठ आहे. शैक्षणिक क्षेत्राशी संबंधित कोणतीही सुज्ञ व्यक्ती हया चाचणीचे आयोजन करू शकते. चाचणीचे प्रशासन करते वेळी काही प्रमुख बाबी उपयोजन कर्त्याने लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

शालेय घटनांमधील शिक्षकांचे वैफल्य चाचणीचे प्रशासन :

प्रतिसादकर्त्याची मानसिक स्थिती योग्य असेल तरच चाचणीचे कार्यन्वयन करण्यात यावे अन्यथा नाही. ज्या व्यक्ती शालेय जीवनाशी संबंधित आहेत अथवा शाळेत काम करीत आहेत त्यांचेसाठी हया चाचणीचा उपयोग त्यांचे शालेय घटनांमधील वैफल्याचे मापन करण्यासाठी करण्यात यावा. चाचणी सोडवण्यास सुरूवात करण्यापूर्वी या चाचणीची संपूर्ण माहिती प्रयुक्तास देण्यात आली. तसेच चाचणीमध्ये उल्लेख नसलेल्या काही घटनांची उदाहरणे प्रतिसादकर्त्यास देण्यात आली. तसेच ही चाचणी कशाप्रकारे सोडवायची यांच्या सूचना करण्यात आल्या. प्रमुख सूचना पुढीलप्रमाणे-

१. या चाचणीच्या प्रश्नसंचावर देण्यात आलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
२. चाचणीमध्ये एकूण २४ विविध घटनांशी संबंधित चित्रे दिलेली आहेत. त्या सर्वांची उत्तरे तुम्हाला द्यावयाची आहेत.
३. प्रत्येक चित्रात दोन व्यक्ती एकमेकांना काही सांगत आहेत त्यातील एका व्यक्तीचे विचार लिखित स्वरूपात प्रश्नसंचात मांडलेले आहेत. चित्रातील दुसऱ्या व्यक्तीच्या जागी आपण स्वतः आहोत अशी कल्पना करून आपल्या मनात प्रथम जे विचार येतील ते लिखित स्वरूपात तेथे नोंदवायचे आहेत.
४. विचारपूर्वक प्रतिक्रिया नको तर प्रथमता जी प्रतिक्रिया मनामध्ये आली तीच प्रतिक्रिया नोंदवणे आवश्यक आहे. म्हणजे सुरूवातीला जे उत्तर आपल्या मनात आले तेच लिहावे. यावर कोणतीही खाडाखोड करणे वा दुसरे लिखाण करणे टाळावे. आपली प्रतिक्रिया स्पष्ट व सुटसुटीत भाषेत लिहावी. साधारण एका वाक्यापेक्षा आपले उत्तर मोठे नसावे. काही घटनांचे

आकलन होण्यास प्रायोजकाला अडचण निर्माण झाली तर उपयोजकास आपल्या मनातील शंका जरूर विचारावी.

५. आपली प्रतिक्रिया स्पष्ट व सुटसुटीत भाषेत लिहावी. साधारण एका वाक्यापेक्षा आपले उत्तर मोठे नसावे.

६. काही घटनांचे आकलन होण्यास प्रयोजकाला अडचण निर्माण झाली तर उपयोजकास आपल्या मनातील शंका जरूर विचारावी.

७. हया चाचणीस वेळेचे कसलेही बंधन नाही परंतु शक्य तितक्या लवकर ती सोडविण्याचा प्रयत्न करावा. संथ प्रतिक्रिया देणारा असला तरी चाचणीसाठी ३५ ते ४० मिनिटे हा कालावधी पुरेसा आहे.

शालेय घटनांमधील शिक्षकांचे वैफल्य चाचणीचे प्रमाणीकरण :

प्रस्तुत शालेय घटनांमधील शिक्षकांचे वैफल्य चाचणीच्या संशोधनाच्या वेळी विकासकाने अनेक तज्ज्ञांशी विचारविनिमय केलेला आहे. तसेच तज्ज्ञांची मदत घेऊन तिचे प्रमाणीकरणही करण्यात आलेले आहे. आपल्या भारत देशात शिक्षकांची संख्या मोठया प्रमाणात आहे. तसेच ते ग्रामीण, डोंगरी व शहरी भागामध्ये विखुरलेले आहेत. विविध प्रकारच्या म्हणजे माध्यमिक, प्राथमिक, खाजगी, शासकीय शाळांमध्ये ते विखुरलेले आहेत. तसेच हे शिक्षक रोजच्या जीवनात विद्यार्थी, सहाध्यायी, मुख्याध्यापक, प्रशासकीय व्यवस्थापक इत्यादी विविध घटनामुळे वैफल्यग्रस्त परिस्थितीशी सामाना करीत असतात.

शालेय घटनांमधील शिक्षकांचे वैफल्य चाचणीची विश्वसनियता व वैधता :

चाचणीची विश्वसनियता मोजते वेळी दोन बाहय परीक्षकांची मदत घेण्यात आली. त्यासाठी उपयोजन पुरोपयोजन Test-Retest पद्धतीचा वापर करण्यात आला होता. त्यानुसार मिळालेली विश्वसनियता ०.१४६ते ०.०८१२ दरम्यानची होती. घटकांची विश्वसनीयताही अंतर्गत सातत्य गुणकाच्या Co-efficient of consistency आधारे मोजण्यात आलेली आहे. चाचणीची वैधता मोजण्यासाठी विद्यमान वैधतेचा Concurrent Validity वापर करण्यात आलेला आहे. त्याचबरोबर सैध्दांतिक वैधता, पूर्वकथन वैधता याचाही वापर करण्यात आलेला आहे.

शालेय घटनांमधील शिक्षकांचे वैफल्य चाचणीच्या प्रमाणकांची निश्चिती :

विविध प्राप्तांकाच्या वर्गवारीनुसार चाचणीची प्रमाणके ठरविलेली आहेत. तसेच शाळांच्या विविध स्तरानुसार विविध प्रकारच्या शिक्षकांसाठीची प्रमाणके प्रमाणित विचलनानुसार तयार केलेली आहेत. या प्रमाणकांची समर्पकता मोठया प्रमाणात सिद्ध झाली आहे. गुणांकन करते वेळी रोझेनविगने जी पद्धती अवलंबलेली होती तिचाच वापर या चाचणीसाठी केलेला आहे. त्याने वर्णन केल्यानुसार आक्रमकता ज्या तऱ्हेने प्रदर्शित केली जाते त्यावरून Extra Punitiveness बाहय जळफळाट हा E या अक्षराने दर्शविला आहे तर Intropunitiveness अंतर्गत जळफळाट हा I या अक्षराने आणि Impunitiveness निरीच्छपणा M हया अक्षराने दर्शविला जातो. त्याचप्रमाणे वैफल्यासाठी ज्या प्रतिक्रिया दिल्या जातात त्याही तीन प्रकारच्या आहेत. ज्यामध्ये अडथळयांचे वर्चस्व Obstacle Dominance O-D अहम-संरक्षण Ego-defense E-D व गरज-सातत्य Need pessistence N-P त्यांचा आधार घेऊन प्रयुक्ताने दिलेल्या प्रतिक्रियांनुसार त्याचे गुणांकन केले जाते. या विविध प्रकारांचे विवेचन पुढीलप्रमाणे आहे.

१. अडथळा वर्चस्व O-D व्यक्तीच्या प्रतिक्रियांमध्ये विविध प्रकारचे अडथळे उद्‌भवल्याने वैफल्य निर्माण होते.
२. अहम संरक्षण E-D यामध्ये व्यक्तीचा अहम त्यांच्या प्रतिक्रियांवर वर्चस्व गाजवीत असतो.
३. गरज सातत्य N-P यामध्ये वैफल्यासाठीचे जे कारण आहे, तेच त्या अडचणीसाठी महत्त्वाचे ठरते व त्याचे उत्तर अधिक महत्त्वाचे मानले जाते.

आक्रमकतेचे मार्ग :

१. अधिक आक्रमकता Extra aggression यामध्ये एखाद्या व्यक्तीवर किंवा परिसरातील वस्तु सर्व दोष, आक्रमकता दर्शविण्याची सवय दिसून येते. सर्व चुकांचे खापर दुसऱ्याच्या माथी मारण्याचा प्रयत्न होतो.
२. Intro aggression I-A यामध्ये व्यक्ती स्वत:वरच सर्व आक्रमकता ओढून घेते. सर्व चुकांना स्वत:लाच जबाबदार धरते.
३. Imgression यामध्ये वैफल्यातून मार्ग काढण्यासाठी व्यक्ती आक्रमकतेचाच वापर करते. आक्रमक बनून पराभव टाळण्याची व्यक्तीची वृत्ती असते.

गुणांकन करते वेळी अडथळा-वर्चस्व E,I व M यापैकी एक अक्षर त्यांचे डोक्यावर (I) हे चिन्ह करून लिहिले जाते, तर अहम-संरक्षणाविषयी लिहताना, E, I व M हे कॅपिटल अक्षरात तर गरज-सातत्य दर्शविण्यासाठी ही अक्षरे लहान/दुसऱ्या लिपीत e,i,m अशी दर्शविली जातात.

कोष्टक क्र. ३.६

अडथळा-वर्चस्व आणि योग्य मार्ग, अहंम-संरक्षण आणि योग्य मार्ग आणि गरज-सातत्य आणि योग्य मार्ग यांची अक्षरे दर्शवणारे कोष्टक

अडथळा-वर्चस्व आणि योग्य मार्ग	अहम-संरक्षण आणि योग्य मार्ग	गरज-सातत्य आणि योग्य मार्ग
E', I' किंवा M'	E, I किंवा M	e, i किंवा m

कोष्टक क्र. ३.७

शालेय घटनांमधील शिक्षकांचे वैफल्य चाचणीमधील विविध रचना दर्शवणारे कोष्टक

		वैफल्याच्या विविध प्रतिक्रियांचे प्रकार			
		O-D	E-D	N-P	
आक्रमकतेचे मार्ग	(E-A)	E'	E	e	Extra
	(I-A)	I'	I	i	Intro
	(M-A)	M'	M	m	Im
		Pedative	Punitive	Persistive	

वरील सारणीमध्ये निर्धारित करण्यात आलेल्या शालेय घटनांमधील शिक्षकांच्या वैफल्याच्या संदर्भात प्रत्येक अक्षराचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करण्यात आलेले आहे.

१. अडथळा-वर्चस्व प्रतिक्रिया :

१) E' (Extra pedative) वैफल्याशी निगडित अडथळा प्रयुक्ताने प्रकर्षाने केंद्रित केलेला दिसून येतो.

२) I' (Intropedative) जो अडथळा असतो तोच काही वेळेला फायदेशीर ठरतो. यातून प्रगतीचा मार्ग दिसतो.

३) M' (Impedative) अडथळा असूनही वैफल्यग्रस्त परिस्थितीशी त्याचा संबंध नगण्य असतो.

२. अहम-संरक्षण प्रतिक्रिया :

१) E (Extra Punitive) दोष किंवा इतरांसंबधीचा द्वेष हया गोष्टी त्या व्यक्तीभोवती किंवा परिसरातील वस्तूभोवती केंद्रित झालेल्या असतात.

२) I (Intro Punitive) व्यक्ती स्वत:वरच दोष ओढवून घेते.

३) M (Impunitive) वैफल्यग्रस्त परिस्थिती निमूटपणे स्वीकारली जाते व ती नाकारणे शक्य नाही अशी समजूत करून घेतली जाते.

३. गरज-सातत्य प्रतिक्रिया :

१) e (Extropersistive) दुसऱ्याकडून परिस्थितीबद्दलचे उत्तर शोधण्याची अपेक्षा हयामध्ये दिसून येते. दुसऱ्याने दु:ख दूर करावे अशी मनोवृत्ती दृष्टोत्पत्तीस येते.

२) i (Intropersistive) व्यक्तीकडून अडचणीबद्दलचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला जातो. हयाच वेळी अडचणी निर्माण झाल्याबद्दल व्यक्तीला स्वत:ची खूप शरम वाटत असते.

३) m (Impersistive) काळानुसार किंवा अडचणीतून मार्ग निघेल अशी आशादायी मनोधारणा ठेवली जाते. यामध्ये व्यक्तीची सहनशीलता दिसून येते. काळ हेच अडचणीवरील औषध मानले जाते. याचप्रमाणे (E) विवेकाला व I विवेकनिष्ठ अहम घटक I याचाही उल्लेख गुणांकन करते वेळी विचारात घेतला पाहिजे.

वरील रचनेत पहिल्या पद्धतीत व्यक्ती आक्रमकरितीने स्वत:कडून घडलेल्या गुन्हयाविषयी स्वत:चा नकार दर्शविते. म्हणजे दुसऱ्यामुळे गुन्हा घडला असे म्हणणे तर दुसऱ्या पद्धतीत व्यक्ती स्वत:चे गैरवर्तन मान्य करते पण घडलेल्या चुकीस, आजूबाजूची परिस्थितीच प्रामुख्याने कारणीभूत आहे असे ठाम मत मांडते.

शालेय घटनांमधील वैफल्य चाचणीचे गुणांकन :

अशा प्रकारे गुणांकन करते वेळी सर्व प्रकार व परिस्थिती बारकाईने लक्षात घेणे आवश्यक असते. अनेक वेळा प्रतिक्रिया अस्पष्ट असल्यास निश्चित असे गुणदान करता येत नाही. अशा वेळी ती प्रतिक्रियाच विचारात घेऊ नये. त्याचप्रमाणे प्रयुक्ताच्या प्रतिक्रियेविषयी कोणतीही शंका असल्यास निश्चित अहवाल देण्यापूर्वी प्रयुक्ताशी प्रत्यक्ष व आमनेसामने चर्चा करावी. गुणांकन व्यवस्थेत

करण्यासाठी काही नमुना उदाहरणे चाचणीच्या पुस्तिकेत दिलेली आहेत त्याचा उपयोग करण्यात आला आहे.

प्रयुक्ताचे गुणांकन पत्र ५ भागामध्ये विभाजित करण्यात आलेले आहे.

१. प्रतिसादकर्त्याविषयीची प्राथमिक माहिती.

२. घटकांनुसार प्राप्तांकासाठीची सारणी.

३. प्रोफाईल-विचलन संरचना यामध्ये आक्रमकतेचे मार्ग व वैफल्यास असलेल्या प्रतिक्रिया यांचा उल्लेख करण्यात आला.

४. विविध प्रकारचे प्रतिसाद अक्षरांनुसार दर्शविण्यात आलेले आहेत.

५. विचारप्रवाह-मतप्रवाह Trends म्हणजे प्रयुक्त एका विशिष्ट मतप्रवाहाकडून दुसरीकडे वळला तर त्याची माहिती यावरूनच कळते. मतप्रवाह मोजण्यासाठीचे एक सूत्रही दिलेले आहे जसे a=पहिल्या अर्ध्या भागासाठीचे घटक व त्याची बेरीज चित्र क्र. १३ ते २४ a+b/a+b यानुसार मतप्रवाह मोजले जातात.

शालेय घटनांमधील वैफल्य चाचणीचे अर्थनिर्वचन :

त्यानंतर E-A मध्ये जास्त प्राप्तांक आढळल्यास दुसऱ्याला दोष देण्याची किंवा परिस्थितीतील एखाद्या घटकास दोष देण्याची प्रयुक्ताची सवय दिसून येते. I-A या प्रकारात दोष मान्य करण्याची व त्या संदर्भात स्वत:वर काही कृती करण्याचा स्वभाव दिसून येतो, तर M-A यामध्ये उच्च प्राप्तांक दिल्यास वैफल्ययुक्त परिस्थितीत सहनशक्तीच्या सर्वोच्च मर्यादेपर्यंत जाण्याची प्रयुक्त सवय दिसून येते.

वरीलप्रमाणे व्यक्तीच्या प्राप्तांकावरून तिच्याविषयीच्या स्वभावरचनेचे निश्चित विवेचन अहवालात केले जाते.

शालेय घटनांमधील वैफल्य चाचणीच्या बाबतीत समुहाविषयीचे मान्यताप्राप्त पदनिश्चयन :

समुहाविषयीचे मान्यताप्राप्त पदनिश्चयन Rating पुढे दिलेले आहे. त्याचा उपयोग प्रस्तुत संशोधनामध्ये करण्यात आलेला आहे.

कोष्टक क्र. ३.८

शालेय घटनांमधील वैफल्य चाचणीच्या बाबतीत समुहाविषयीचे मान्यताप्राप्त पदनिश्चयन दर्शवणारे कोष्टक

घटना क्र.	Protocol शिष्टाचार दर्जा	घटना क्र.	Protocol शिष्टाचार दर्जा
१	E	१३	e or m
२	E or m	१४	E
३	M	१५	M
४	M	१६	E, or E
५	E or m	१७	E
६	E	१८	M or m
७	E or M	१९	E or i
८	E	२०	E' or m
९	i	२१	E' or E
१०	M	२२	E' or E
११	E or E	२३	E or i
१२	M	२४	E or m

वरीलप्रमाणे प्रयुक्तास प्राप्तांक देऊन त्याची किंमत शतांशापर्यत काढायची आहे. विविध प्रमाणकांचा आधार घेऊन गुणदान करण्यात आलेले आहे. त्यासाठी चाचणीमध्ये दिलेल्या विविध प्रमाणकांचा अभ्यास करण्यात आला

३.६ पथदर्शी अभ्यास :

प्रस्तुत संशोधनामध्ये वापरण्यात आलेली संशोधन साधने योग्य प्रकारे कार्यान्वित होत आहेत काय? प्रत्यक्षता चाचण्या सोडविताना काही अडचणी येत आहेत काय? जर काही अडचणी येत असतील तर त्याची सोडवणूक करता यावी. तसेच संशोधन साधनांच्या माध्यमातून प्राप्त होणारी माहिती व्यवहार्य आहे किंवा नाही यासाठी प्रस्तुत संशोधनासाठी वापरण्यात आलेल्या साधनांचा पथदर्शी अभ्यास करण्यात आलेला आहे. या संशोधनाच्या पथदर्शी अभ्यासाच्या अंतर्गत माध्यमिक स्तरावरील ५० शिक्षकांची निवड करण्यात आली आहे. या निवड करण्यात आलेल्या ५० माध्यमिक शिक्षकाकडून अध्यापन अभियोग्यता, समायोजन आणि शालेय घटनांच्या संदर्भातील वैफल्य यासंदर्भात आवश्यक माहिती प्राप्त करण्यात आली. प्राप्त झालेल्या माहितीवर सांख्यिकीय प्रक्रिया करण्यात आली त्यामध्ये

मध्यमान, प्रमाण विचलन आणि सहसंबंध गुणांक या आधारावर या संशोधनाच्या पथदर्शी अभ्यासाच्या अंतर्गत प्राप्त माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण करण्यात आलेले आहे त्याचे विश्लेषण पुढीलप्रमाणे.

सारणी क्र. ३.९

माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेचे विवरण दर्शवणारी सारणी.

समुह		घटक क्र. I	घटक क्र. II	घटक क्र. III	घटक क्र. IV	घटक क्र. V	एकूण
एकूण शिक्षक	M=	१६.०९	११.३९	१५.७९५	२१.९५०	७.६४५	७१.७६
	SD=	७.१५१	५.७५६	५.२८३	५.२२७	२.४६२	१६.४८
ग्रामीण एकूण शिक्षक	M=	१६.९००	१४.०२०	१५.६५०	२१.६६०	७.१७०	७४.२०
	SD=	७.२२०	३.६९४	५.८११	५.७१२	२.६७८	१७.५०
शहरी एकूण शिक्षक	M=	१५.२८०	८.७७०	१५.९४०	२२.२४०	८.१२०	६९.२५
	SD=	७.००६	६.२३९	४.७०६	४.६८९	२.१२७	१५.०७
अनुदानित शाळांमधील शिक्षक	M=	१६.३७०	१२.७००	१६.२६०	२२.४९०	७.८२०	७४.५४
	SD=	६.७३९	४.७५६	४.५४२	४.०८५	२.२२५	११.८९
ग्रामीण अनुदानित शाळांमधील शिक्षक	M=	१६.७८०	१४.८८०	१६.०४०	२२.२८०	७.२६०	७६.१२
	SD=	७.३४७	२.८०४	५.६१०	४.२२६	२.४४३	१३.२९
शहरी अनुदानित शाळांमधील शिक्षक	M=	१५.९६०	१०.५२०	१६.४८०	२२.७००	८.३८०	७३.०२
	SD=	६.०८०	५.२९२	३.१४७	३.९५०	१.८३०	९.५१
विना-अनुदानित शाळांमधील शिक्षक	M=	१५.८१०	१०.०९०	१५.३३०	२१.४१०	७.४७०	६९.०१
	SD=	७.५४७	६.३५४	५.९०७	६.१२४	२.६७२	१९.७६
ग्रामीण विनाअनुदानित शाळांमधील शिक्षक	M=	१७.०२०	१३.१६०	१५.२६०	२१.०४०	७.०८०	७२.२३
	SD=	७.१२५	४.२५१	६.००९	६.८५१	२.९०४	२०.४१
शहरी विना-अनुदानित शाळांमधील शिक्षक	M=	१४.६००	७.०२०	१५.४००	२१.७८०	७.८६०	६५.३३
	SD=	७.७९५	६.६३७	५.८३२	५.३०७	२.३६९	१८.१९

सारणी क्र. ३.१०

माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यता विविध घटकांशी असलेल्या सहसंबंधाचे विवरण दर्शवणारे कोष्टक

घटक	घटक क्र. I	घटक क्र. II	घटक क्र. III	घटक क्र. IV	घटक क्र. V	एकूण
घटक क्र. १	--	.३११**	.१७९**	.३००**	.२५१**	.६८७**
घटक क्र. २		--	.२९६**	.१५२**	.१३८**	.६०८**
घटक क्र. ३			--	.५४२**	.५७६**	.७१२**
घटक क्र. ४				--	.६६५**	.७२५**
घटक क्र. ५					--	.६५८**
एकूण						--

वरील सारणीमध्ये माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेचा त्यांच्या विविध घटकांशी असलेल्या सहसंबंधाचा अभ्यास पथदर्शी अभ्यासाच्या अंतर्गत करण्यात आला आहे. त्यामध्ये या सहसंबंधावरून स्पष्ट होते की, माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेच्या विविध घटकांमध्ये उच्च सार्थक सहसंबंध आहे.

निष्कर्ष :

अध्यापन अभियोग्यतेच्या प्रत्येक घटकामध्ये होणारा बदल हा अन्य घटकामधील बदलाच्या स्वरूपात असल्याचे दिसून येते.

सारणी क्र. ३.११

माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या समायोजनाचे विवरण दर्शवणारी सारणी.

समुह		घटक क्र. I	घटक क्र.II	घटक क्र. III	घटक क्र. IV	घटक क्र. V	एकूण
एकूण शिक्षक	M=	८३.०२०	११९.१७०	७०.३७०	११५.८०५	५१.८४०	४३९.७५०
	SD=	१९.६५६	२७.६२४	१४.६९५	२१.३१६	११.२२४	६९.८७२
ग्रामीण एकूण शिक्षक	M=	८३.३५०	१२३.५१०	७३.१२०	११६.९९०	५३.१००	४५०.०७०
	SD=	२०.६२७	२१.८४४	१४.१४२	१९.१६०	११.१६४	६९.२८५
शहरी एकूण शिक्षक	M=	८२.६९०	११४.८३०	६७.६२०	११४.६२०	५०.५८०	४२९.४३०
	SD=	१८.६८१	३१.८५९	१४.७५६	२३.२६२	११.१६९	६९.०९६
अनुदानित शाळांमधीलशिक्षक	M=	८६.२१०	१२२.६००	७४.६४०	११३.६२०	५२.८१०	४४९.८८०
	SD=	१६.७७०	२०.७५५	१३.४०४	१९.९७०	११.२६०	६५.७६०
ग्रामीण अनुदानित शाळांमधील शिक्षक	M=	८६.१००	१२०.६४०	७५.१४०	११३.६००	५३.०८०	४४८.५६०
	SD=	१७.००७	२०.८५७	१३.४०१	१९.७८८	११.९९६	६९.०१०
शहरी अनुदानित शाळांमधील शिक्षक	M=	८६.३२०	१२४.५६०	७४.१४०	११३.६४०	५२.५४०	४५१.२००
	SD=	१६.६१५	२०.५७०	१३.४५७	२०.२५०	१०.५२५	६२.६६१
विना-अनुदानित शाळांमधील शिक्षक	M=	७९.८३०	११५.७४०	६६.१००	११७.९९०	५०.८७०	४२९.६२०
	SD=	२१.७४८	३२.७९६	१४.७१८	२२.४२०	११.१३१	७२.५१३
ग्रामीण विना अनुदानित शाळांमधील शिक्षक	M=	८०.६००	१२६.३८०	७१.१००	१२०.३८०	५३.१२०	४५१.५८०
	SD=	२३.४६८	२२.५२८	१४.६३५	१७.९७६	१०.३२७	६९.८७३
शहरी विना-अनुदानित शाळांमधील शिक्षक	M=	७९.०६०	१०५.१००	६१.१००	११५.६००	४८.६२०	४०७.६६०
	SD=	१९.९७१	३७.७६१	१३.०६७	२५.९९४	११.४९७	६८.६५०

कोष्टक क्र. ३.१२

माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या समायोजनाचा त्यांच्या विविध घटकांशी असलेल्या सहसंबंधाचे विवरण दर्शवणारे कोष्टक

घटक	घटक क्र. I	घटक क्र. II	घटक क्र. III	घटक क्र. IV	घटक क्र. V	एकूण
घटक क्र. १	--	.२९८**	.४९३**	.४३९**	.४१३**	.६९६**
घटक क्र. २		--	.४५५**	.४३१**	.२९३**	.७४७**
घटक क्र. ३			--	.५०७**	.५८०**	.७६९**
घटक क्र. ४				--	.५५५**	.७९०**
घटक क्र. ५					--	.६७९**
एकूण						--

वरील कोष्टकामध्ये माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या समायोजनाचा त्यांच्या समायोजनाच्या विविध घटकांशी असलेल्या सहसंबंधाचा अभ्यास पथदर्शी अभ्यासाच्या अंतर्गत करण्यात आला आहे. त्यामध्ये माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या समायोजनाच्या संदर्भात प्रत्येक घटकांचा अन्य समायोजनाच्या घटकांशी उच्च सार्थक सहसंबंध आढळून आला.

निष्कर्ष :

माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या समायोजनाच्या एका घटकाचा अन्य घटकांशी सार्थक सहसंबंध असल्याचे दिसून येते.

सारणी क्र. ३.१३

माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचे शालेय घटनांमधील वैफल्याचे विवरण दर्शवणारी सारणी.

समुह		घटक क्र. I	घटक क्र. II	घटक क्र. III	घटक क्र. IV	घटक क्र. V	घटक क्र. VI	एकूण
एकूण शिक्षक	M=	४३.७६०	२७.१०२	४०.१७५	२८.७३०	५१.५१७	२९.५३५	३६.७३५
	SD=	१५.९१७	१६.००८	१५.९९५	१६.६९२	१७.५६७	१६.०७८	१६.०७८
ग्रामीण एकूण शिक्षक	M=	४३.३०५	२६.१८०	३९.८१५	२८.०७०	५१.१४५	२८.७३५	३६.०९०
	SD=	१६.१५९	१५.९७४	१६.२५६	१६.८६१	१७.८४५	१६.१६२	१६.२०५
शहरी एकूण शिक्षक	M=	४४.२१५	२८.०२५	४०.५३५	२९.३९०	५१.८९०	३०.३३५	३७.३८०
	SD=	१५.६९८	१६.०२९	१५.७६३	१६.५३७	१७.३२१	१५.९९५	१५.९६५
अनुदानित शाळांमधील शिक्षक	M=	४५.०१०	२८.९१०	४१.७६५	३०.७५०	५२.५१०	३१.४६०	३८.३२०
	SD=	१६.०२२	१५.७६१	१६.२५७	१६.५८८	१७.९२२	१५.७७२	१६.१०४
ग्रामीण अनुदानित शाळांमधील शिक्षक	M=	५०.५५०	३३.६६०	४७.३५०	३५.९६०	५८.४९०	३६.११०	४३.६००
	SD=	१६.१०३	१५.९९३	१६.५५५	१७.१०९	१७.९३१	१६.३१५	१६.३१५
शहरी अनुदानित शाळांमधील शिक्षक	M=	३९.४७०	२४.१६०	३६.१८०	२५.५४०	४६.५३०	२६.८१०	३३.०४०
	SD=	१३.९५४	१४.०७१	१३.९३६	१४.३३८	१५.८७०	१३.८१६	१४.१००
विना-अनुदानित शाळांमधील शिक्षक	M=	४२.५१०	२५.२९५	३८.५८५	२६.७१०	५०.५२५	२७.६१०	३५.१५०
	SD=	१५.७५१	१६.०८८	१५.६०८	१६.५९२	१७.१९१	१६.१९१	१५.९३५
ग्रामीणविनाअनुदानित शाळांमधील शिक्षक	M=	३६.०६०	१८.७००	३२.२८०	२०.१८०	४३.८००	२१.३६०	२८.५८०
	SD=	१२.६३०	१२.००३	११.९३४	१२.३७०	१४.४७६	१२.२३७	१२.१५५
शहरी विना-अनुदानित शाळांमधील शिक्षक	M=	४८.९६०	३१.८९०	४४.८९०	३३.२४०	५७.२५०	३३.८६०	४१.७२०
	SD=	१५.९७३	१६.९८०	१६.३३९	१७.७२५	१७.१२१	१७.२७०	१६.५९७

कोष्टक क्र. ३.१४

माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या शालेय घटनांमधील वैफल्याचा त्यांच्या विविध घटकांशी असलेल्या सहसंबंधाचे विवरण दर्शवणारे कोष्टक

घटक	घटक क्र. I	घटक क्र. II	घटक क्र. III	घटक क्र. IV	घटक क्र. V	घटक क्र. VI	एकूण
घटक क्र. I	--	.९२७**	.९८९**	.९२९**	.९७२**	.९२०**	.९७९**
घटक क्र. II		--	.९५२**	.९९१**	.८७३**	.९८८**	.९७७**
घटक क्र. III			--	.९६०**	.९६२**	.९५३**	.९९२**
घटक क्र. IV				--	.८९०**	.९९३**	.९८२**
घटक क्र. V					--	.८८२**	.९५३**
घटक क्र. VI						--	.९७७**
एकूण							--

वरील कोष्टकामध्ये माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या शालेय घटनांमधील वैफल्याचा त्यांच्या समायोजनाच्या विविध घटकांशी असलेल्या सहसंबंधाचा अभ्यास पथदर्शी अभ्यासाच्या अंतर्गत करण्यात आला आहे. त्यामध्ये माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या शालेय घटनांमधील वैफल्याच्या संदर्भात प्रत्येक घटकांचा अन्य शालेय घटनांमधील वैफल्याच्या घटकांशी उच्च सार्थक सहसंबंध आढळून आला.

निष्कर्ष :

माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या शालेय घटनांमधील वैफल्याच्या एका घटकाचा अन्य घटकांशी सार्थक सहसंबंध असल्याचे दिसून येते.

कोष्टक क्र. ३.१५

माध्यमिक स्तरावरील शिक्षकांची अध्यापन अभियोग्यता, समायोजन आणि शालेय घटनांमधील वैफल्य यामधील सहसंबंधाचे विवरण दर्शवणारी सारणी.

चल	अध्यापन अभियोग्यता	समायोजन	शालेय घटनांमधील वैफल्य
अध्यापन अभियोग्यता	--	.७७३**	-.२८३**
समायोजन		--	-.३४४**
शालेय घटनांमधील वैफल्य			--

वरील कोष्टकामध्ये माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेचा त्यांच्या समायोजनाशी आणि शालेय घटनांमधील वैफल्याशी उच्च सार्थक सहसंबंध आहे म्हणजे माध्यमिक

स्तरावरील शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेमध्ये होणाऱ्या बदलाच्या प्रमाणात त्यांच्या समायोजन स्तरामध्ये धनात्मक सार्थक बदल घडून येतात, तर शालेय घटनांमधील वैफल्यामध्ये ऋणात्मक सार्थक बदल घडून येतात. म्हणजे उच्च अध्यापन अभियोग्यता असलेल्या शिक्षकांचे समायोजन उच्च आहे तसेच निम्न अध्यापन अभियोग्यता असलेल्या शिक्षकांचे समायोजन निम्न असल्याचे दिसून येते. तसेच माध्यमिक स्तरावरील शिक्षकांची उच्च अध्यापन अभियोग्यता असलेल्या शिक्षकांमध्ये निम्न प्रमाणात शालेय घटनांमधील वैफल्य दिसून येते, तर निम्न अध्यापन अभियोग्यता असलेल्या शिक्षकांना शालेय घटनामध्ये मोठया प्रमाणात वैफल्य येत असल्याचे दिसून येते. तसेच माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या समायोजनाचा त्यांच्या शालेय घटनांमधील वैफल्याशी ऋणात्मक सार्थक सहसंबंध आहे.

निष्कर्ष :

उच्च समायोजन स्तर असलेल्या शिक्षकांना शालेय घटनांच्या संदर्भात निम्न प्रमाणातील वैफल्याला सामोरे जावे लागते, तर निम्न समायोजन स्तर असलेल्या शिक्षकांना मोठया प्रमाणात शालेय घटनांमधील वैफल्याला सामोरे जावे लागत असल्याचे दिसून येते.

३.७ माहितीचे संकलन प्रक्रिया :

प्रस्तुत संशोधन विषयाशी संबधित माहितीचे संकलन करण्यासाठी न्यादर्श स्वरूपात निवड करण्यात आलेल्या अमरावती विभागातील ग्रामीण व शहरी भागातील अनुदानित व विना-अनुदानित माध्यमिक विद्यालयामध्ये प्रत्यक्ष जाऊन तेथील प्राचार्याना प्रस्तुत संशोधन विषयाच्या संदर्भात माहिती देण्यात आली आणि त्यांच्याकडून व त्यांच्या शाळांमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकांकडून आवश्यक माहिती, जी संशोधनाशी संबंधित आहे संकलीत करण्यासाठी परवानगी घेण्यात आली. संबंधित माध्यमिक विद्यालयातील मुख्याध्यापकांनी तेथील शिक्षकांना याबाबत सूचना दिल्या त्यांच्या सोबत सुद्धा संशोधन विषयाच्या संदर्भात चर्चा करण्यात आली. त्यांना या संशोधन विषयाच्या संदर्भात शिक्षकांना सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच या संशोधनाच्या संदर्भात निर्धारित प्रश्नावली आणि चाचणी भरण्याच्या संदर्भात आवश्यक सूचना आणि माहिती शिक्षकांना देण्यात आली. शिक्षक अध्यापन अभियोग्यता चाचणी शिक्षकांना देण्यात आली. या चाचणीमध्ये निर्धारित विधानांना द्यावयाच्या प्रतिसादाच्या संदर्भात त्यांना माहिती देण्यात आली. शिवाय त्यांच्या अडचणी विचारून त्यांचे समाधान करण्यात आले. ही अध्यापन अभियोग्यता चाचणी भरण्यासाठी असलेल्या वेळेची सुद्धा त्यांना कल्पना देण्यात आली. पहिली शिक्षक अध्यापन अभियोग्यता चाचणी सोडवून झाल्यानंतर

त्यांचे संकलन करण्यात आले. त्यांनतर १५ मिनिटांचा अवकाश घेण्यात आला व नंतर शिक्षक समायोजन शोधिका निवड करण्यात आलेल्या शिक्षकांकडून सोडवून घेण्यात आली. त्यासंदर्भात सुद्धा आवश्यक सूचना निवड करण्यात आलेल्या शिक्षकांना देण्यात आल्या. त्यांनतर या शिक्षक समायोजन शोधिकेचे संकलन करण्यात आले. त्यानंतर ३० मिनिटांचा अवकाश देण्यात आला. अवकाशानंतर या शिक्षकांना शालेय घटनांमधील वैफल्य चाचणी देण्यात आली. या चाचणीच्या संदर्भात आवश्यक सूचना आणि मार्गदर्शन त्यांना करण्यात आले. आणि त्यांच्याकडून निर्धारित वेळेमध्ये ही मापणी भरून घेण्यात आली. या शालेय घटनांमधील वैफल्य चाचणीचे संकलन करण्यात आले. अशाप्रकारे प्रस्तुत संशोधनामध्ये अमरावती विभागातील ग्रामीण व शहरी भागातील अनुदानित व विना-अनुदानित माध्यमिक विद्यालयातील शिक्षकांकडून त्यांची अध्यापन अभियोग्यता, शिक्षक समायोजन शोधिका, आणि शालेय घटनांच्या संदर्भातील वैफल्य यासंदर्भात आवश्यक माहिती संकलित करण्यात आलेली आहे.

प्रकरण ४ थे

संकलित माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन

४.१ प्रस्तावना

शैक्षणिक समस्येवर संशोधन करीत असताना त्यामधील प्रत्येक बाबींची माहिती मिळवून सदर माहितीचे संकलन करावयाचे असते. संशोधनाची माहिती संकलित केल्यानंतर निष्कर्षाप्रत पोहोचण्याकरिता सांख्यिकीय विश्लेषणाची व अर्थनिर्वचनाची आवश्यकता असते. माहिती संकलनाचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करुन संशोधन कार्य निष्कर्षापर्यंत पोहचविणे शक्य होते.

"Studying the organized material in order to discover inherent facts. The data is studied from as many angles as possible to explore the new facts."

माहितीचे विश्लेषण केल्यानंतर अर्थनिर्वचनाला विशेष महत्त्व असते.

"Interpretation means an adequate exposition of the true meaning of the material presented in terms, the purposes of the study being reported and of the chapter and section topic involved."

प्रस्तुत शैक्षणिक संशोधनामध्ये संशोधनकर्त्याने निष्कर्षापर्यंत पोहचण्यासाठी माहिती संकलनानंतर खालील सांख्यिकीय तंत्राचा वापर करुन विविध सारण्या व स्तंभालेखांच्या सहाय्याने माहितीचे विश्लेषण केले आहे.

४.२ सांख्यिकी :

प्रस्तुत संशोधनामध्ये पुढील सांख्यिकी प्रविधींचा वापर करण्यात आलेला आहे.

स्तर :

माध्यमिक स्तरावरील शिक्षकांची अध्यापन अभिवृत्ती, समायोजन आणि शालेय घटनांच्या संदर्भातील वैफल्य यांचे उच्च, सामान्य आणि निम्न स्तरनिहाय विश्लेषण करण्यासाठी प्रत्येक चलांच्या संदर्भात असलेल्या Total Score वरून त्यांचे मध्यमान (Mean) आणि प्रमाण विचलन (SD) काढण्यात आले आणि प्रत्येक चलनिहाय प्राप्त झालेल्या मध्यमानाच्या धनात्मक बाजुने एक प्रमाण विचलन (+1 SD) आणि ऋणात्मक बाजूने एक प्रमाण प्रमाण विचलन वजा करून (-1 SD) प्राप्त मूल्यांच्या आधारावर सामान्य स्तर निश्चित करण्यात आला आहे. तसेच मध्यमानापासून एक सिग्मा

यामध्ये प्रमाण विचलनाचे मूल्य जोडून बेरीज करून (+1 SD) आलेल्या मूल्यांच्या आधारावर उच्च स्तर निश्चित करण्यात आला आणि मध्यमानापासून एक सिग्मा पर्यंत असलेल्या मूल्यामधून प्रमाण विचलनाचे मूल्य वजा करून (-1 SD) आलेल्या मूल्यांच्या आधारावर निम्न स्तर निश्चित करण्यात आला आहे. अशाप्रकारे चलनिहाय माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचे उच्च, सामान्य आणि निम्न या तीन भागामध्ये विभाजन करून माध्यमिक स्तरावरील निवड करण्यात आलेल्या शिक्षक संख्येच्या आधारावर त्यांचे शेकडा प्रमाण काढण्यात आलेले आहे.

एक मार्गी प्रसरण अनुपात- (One Way Analysis of Variance)

प्रस्तुत संशोधनामध्ये दोन आणि त्यापेक्षा अधिक समुहांमध्ये असलेल्या सार्थक अंतराची गणना करण्यासाठी म्हणजे माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्ती आणि समायोजनाच्या संदर्भात असलेल्या शालेय घटनांच्या संदर्भातील वैफल्याचा अभ्यास करण्यासाठी एक मार्गी प्रसरण अनुपात (one way analysis of variance) या प्राचल सांख्यिकीय प्रविधीचा वापर करण्यात आला आहे. तसेच विविध जनसंख्यात्मक चलांच्या संदर्भात असलेल्या मध्यमानामधील फरकाचे विश्लेषण करण्यासाठी द्विमार्गी प्रसरण अनुपात मूल्य आणि आलेखाचा वापर करण्यात आलेला आहे. एकमार्गी प्रसरण अनुपात मूल्याची गणना करण्यासाठी पुढील सूत्राचा वापर करण्यात आला आहे.

संशोधन (Correction-C) -

प्रस्तुत संशोधनामध्ये प्रसरण अनुपात या सांख्यिकीय विधीचा अवलंब करण्यात आला आहे. या प्रसरण अनुपातामध्ये F- Ratio चे मूल्य काढण्यासाठी संशोधन correction-C चा वापर करण्यात आला आहे correction-c ची गणना करण्यासाठी पुढील सूत्राचा वापर करण्यात आला आहे.

$$C = \frac{(\sum x_1 + \sum x_2 + \sum x_3 + \cdots \ldots\ldots\ldots\ldots \sum x_n)^2}{N} = \frac{\sum x^2}{N}$$

C = संशोधन (Correction-C)

$\sum x_1$ = पहिल्या समुहाच्या प्राप्तांकाची बेरीज

$\sum x_2$ = व्दितीय समुहाच्या प्राप्तांकाची बेरीज

$(\sum x)^2$ = सर्व समुहाच्या प्राप्तांकाच्या बेरजेचा वर्ग

N = संख्या

सर्व वर्गाची बेरीज - (Total Sum of Square TSS) :

प्रस्तुत संशोधनामध्ये प्रसरण अनुपाताचे मूल्य काढण्यासाठी सर्व वर्गाची बेरीज total sum of square TSS चा वापर करण्यात आला आहे. TSS गणना करण्यासाठी पुढील सुत्राचा वापर करण्यात आला आहे.

$$\textbf{TSS} = \sum x_1^2 + \sum x_2^2 + \sum x_3^2 + \sum x_4^2 \ldots\ldots\ldots\ldots + \sum x_n^2 - C$$

TSS = सर्व वर्गाची बेरीज (Total sum of square)

$\sum x_1^2$ = पहिल्या समुहाच्या प्राप्तांकाच्या वर्गाची बेरीज

$\sum x_2^2$ = दुसऱ्या समुहाच्या प्राप्तांकाच्या वर्गाची बेरीज

$\sum x_3^2$ = तिसऱ्या समुहाच्या प्राप्तांकाच्या वर्गाची बेरीज

$\sum x_4^2$ = चवथ्या समुहाच्या प्राप्तांकाच्या वर्गाची बेरीज

$\sum x_n^2$ = सर्व समुहाच्या प्राप्तांकाच्या वर्गाची बेरीज

C = संशोधन

समुहाच्या मधील वर्गाची बेरीज - (Between group Sum of Square BSS) -

प्रस्तुत संशोधनामध्ये प्रसरण अनुपाताचे मूल्य काढण्यासाठी समुहाच्या मधील वर्गाची बेरीज Between group sum of square BSS चा वापर करण्यात आला आहे. BSS गणना करण्यासाठी पुढील सुत्राचा वापर करण्यात आला आहे.

$$\textbf{BSS} = \frac{(\sum x1)^2}{n_1} + \frac{(\sum x2)^2}{n_1} + \frac{(\sum x3)^2}{n_1} + \cdots + \frac{(\sum xn)^2}{n_1} - C$$

BSS = समुहाच्या मधील वर्गाची बेरीज (Between group sum of square)

$(\sum x_1)^2$ = प्रथम समुहाच्या प्राप्तांकाच्या बेरजेचा वर्ग

$(\sum x_2)^2$ = व्दितीय समुहाच्या प्राप्तांकाच्या बेरजेचा वर्ग

$(\sum x_3)^2$ = तृतीय समुहाच्या प्राप्तांकाच्या बेरजेचा वर्ग

$(\sum x_n)^2$ = सर्व समुहाच्या प्राप्तांकाच्या बेरजेचा वर्ग

C = संशोधन

समुहाच्या अंतर्गत वर्गाची बेरीज (within group sum of square WSS) -

प्रस्तुत संशोधनामध्ये प्रसरण अनुपाताचे मूल्य काढण्यासाठी समुहाच्या अंतर्गत वर्गाची बेरीज Within group sum of square WSS चा वापर करण्यात आला आहे. WSS गणना करण्यासाठी पुढील सुत्राचा वापर करण्यात आला आहे.

WSS = TSS - BSS

WSS = समुहाच्या अंतर्गत वर्गाची बेरीज (within group sum of square)

TSS = सर्व समुहाच्या वर्गाची बेरीज

BSS = समुहाच्या मध्ये वर्गाची बेरीज

स्वाधीनता मात्रा Degree of freedom :

प्रस्तुत संशोधनामध्ये समुहाच्या मध्ये स्वाधीनता मात्रा (Between group sum of square degree of freedom) BSS आणि समुहाच्या अंतर्गत स्वाधीनता मात्रा (Within group sum of square degree of freedom) WSS काढण्यासाठी पुढील सुत्राचा वापर करण्यात आला आहे.

DF = स्वाधीनता मात्रा (Degree of freedom)

Between group Degree of freedom = K-1 (K = समुहांची संख्या)

Within group Degree of freedom = N - K (N = प्रतीदर्श संख्या)

मध्यमान वर्ग Mean square :

प्रस्तुत संशोधनामध्ये प्रसरण अनुपाताची गणना करण्यासाठी मध्यमान वर्गाची गणना करण्यात आली आहे, त्यासाठी पुढील सुत्राचा वापर करण्यात आला आहे.

BSS / BSS df K-1 = समुहाच्या मध्ये वर्गाची बेरीज भागिले समुहाच्या मध्ये स्वाधीनता मात्रा समुह K वजा 1

WSS / WSS df N-K = समुहाच्या अंतर्गत वर्गाची बेरीज भागिले समुहाच्या अंतर्गत स्वाधीनता मात्रा विद्यार्थी संख्या N - 1

प्रसरण अनुपात - F- Ratio

प्रस्तुत संशोधनामध्ये F-Ratio ची गणना करण्यासाठी पुढील सुत्राचा वापर करण्यात आला आहे.

$$\text{F-Ratio} = \frac{\textit{Mean square between}}{\textit{Mean square within}}$$

F-Ratio = एफ अनुपात

Mean square between group = समुहाच्या मधील मध्यमान वर्ग

Mean square within group = समुहाच्या अंतर्गत मध्यमान वर्ग

मध्यमान (Mean) -

प्रस्तुत संशोधनामध्ये मध्यमान या केंद्रिय प्रवृत्तीच्या सर्वात विश्वसनिय प्रविधीचा वापर करण्यात आला आहे मध्यमान काढण्यासाठी पुढील सुत्राचा वापर करण्यात आला आहे.

$$M = \frac{\sum X}{N}$$

M = मध्यमान (Mean)

$\sum X$ = समुहाची बेरीज (Sum of Square)

N = संख्या

प्रमाण विचलन (standard Deviation)-

प्रस्तुत संशोधनामध्ये प्राप्तांकामधील विचलनाचा शोध घेण्यासाठी प्रमाण विचलन या विचलनशीतेच्या तत्त्वाचा वापर करण्यात आला आहे प्रमाण विचलन काढण्यासाठी पुढील सुत्राचा वापर करण्यात आला आहे.

$$SD = \frac{\sqrt{\sum d^2}}{N}$$

SD = प्रमाण विचलन

$\sum d^2$ = प्रत्येक प्राप्तांकाचे समुहाच्या मध्यमानापासून विचलन आणि त्या विचलनाचा वर्गाची बेरीज

N = संख्या

मध्यमानामधील अंतराची प्रमाण त्रुटी - (standard Error Difference of mean)

प्रस्तुत संशोधनामध्ये CR अथवा t मूल्याची गणना करता यावी यासाठी दोन समुहाच्या मध्यमानामधील अंतराची प्रमाण त्रुटी काढण्यात आली त्यासाठी पुढील सुत्राचा वापर करण्यात आला आहे.

$$SE_{dm} = \sqrt{\frac{sd1^2}{N1-1} + \frac{sd2^2}{N2-1}}$$

SE_{dm} = दोन समुहाच्या मध्यमानामधील अंतराची प्रमाण त्रुटी
(Standared error Difference between two group)

$sd1^2$ = प्रथम समुहाच्या प्रमाण विचलनाचा वर्ग (square of SD of first group)

$sd2^2$ = दुसऱ्या समुहाच्या प्रमाण विचलनाचा वर्ग (square of SD of second group)

$N1-1$ = प्रथम समुहामधील विद्यार्थ्यांची संख्या (size of first group sample)

$N2-2$ = दुसऱ्या समुहामधील विद्यार्थ्यांची संख्या (size of second group sample)

क्रांतिक अनुपात अथवा टी मूल्य (Critical Ratio) -

दोन समुहामधील मध्यमानामध्ये असलेल्या अंतराची सार्थकता पाहण्यासाठी क्रांतिक अनुपात अथवा टी मूल्यांची गणना करण्यासाठी पुढील सुत्राचा वापर करण्यात आला आहे.

$$t = \frac{M_1 - M_2}{SE_d}$$

CR = क्रांतिक अनुपात

M_1 = प्रथम समुहाचे मध्यमान

M_2 = व्दितीय समुहाचे मध्यमान

SE_d = दोन समुहाच्या मध्यमानामधील अंतराची प्रमाण त्रृटी

४.३ सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिवर्चन :

प्रस्तुत संशोधन विषयाच्या संदर्भात प्राप्त माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आलेले आहे आणि उद्दिष्टनिहाय निर्धारित करण्यात आलेल्या परिकल्पनांचे परीक्षण करून प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भात निष्कर्ष मांडलेले आहे. प्रस्तुत संशोधन विषयाच्या संदर्भात सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन प्रमुख दोन भागामध्ये करण्यात आले आहे. विभाग A मध्ये माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या संदर्भातील प्रमुख चलनिहाय वितरण दर्शवण्यात आलेले आहे. तर विभाग B मध्ये परिकल्पना परीक्षण करण्यात आलेले आहे त्याचे विश्लेषण पुढीलप्रमाणे आहे.

उदिद्‌ष्टांच्या सिध्दतेसाठी व परिकल्पनांच्या परिक्षणासाठी वापरलेली पध्दती :



विभाग A : माध्यमिक स्तरावरील शिक्षकांची अध्यापन अभियोग्यता, शिक्षक समायोजन आणि शालेय घटनांमधील वैफल्याचे स्तरनिहाय वितरण :

माध्यमिक स्तरावरील शिक्षकांची अध्यापन अभियोग्यता, शिक्षक समायोजन आणि शालेय घटनांमधील वैफल्याच्या संदर्भात त्यांचे उच्च, मध्यम आणि निम्न स्तरामध्ये असलेल्या वितरणाचे विवरण पुढीलप्रमाणे आहे.

सारणी क्र. ४.०

माध्यमिक स्तरावरील ग्रामीण व शहरी अनुदानित व विना-अनुदानित माध्यमिक शाळांमधील शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेचे वितरण दर्शवणारी सारणी.

शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेचे स्तर	अनुदानित माध्यमिक विद्यालयातील शिक्षक						विना-अनुदानित माध्यमिक विद्यालयातील शिक्षक					
	ग्रामीण		शहरी		एकूण		ग्रामीण		शहरी		एकूण	
	पुरूष शिक्षक	महिला शिक्षक	पुरूष शिक्षक	महिला शिक्षक	पुरूष शिक्षक	महिला शिक्षक	पुरूष शिक्षक	महिला शिक्षक	पुरूष शिक्षक	महिला शिक्षक	पुरूष शिक्षक	महिला शिक्षक
उच्च अध्यापन अभियोग्यता	२४ ४८.००%	३२ ६४.००%	१६ ३२.००%	२६ ५२.००%	४० ४०.००%	५८ ५८.००%	२८ ५३.००%	३२ ६४.००%	८ १६.००%	२६ ५२.००%	३६ ३६.००%	५८ ५८.००%
सामान्य अध्यापन अभियोग्यता	१८ ३६.००%	१४ २८.००%	३० ६०.००%	२४ ४८.००%	४८ ४८.००%	३८ ३८.००%	१४ २८.००%	१६ ३२.००%	२० ४०.००%	२२ ४४.००%	३४ ३४.००%	३८ ३८.००%
निम्न अध्यापन अभियोग्यता	०८ १६.००%	०४ ०८.००%	०४ ०८.००%	०४ ०८.००%	१२ १२.००%	०४ ०४.००%	०८ १६.००%	०२ ०४.००%	२२ ४४.००%	०२ ०४.००%	३० ३०.००%	०४ ०४.००%
एकूण	५०	५०	५०	५०	१००	१००	५०	५०	५०	५०	१००	१००



आलेख क्र. ४.० ग्रामीण व शहरी अनुदानित व विना-अनुदानित माध्यमिक शाळामधील शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेचे शेकडा प्रमाण दर्शवणारा आलेख.

वरील सारणी क्र. ४.० मध्ये माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेचे स्तरनिहाय वितरण दर्शवण्यात आलेले आहे. त्यामध्ये अनुदानित शाळामधील ग्रामीण भागातील ४८.००% पुरूष शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण उच्च आहे. तर ३६.००% पुरूष शिक्षकांच्या बाबतीत त्यांच्या अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण सामान्य व १६.००% पुरूष शिक्षकांच्या बाबतीत त्यांच्या अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण निम्न असल्याचे स्पष्ट होते. तसेच ग्रामीण भागातील अनुदानित माध्यमिक शाळांमधील महिला शिक्षकांच्या संदर्भात ६४.००% महिला शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण उच्च प्रतीचे आहे तसेच २८.००% महिला शिक्षकांचे अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण सामान्य व ०८.००% महिला शिक्षकांचे अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण निम्न आढळून आले.

अनुदानित शाळामधील शहरी भागातील ३२.००% पुरूष शिक्षकांचे अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण उच्च आहे. तर ६०.००% पुरूष शिक्षकांच्या बाबतीत त्याच्या अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण सामान्य व ०८.००% पुरूष शिक्षकांच्या बाबतीत त्यांच्या अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण निम्न असल्याचे स्पष्ट होते. तसेच शहरी भागातील अनुदानित माध्यमिक शाळांमधील महिला शिक्षकांच्या संदर्भात ५२.००% महिला शिक्षकांचे अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण उच्च प्रतीचे आहे तसेच ४८.००% महिला शिक्षकाचे अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण सामान्य व ०८.००% महिला शिक्षकांचे त्यांच्या अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण निम्न असल्याचे आढळून आले.

अनुदानित माध्यमिक शाळांमधील एकूण ४०.०० % पुरूष शिक्षकांचे अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण उच्च आहे तर ४८.००% एकूण पुरूष शिक्षकांचे अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण सामान्य व १२.००% एकूण पुरूष शिक्षकांचे अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण निम्न प्रतीचे असल्याचे आढळून आले. अनुदानित माध्यमिक शाळामधील एकूण ५८.००% महिला शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण उच्च प्रतीचे आहे तर ३८.००% एकूण महिला शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण सामान्य आणि ०४.००% महिला शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण निम्न प्रतीचे आढळून आले.

विना-अनुदानित शाळामधील ग्रामीण भागातील ५३.००% पुरूष शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण उच्च आहे. तर २८.००% पुरूष शिक्षकांच्या बाबतीत त्याच्या अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण सामान्य व १६.००% पुरूष शिक्षकांच्या बाबतीत त्यांच्या अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण निम्न असल्याचे स्पष्ट होते. तसेच ग्रामीण भागातील विना-अनुदानित माध्यमिक शाळांमधील

महिला शिक्षकांच्या संदर्भात ६४.००% महिला शिक्षकांचे अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण उच्च प्रतीचे आहे तसेच ३२.००% महिला शिक्षकाचे अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण सामान्य व ०४.००% महिला शिक्षकांचे अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण निम्न असल्याचे आढळून आले.

विना-अनुदानित शाळामधील शहरी भागातील १६.००% पुरूष शिक्षकांचे अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण उच्च आहे. तर ४०.००% पुरूष शिक्षकांच्या बाबतीत त्याच्या अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण सामान्य व ४४.००% पुरूष शिक्षकांच्या बाबतीत त्याच्या अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण निम्न असल्याचे स्पष्ट होते. तसेच शहरी भागातील विना-अनुदानित माध्यमिक शाळांमधील महिला शिक्षकांच्या संदर्भात ५२.००% महिला शिक्षकांचे अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण उच्च प्रतीचे आहे तसेच ४४.००% महिला शिक्षकांच्या बाबतीत अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण सामान्य व ४.००% महिला शिक्षकांच्या बाबतीत त्यांच्या अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण निम्न असल्याचे आढळून आले.

विना-अनुदानित माध्यमिक शाळांमधील एकूण ३६.०० % पुरूष शिक्षकांचे अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण उच्च आहे तर ३४.००% एकूण पुरूष शिक्षकांचे अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण सामान्य व ३०.००% एकूण पुरूष शिक्षकाचे अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण निम्न प्रतीचे असल्याचे आढळून आले. विना-अनुदानित माध्यमिक शाळामधील एकूण ५८.००% महिला शिक्षकांचे अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण उच्च प्रतीचे आहे तर ३८.००% एकूण महिला शिक्षकांचे सामान्य व ०४.००% महिला शिक्षकांचे अध्यापन अभियोग्यतेचे प्रमाण निम्न प्रतीचे आढळून आले.

निष्कर्ष :

सर्वाधिक अनुदानित आणि विना-अनुदानित माध्यमिक शाळांमधील महिला शिक्षकांची अध्यापन अभियोग्यता ही उच्च आहे. सर्वाधिक अनुदानित माध्यमिक शाळांमधील पुरूष शिक्षकांची अध्यापन अभियोग्यता सामान्य आणि सर्वाधिक विना-अनुदानित माध्यमिक शाळांमधील शिक्षकांची अध्यापन अभियोग्यता ही निम्न आहे.

सारणी क्र. ४.०.१

माध्यमिक स्तरावरील ग्रामीण व शहरी भागातील अनुदानित व विना-अनुदानित माध्यमिक शाळांमधील शिक्षकांच्या समायोजनाचे वितरण दर्शवणारी सारणी.

शिक्षकांच्या समायोजनाचे स्तर	अनुदानित माध्यमिक विद्यालयातील शिक्षक						विना-अनुदानित माध्यमिक विद्यालयातील शिक्षक					
	ग्रामीण		शहरी		एकूण		ग्रामीण		शहरी		एकूण	
